# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

सभा क्र.१७/ २०१५ दिनांक ०८.०९.२०१५
स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी वेळ- दुपारी ०३.०० वाजता

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक ०८.०९.२०१५ रोजी दुपारी ०३.०० वाजता साईनिवास अतिथीगृह, शिर्डी येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ३२७०/ २०१५, दिनांक ०७ सप्टेंबर, २०१५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा मंगळवार दिनांक ०८.०९.२०१५ रोजी दुपारी ०३.०० वाजता साईनिवास अतिथीगृह, शिर्डी येथे मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री. विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.बाजीराव शिंदे, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत येऊन, मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक १८.०८.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२८९** दिनांक १८.०८.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

---

**विषय नं.०२** **दिनांक २०.०८.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२९०** दिनांक २०.०८.२०१५ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

---

**विषय नं.०३** **माहिती तंत्रज्ञान विभागासाठी कुंभमेळयाच्या धर्तीवर अत्यावश्यक सेवेकरीता नेटवर्क संबधीत तांत्रिक साहित्य खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम 2004 मधील तरतुदः** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**प्रस्ताविकः** मा.कार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार व दि.04/07/2015 व दि.24/07/2015 रोजीचे परिपत्रकान्वये कुंभमेळा 2015 निमित्ताने श्री साईभक्तांना सोयी-सुविधा पुरविणेसाठी विविध उपाययोजना सुरु आहे. त्यानुसार संस्थानचे विविध विभागात संगणक कार्यरत असुन कुंभमेळा पर्वणीच्या काळात शिरडीत श्री साईभक्तांची गर्दी होण्याची शक्यता असल्याने नेटवर्क संबधीत खालील नमुद केलेले तांत्रिक साहित्य अत्यावश्यक सेवा म्हणुन तयार ठेवणे गरजेचे आहे.

तसेच खालील तपशिलातील नमुद केलेले नेटवर्क संबधीत तांत्रिक साहित्य दि. 14/08/2014 रोजीचे महाराष्ट्र शासनाचे अध्यादेशानुसार Manufacturer in RC वर तपासले असता, सदर साहित्य RC वर नसल्याचे निदर्शनास आल्याने याकामी विहित पध्दतीने संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रियेव्दारे विविध पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागवुन खरेदी करणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 7,33,500/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता घेणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सादर करता येईल.

**(अ) हार्डवेअर-**

| अ.न. | साहित्याचे नाव | तपशिल | नग | अंदाजे दर रु. | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 01 | WS-C2960+24TC-L | **Cisco-** Catalyst 2960 Plus 24 10/100 + 2T/SFP LAN Base | 1 Nos. | 3,47,500/- | 3,52,500/- |
| | CAB-IND-10A | 10A Power cable for India | 1 Nos. | | |
| | CAB-CONSOLE-RJ45 | Console Cable 6ft with RJ45 and DB9F | 1 Nos. | | |
| | GLC-LH-SMD= | **Cisco-** 1000BASE-LX SFP transceiver module MMF/SMF 1310nm DOM | 2 Nos. | | |
| | | **Cisco** - 1000BASE- LH SFP | 2 Nos. | | |
| | CON-PSRT-WSC296TC (Support) | **Support-** PRTNR SS 8X5XNBD Catalyst 2960 Plus 24 10/100 + 2T/SFP LA | For 1 Year | 5,000/- | |
| | | | | एकुण रक्कम | **3,52,500/-** |

[ब] कन्झुमेबल-

| अ.न. | साहित्याचे नाव | कंपनी व ब्रॅंड | नग | अंदाजे दर | अंदाजे रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 01 | Cat 6 cable Box | AMP | 05 Box | 9,000/- | 45,000/- |
| 02 | Cat 6 I/O Box With Face Plate Unit (Make) | AMP | 40 Nos. | 600/- | 24,000/- |
| 03 | Cat 6 I/O Jack (For Cat-6 Patch Panel Side) | AMP | 80 Nos. | 300/- | 24,000/- |
| 04 | Cat 6 Patch Cord 2 ft | AMP | 750 Nos. | 200/- | 1,50,000/- |
| 05 | Cat 6 Patch Cord 3 ft | AMP | 50 Nos. | 300/- | 15,000/- |
| 06 | Cat 6 Patch Cord 7 ft | AMP | 40 Nos. | 500/- | 20,000/- |
| 07 | Fiber Patch Cord- SC-LC (3mtr– SM) | AMP | 8 Nos. | 3,500/- | 28,000/- |
| 08 | RJ-45 | AMP | 500 Nos. | 20/- | 10,000/- |
| 09 | Nylon Cable –Tie 200 mm | Branded | 500 Nos. | 6/- | 3,000/- |
| 10 | Nylon Cable –Tie 250 mm | Branded | 500 Nos. | 8/- | 4,000/- |
| 11 | LIU Rack mount 24 Port – fully Loaded | AMP | 1 Nos. | 20,000/- | 20,000/- |
| 12 | Cat 6 – Patch Panel | AMP | 2 Nos. | 7,000/- | 14,000/- |
| 13 | Wall Mount Rack 12U | Netrack/ Precision | 2 Nos. | 12,000/- | 24,000/- |
| | | | | एकुण रक्कम | **3,81,000/-** |

| | | |
|---|---|---|
| 01 | [अ] हार्डवेअर | 3,52,500/- |
| 02 | [ब] कन्झुमेबल | 3,81,000/- |
| [अ] व [ब] प्रमाणे एकुण रक्कम | | **7,33,500/- + टॅक्स** |

**मागणी:** माहिती तंत्रज्ञान विभागासाठी कुंभमेळयाच्या पर्वणी काळात शिरडीत श्री साईभक्तांची गर्दी होण्याची शक्यता असल्याने अत्यावश्यक सेवेचा विचार करता उपरोक्त नमुद केलेले नेटवर्क संबधीत तांत्रिक साहित्य दि. 14/08/2014 रोजीचे महाराष्ट्र शासनाचे अध्यादेशानुसार Manufacturer in RC वर तपासले असता RC वर नसल्याचे निदर्शनास आल्याने याकामी विहित पध्दतीने संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रियेव्दारे विविध पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागवुन खरेदी करणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 7,33,500/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छानणी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छानणी करुन अनुमान:** तांत्रिक व आर्थिक.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे नेटवर्क संबधीत तांत्रिक साहित्य खरेदीकामी विहित पध्दतीने संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा प्रक्रियेव्दारे विविध पुरवठाधारकांकडुन ई-निविदा मागवुन खरेदी करणेस तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रुपये 7,33,500/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.२९१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहिती तंत्रज्ञान विभागासाठी कुंभमेळयाच्या धर्तीवर अत्यावश्यक सेवेकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे नेटवर्क संबधीत तांत्रिक साहित्य खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.७,३३,५००/- + टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

विषय नं.०४ **माहिती तंत्रज्ञान विभागासाठी कुंभमेळयाच्या धर्तीवर अत्यावश्यक सेवेकरीता २५ नग संगणक संच तातडीने खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतुद:** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**प्रास्ताविक:** माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत विविध विभागांना कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक संगणके, प्रिंटर्स, युपीएस व इतर अनुषांगिक तांत्रिक साहित्य वेळोवेळी खरेदी करुन वापरासाठी देण्यात आलेले आहेत. बहुतेक सर्व संगणक संच हे सरासरी 6 ते 10 वर्षापासून वापरात आहेत. सदर संगणकाचे साहित्य दैनंदिन वापरामुळे निकामी/ खराब व कालबाह्य झाल्याने तसेच माहिती तंत्रज्ञानातील वेळोवेळी झालेल्या बदलाने, काही साहित्यांचे उत्पादन बंद झालेले आहे. त्यामुळे नादुरुस्त झालेले तांत्रिक साहित्य दुरुस्त करणेसाठी आवश्यक स्पेअर पार्टस् बाजारात उपलब्ध होत नाही.

सबब, अनेक विभागांमध्ये कार्यालयीन कामकाजासाठी नविन संगणकांची उपलब्धता करुन देणे गरजेचे आहे. संगणक, प्रिंटर, लॅपटॉप, सर्व्हर व इतर आयटी उपकरणांचे आयुष्यमान (Life) ठरविणेबाबत शासन निर्णय क्रमांक मातंस/ नस्ती07/प्र.क्र.89/39 मंत्रालय, मुंबई दिनांक 01 ऑगस्ट 2011 नुसार नियमावली तयार करण्यात आलेली आहे. त्यातील कलम 1 व 2 नुसार संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, सर्व्हर व इतर सर्व आयटी संबंधित उपकरणांचे वयोमान 5 वर्ष निश्चित करण्यात आलेले आहे. सद्यस्थिती 5 वर्षापेक्षा जास्त वयोमान झालेले 126 संगणके असून त्यांचे स्पेअरपार्ट

मिळत नाही. त्यानुसार मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार संगणक संच व इतर अनुषांगीक तांत्रिक साहित्य खरेदीकामीची प्रक्रिया विभागामार्फत सुरु असुन सदर प्रक्रियेस संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही होणेकामी विलंब लागण्याची शक्यता आहे.

मा. कार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार व दि. 04/07/2015 रोजीचे परिपत्रकान्वये कुंभमेळा 2015 निमित्ताने श्री साईभक्तांना सोयी-सुविधा पुरविणेसाठी विविध उपाययोजना सुरु आहे. त्यानुसार संस्थानचे विविध विभागात संगणक कार्यरत असुन कुंभमेळा पर्वणीच्या काळात शिरडीत श्री साईभक्तांची गर्दी होण्याची शक्यता असल्याने सर्व कांऊटर्स वर एक-एक संगणक संच अत्यावश्यक सेवा म्हणुन तयार ठेवणे गरजेचे आहे.

त्यानुसार दि. 14/08/2014 रोजीचे महाराष्ट्र शासनाचे अध्यादेशानुसार RC वर असलेल्या Dell/Lenevo/ HP या कंपनीचे पुरवठाधारकांशी RC वर नमुद केलेले दरानुसार एकुण 25 नग संगणक संच कुंभमेळा कामी होणारी गर्दी विचारात घेता अत्यावश्यक सेवा म्हणुन तात्काळ खरेदी करता येईल. त्यातील Lenevo कंपनीचा सपोर्ट व सर्व्हीस ही चांगल्या पध्दतीने व तात्काळ मिळत असल्याने Lenevo कंपनीचे संगणक संच घेणे उचित ठरेल.

त्यानुसार Dell/Lenevo/ HP कंपनीचे 25 नग संगणक संच RC वर नमुद केलेल्या खालील तपशिलानुसार व दरानुसार असलेल्या अधिकृत पुरवठाधारकांकडुन खरेदी करावयाचा झाल्यास त्यास रक्कम रुपये 10,17,607/- मात्र (सर्व करांसहित) खर्च येईल. परंतु, सदर संगणक संचामधील सीडी ड्राईव्हची आपणास आवश्यकता नसल्याने मे. राका इन्फोटेक, नासिक यांचे व्यतीरिक्त इतर दुसऱ्या पुरवठाधारकांशी दुरध्वनीव्दारे चर्चा केली असता, त्यांनी सीडी ड्राईव्हची किंमत वजा करुन दर कमी करण्यास नकार दिला आहे. त्यामुळे खालील तक्त्यातील RC वर नमुद असलेल्या पुरवठाधारकांपैकी मे. राका इन्फोटेक, नासिक यांनी सीडी ड्राईव्हची किंमत वजा करुन दर कळविलेले आहे.

| **महाराष्ट्र शासनाचे RC वरील नमुद Detail/ Specification & Make** | **नग** |
|---|---|
| Lenovo<br>Intel Core i3- Processor , 3rd generation or above, onboard Integrated Graphics,10/1000 LAN, onboard USB, 4 GB DDR3 RAM, 500 GB Hard Drive, No Optical Drive ,18.5" Monitor with LED Back Light, USB Optical Mouse and Keyboard<br>Windows 8 professional 64 bit<br>3 Yr Next business day onsite service. | 25 |

| **अ.नं.** | **RC वर असलेले पुरवठाधारकाचे नाव** | **कंपनी** | **नग** | **प्रति नग रक्कम रु.** | **एकुण रक्कम रुपये** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Cybernet it pvt ltd, Pune | Dell | 25 | 42778.80 | 1069470.00 | सर्व करांसहीत |
| 2. | Step Computers | Lenovo | 25 | 40704.30 | 1017607.50 | सर्व करांसहीत |
| 3. | Datamini Technologies Ltd. | 1. HP | 25 | 40704.30 | 1017607.50 | सर्व करांसहीत |
| | | 2.Data Mini | 25 | 40704.30 | 1017607.50 | सर्व करांसहीत |
| **4.** | **Racca Infotech** | **Lenovo** | **25** | **39800.00** | **9,95,000.00** | **सर्व करांसहीत** |

उपरोक्त तक्त्यातील दरांचे अवलोकन करता मे. राका इन्फोटेक, नाशिक यांनी सीडी ड्राईव्हची किंमत वजा करुन दर कमी देऊ केल्याने उपरोक्त तपशिलातील नमुद Specification चे 25 नग Lenevo कंपनीचे संगणक संच त्यांचेकडुन खरेदीकामी रक्कम रुपये 9,95,000/- मात्र (सर्व करांसहीत) इतका खर्च येणार असल्याने सदर खर्चास मान्यता घेणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे उप-समितीचे सभेसमोर सादर करता येईल.

**मागणी:** उपरोक्त प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे कुंभमेळा पर्वणीच्या काळात शिरडीत श्री साईभक्तांची गर्दी होण्याची शक्यता असल्याने सर्व कांऊटर्स वर एक-एक संगणक संच अत्यावश्यक सेवा म्हणुन तयार ठेवणे गरजेचे आहे.

उपरोकत दराचे अवलोकन करता मे. राका इन्फोटेक, नाशिक यांनी सीडी ड्राईव्हची किंमत वजा करुन दर कमी केल्याने सदरचे 25 नग Lenevo कंपनीचे संगणक संच त्यांचेकडुन खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या रक्कम रुपये 9,95,000/- मात्र (सर्व करांसहीत) चे खर्चास मान्यता घेणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे उप-समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** 1) शासन निर्णय क्रमांक मातंस/नास्ती 07/प्र.क्र.89/39 मंत्रालय मुंबई यांचा दिनांक 01 ऑगस्ट, 2011 रोजीचा निर्णय. 2) महाराष्ट्र शासनाचे जा.नं. GAD-मातंस042/01/2014 -DIT(MH) दि. 14/08/2014 रोजीचा अध्यादेश. 3) केंद्र शासनाचे Computer/IT-1 /RC 71090000/1215/81/04878/ 4542 / 53760 दि. 25/03/2015 रोजीचा अध्यादेश.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** उपरोक्त प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे कुंभमेळा पर्वणीच्या काळात शिरडीत श्री साईभक्तांची गर्दी होण्याची शक्यता असल्याने सर्व कांऊटर्स वर एक-एक संगणक संच अत्यावश्यक सेवा म्हणुन तयार ठेवणे गरजेचे आहे.

त्यानुसार मे. राका इन्फोटेक, नाशिक यांनी सीडी ड्राईव्हची किंमत वजा करुन दर कमी केल्याने सदरचे 25 नग Lenevo कंपनीचे संगणक संच त्यांचेकडुन खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या रक्कम रुपये 9,95,000/- मात्र (सर्व करांसहीत) चे खर्चास मान्यता घेणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे उप-समितीचे सभेसमोर सविनय सादर.

निर्णय क्र.२९२ यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे खरेदी करावयाचे २५ नग संगणक संच शासनाच्या दर करारानुसार खरेदी करणेत यावे. दर करारावर उपलब्ध नसल्यास सदरहू संगणक संच खरेदीकामी ई-निविदांची मागणी करणेत यावी, असे ठरले. तसेच याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.९,९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

विषय नं.०५ **माहिती तंत्रज्ञान विभागासाठी सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ करीता अत्यावश्यक सेवेकरीता ०१ नग Data Base Server खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम 2004 मधील तरतुद :** कलम 17 (1) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

**प्रस्ताविक:** मा.कार्यकारी अधिकारी सो., यांचे निर्देशानुसार व दि. 04/07/2015 रोजीचे परिपत्रकान्वये सिंहस्थ कुंभमेळा-2015 निमित्ताने श्री साईभक्तांना सोयी-सुविधा पुरविणेसाठी विविध उपाययोजना सुरु आहे. त्यानुसार कुंभमेळा पर्वणीच्या मुहुर्तावर श्री साईभक्तांची शिरडीत गर्दी होण्याची दाट शक्यता असल्याने सद्यस्थितीत माहिती तंत्रज्ञान विभागातील DC व DR मध्ये कार्यरत असलेल्या Dell कंपनीचे Data Base Server वर लोड येण्याची शक्यता असल्याने कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी दि. 28/07/2015 रोजीचे ई-मेलमध्ये नमुद केलेल्या Data Base Server चे Specification श्री के.व्ही. रमणी यांचेकडे तपासणेकामी पाठविले असता, त्यांनी पुर्वीचा Data Base Server हा चार वर्षापुर्वी खरेदी केला असल्याने दिवसे-दिवस Transaction Volume मध्ये वाढ होत असल्याने Data Base Server नविन खरेदी करणेस मान्यता दिले आहे.

सदर Data Base Server Dell सर्व्हरचे तांत्रिक क्षमता व किंमतीबाबत त्यांनी महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभागाचा सल्ला व Approval घेण्यात यावे, असे त्यांनी दि. 29/07/2015 रोजीचे ई-मेलमध्ये नमुद केले आहे. त्यानुसार इकडील विभागाचे दि. 29/07/2015 रोजीचे ई-मेलव्दारे महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभागास कळविण्यात आले असुन महाराष्ट्र शासनाने दि. 31/07/2015 रोजीचे ई-मेलव्दारे Server Capacity requirement should be analysed by Cognizant and based on the requirement असे नमुद केले आहे. त्यानुसार कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी (दि. 28/07/2015 रोजीचे ई-मेलनुसार) Data Base करीता Dell या कंपनीचा सर्व्हर व त्यांचे Configuration/Specification खालील तपशिलाप्रमाणे नमुद केले आहे. सदर 01 नग Dell कंपनीचा Server (Data Base Storage) अत्यावश्यक सेवेचा विचार करता तातडीने खरेदी करणे गरजेचे आहे.

कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी Dell या कंपनीचा सर्व्हरचे कोटेशन हे थेट कंपनीकडुन घेतले असुन त्यांनी त्याची किंमत रक्कम रुपये 9,94,285/- मात्र (Inclusive of all Taxes) असल्याचे नमुद केले असुन कंपनी ई-निविदा प्रक्रियेत समाविष्ट होत नसल्याचे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनिधींनी चर्चेअंती सुचविले आहे.

तसेच सदर सर्व्हर हा निविदा प्रक्रियेव्दारे पुरवठाधारकांकडुन खरेदी केल्यास साधारणत: तीन ते पाच लाख रुपये जास्त लागु शकतात, असे कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनिधींनी चर्चेअंती सुचविले आहे.

सदरकामी महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रसंचनालय विभागाचे प्रतिनिधीं श्री मुकेश सोमकुंवर यांचेशी सदर सर्व्हर खरेदी करणेबाबत चर्चा केली असता, त्यांनी is Sansthan follows GOM Procurement Procedures.if yes then etendering will be applicable above 3 lakhs.else;Sansthan Management can take appropriate decision असे त्यांनी SMS व्दारे कळविले आहे. उपरोक्त प्रास्ताविकेतील विवेचनानुसार खालीलपैकी एका मुद्यावर निर्णय होणे अपेक्षित आहे.

अ] संस्थानमध्ये ई-निविदा प्रक्रिया कार्यरत असुन संस्थानची खरेदी प्रक्रिया महाराष्ट्र शासनाचे नियमास अनुसरुन होत असल्याने तीन लाख रुपये किंमतीच्या खरेदीच्या वरती ई-निविदा प्रक्रिया करुन संस्थानचे विहित पध्दतीने कार्यवाही करणे अत्यावश्यक आहे. परंतु सदर ई-निविदा प्रक्रियेस विलंब लागण्याची शक्यता असुन सदर सर्व्हर ई-निविदा प्रक्रियेव्दारे विविध पुरवठाधारकांकडुन सोबतच्या मसुद्याप्रमाणे निविदा मागवुन खरेदी केल्यास कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचे प्रतिनिधींशी झालेल्या चर्चेनुसार सदर सर्व्हर खरेदीकामी अंदाजे रक्कम रुपये 14,94,000/- मात्र + टॅक्स इतका खर्च अपेक्षित असल्याचे त्यांनी चर्चेअंती सुचविले आहे.

ब] कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी सुचविलेला खालील तपशिलातील सर्व्हर हा थेट कंपनीकडुन सोबतच्या मसुद्याप्रमाणे कुठल्याही प्रकारची निविदा प्रक्रिया न करता खरेदी केल्यास संस्थानला रक्कम रुपये 9,94,285/- मात्र (Inclusive of all Taxes) थेट कंपनीस अदा करावे लागतील तसेच सिंहस्थ कुंभमेळा कालावधीत सर्व्हर त्वरीत मिळणेस मदत होईल. तसेच याकामी संस्थानने ई-निविदा प्रक्रिया राबविल्यास त्यात कंपनी सहभागी होणार नसल्याचे देखील त्यांनी चर्चेअंती सुचविले आहे.

| Sr.No | Description of Software | Qty |
|---|---|---|
| 01 | DELL PowerEdge R820 Server<br>Specifications-<br>1 PowerEdge R820 Motherboard, TPM, Intel Xeon E5-46XX v2 Processors<br>1 Expansion module for 4CPU configuration<br>1 2x Intel Xeon E5-4610 v2 2.3GHz, 16M Cache, 7.2GT/s QPI, Turbo, 8C, 95W, Max Mem 1600MHz<br>1 Upgrade to Four Intel Xeon E5-4610 v2 2.3GHz, 16M Cache, 7.2GT/s QPI, Turbo, 8C, 95W | 01 |

| | | |
|---|---|---|
| | 1 R820 chassis | |
| | 1 Bezel | |
| | 1 DIMM Blanks for Systems up to 4 Processors | |
| | 1 1600 MHz RDIMMS | |
| | 1 Performance Optimized | |
| | 8 8GB RDIMM, 1600MT/s, Low Volt, Dual Rank, x8 Data Width | |
| | 6 900GB 10K RPM, SAS6 2.5 " Frontbay Hard Drive | |
| | 1 Single backplane for Bay 1 on R820, up to 16 HDDs supported | |
| | 1 PERC H710 Integrated RAID Controller, 512MB NV Cache, Full Height | |
| | 2 Heat Sink for PowerEdge R820 | |
| | 1 DVD+/-RW ROM, SATA, Internal | |
| | 1 Dual, Hot-plug, Redundant Power Supply (1+1), 1100W | |
| | 1 Integration Information | |
| | 1 No Monitor | |
| | 2 Long Jumper Cord, C13-C14,4m,12a (APCC except ANZ) | |
| | 2 Deskside cord - For India, Sri Lanka, Nepal | |
| | 1 Broadcom 5720 QP 1Gb Network Daughter Card | |
| | 1 No Mouse | |
| | 1 2U Cable Management Arm | |
| | 1 ReadyRails 2U Sliding Rails | |
| | 1 RAID 10 for H710p, H710, H310 Controllers | |
| | 1 iDRAC7 Enterprise | |
| | Software- 2 Red Hat Enterprise Linux, 1-2 Socket, 3yr Subscription and License, 1 virtual guest | |
| | 1 Red Hat Enterprise Linux 6 Media Only X86_64, No Subscription | |
| | 1 Non Factory Install Operating System | |
| | 1 Electronic System Documentation and Open Manage DVD Kit for R820 | |

तसेच उपरोक्त नमुद केलेला Dell कंपनीचा Server दि. 14/08/2014 रोजीचे महाराष्ट्र शासनाचे अध्यादेशानुसार Manufacturer in RC वर तपासले असता RC वर नसल्याचे निदर्शनास आले आहे. सद्यस्थितीत संस्थानमध्ये Dell कपंनीचे Server तसेच इतर हार्डवेअर जास्त प्रमाणात कार्यरत असुन Dell कंपनीचा सपोर्ट व सर्व्हीस ही चांगल्या पध्दतीने व तात्काळ मिळत आहे.

तरी, श्री साईभक्तांची कुंभमेळा पर्वावरती होणारी गर्दी विचारात घेता अत्यावश्यक सेवेचा विचार करता उपरोक्त तपशिलात नमुद केलेला Dell कंपनीचा Server (Data Base Storage) करीता उपरोक्त "अ" व "ब" मध्ये नमुद केलेप्रमाणे खरेदी करणेकामी "अ" व "ब" पैकी एका मुद्यावर निर्णय व त्याप्रमाणे कार्यवाही होणेस तसेच त्यात नमुद केलेल्या खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करता येईल.

**मागणी:** माहिती तंत्रज्ञान विभागासाठी श्री साईभक्तांची कुंभमेळा पर्वावरती होणारी गर्दी विचारात घेता अत्यावश्यक सेवेचा विचार करता उपरोक्त तपशिलात नमुद केलेला Dell कंपनीचा Server (Data Base Storage) करीता उपरोक्त "अ" व "ब" मध्ये नमुद केलेप्रमाणे खरेदी करणेकामी "अ" व "ब" पैकी एका मुद्यावर निर्णय व त्याप्रमाणे कार्यवाही होणेस तसेच त्यात नमुद केलेल्या खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे उप-समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:** तांत्रिक व आर्थिक.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** प्रास्ताविकेत व मागणीमध्ये नमुद केलेप्रमाणे श्री साईभक्तांची कुंभमेळा पर्वावरती होणारी गर्दी विचारात घेता अत्यावश्यक सेवेचा विचार करता Dell कंपनीचा Server (Data Base Storage) करीता उपरोक्त "अ" व "ब" मध्ये नमुद केलेप्रमाणे खरेदी करणेकामी "अ" व "ब" पैकी एका मुद्यावर निर्णय व त्याप्रमाणे कार्यवाही होणेस तसेच त्यात नमुद केलेल्या खर्चास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

निर्णय क्र.२९३ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, माहिती तंत्रज्ञान विभागासाठी Data Base Server खरेदी करणेची आवश्यकता आहे का, त्याचबरोबर ऑनलाईन स्पेस विकत घेता येईल का तसेच सध्या असलेल्या Server ची क्षमता वाढवून घेता येईल का, याचा तौलानिक अभ्यास करुन सविस्तर फेरप्रस्ताव सादर करणेत यावा.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६** **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ व शताब्दी महोत्सव- २०१८ चे अनुषंगाने संस्थानचे मंदिर व परिसराचे सुरक्षेच्या दृष्टीने सुरक्षा साहित्य खरेदी करणेकरीता न्युनतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत.**

प्रस्ताव- सिंहस्थ कुंभमेळा-2015, शताब्दी महोत्सव-2018 चे अनुषंगाने तसेच साईभक्तांचे सुरक्षिततेच्या दृष्टिने मंदिर व परीसरात सुरक्षा यंत्रणा विकसीत करणेकामी सुरक्षा साहीत्य खरेदी करावयाची आहेत. त्याकामी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर सदर विषय मंजुरीसाठी सिव्हील ॲप्लीकेशन नं.- 3500/2015 दाखल करण्यात आले होते. सदर सिव्हील ॲप्लीकेशन अन्वये मा.उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद यांनी दि.06/05/2015 रोजी याकामी येणा-या खर्चास मान्यता दिलेली आहे.

त्यास अनुसरुन सदर सुरक्षा साहीत्य खरेदी व रेंटल बेसीसवर घेणेकामी ऑनलाईन टेंडर मागविणेकामी अनुक्रमे दि.10/07/2015 ते दि.05/08/2015 या कालावधीत वर्तमापत्रांत जाहीराती प्रसिध्द करण्यात येऊन, ऑनलाईन टेंडर मागवुन त्यांचे टेक्नीकल बीडस ओपनिंग करण्यात आलेले आहेत. परंतु सदरकामीफक्त 02 निविदाधारक यांच्या ऑनलाईन निविदा प्राप्त झालेल्या असल्यामुळे, शॉर्ट टर्म पध्दतीने पुन्हा ई-टेंडर प्रसिध्द करण्यात यावे असे निर्देश देण्यात आलेले होते. तदनंतर व्दितीय वेळेस दि.10/08/2015 ते दि. 18/08/2015 या कालावधीत वर्तमापत्रांत जाहीराती प्रसिध्द करण्यात येऊन, ऑनलाईन टेंडर मागविण्यात आले होते. परंतु यावेळीही फक्त 02 निविदाधारक यांच्या ऑनलाईन निविदा प्राप्त झालेल्या असल्यामुळे, शॉर्ट टर्म पध्दतीने पुन्हा ई-टेंडर प्रसिध्द करण्यात यावे असे निर्देश मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी दिलेले आहे. त्यानुसार दि.20/08/2015 ते दि.27/08/2015 या कालावधीत तृतीय वेळेस वर्तमापत्रांत जाहीराती प्रसिध्द करण्यात येऊन, ऑनलाईन टेंडर मागविण्यात आलेले आहे. सदरकामी 03 निविदाधारक यांच्या 03 ऑनलाईन निविदा प्राप्त झालेल्या असल्यामुळे, दि.28/08/2015 रोजी टेक्नीकल बीड मा.प्रशासकीय अधिकारी तसेच मा.मुख्यलेखाधिकारी सो. यांचे समक्ष उघडण्यात येऊन, सदरच्या निविदा मा.मुख्यलेखाधिकारी सो. यांनी तपासल्या असुन, सदर निविदांचे कमर्शियल बीड मा. उप कार्यकारी अधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी व मा. मुख्यलेखाधिकारी यांचे समक्ष उघडण्यात येऊन, प्राप्त पुरवठाधारकांचा सुरक्षा साहीत्यांचा सविस्तर तपशील व ऑनलाईन प्राप्त झालेला तुलनात्मक तक्ता सोबत जोडलेला आहे.

तरी सोबत जोडलेल्या तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता, मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन्स प्रा.लि.यांना ई-निविदेतील अ.नं.2,4,6,7,8,9,10,11,12,20,21,22,23,26 व 28 या साहीत्यांचे, मे.युनिक डेल्टा फोर्स सिक्युरीटी प्रा.लि.पुणे यांना ई-निविदेतील अ.नं. 1,3,5,13,16,17,19,24,25,27 या साहीत्यांचे तसेच मे. एस.एस.एंटरप्राईजेस,नाशिक यांना ई-निविदेतील अ.नं. 14 व 15 या साहीत्यांचे दर न्युनमत असल्यामुळे, त्यांना सोबतच्या मसुद्याप्रमाणे कार्यादेश देणेस मान्यता असावी.

तथापी, ई-निविदेमध्ये अ.नं. 18 मध्ये डी.एफ.एम.डी. हे आऊट डोअर फ्रेम मेटल करीता मागविण्यात आले होते. सदरकामी प्रथम वेळेस ई-निविदेमध्ये मे.युनिक डेल्टा फोर्स सिक्युरीटी प्रा.लि.पुणे यां कंपनीने आऊट डोअर डी.एफ.एम.डी. ऐवजी इनडोअर डी.एफ.एम.डी. चे प्रात्याक्षिक दाखविले होते. मार्केटमधिल सर्व कंपनीचे रेट आऊट डोअरपेक्षा नेहमीच कमी असतात, त्यामुळे इन डोअरचे रेट कमी आले होते. आताही सदर कंपनीने दर कमी भरुन इनडोअरचे युनिट वॉटरप्रुफ करुन देणार असल्याचे चर्चेअंती सांगीतलेले आहे. परंतु सदर युनिट पावसात/उन्हात उभे केल्यास त्यावरील कोटींग हे खराब होण्याची शक्यता आहे. सदरकामी मार्केटमध्ये अधिक चौकशी करणे अपेक्षित असुन, आऊट डोअरची किंमत इन डोअरपेक्षा तीन ते चारपट जास्त असल्याची शक्यता आहे. कारण त्यातील इंटरनल सर्कीट हे मुळत: वॉटरप्रुफ कोटींग केलेले असते. त्यामुळे पुरवठाधारक मे.युनिक डेल्टा फोर्स सिक्युरीटी प्रा.लि.पुणे यांनी नमुद केलेले दर हे गुणवत्तेशी तडजोड करुन सादर केलेले असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे याबाबत उचित निर्णय होणे अपेक्षित असुन, सदर इनडोअर व आऊट डोअर फ्रेम डीटेक्टर दराची बाजारात अधिकृत चौकशी करुन, कार्यादेश देणे उचित ठरले असे मत आहे. तरी सदरचा कार्यादेश संबंधित पुरवठाधारक यांना द्यावा किंवा कसे? याबाबत आपले आदेशास्तव सविनय सादर.

सबब, सदरचे सुरक्षा साहीत्य कुंभमेळा कालावधीपर्यंत शिर्डी पोलीस स्टेशनचे ताब्यात देणेस मान्यता मिळणकामी प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.२९४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे खरेदी करावयाच्या सुरक्षा साहित्य खरेदी करणेसाठी संबंधीत निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेकामी तातडीची गरज म्हणून समितीचे अध्यक्ष व सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली आहे. त्यापैकी अ.नं.०३ व १८ चे साहित्य खरेदी तूर्त स्थगित ठेवणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

---

**विषय नं.०७** **सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ वाहनतळे व वाढीव दर्शनरांग याकरीता इलेक्ट्रीकल मटेरीयल पुर्वीच्या मंजुर दराप्रमाणे मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक व मे.यशवंत इलेक्ट्रीकल्स, अहमदनगर यांचेकडून खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचे समोरील रिट पिटीशन नं.१८/२०११ मध्ये सिव्हील अर्ज.नं.३००५/२०१५ अन्वये वरील मा.उच्च न्यायालयासमोर सादर करण्यात आलेल्या प्रस्तावामध्ये विद्युत विभागास कळविण्यात आल्याप्रमाणे ५ वाहनतळाचेच मटेरीअलचा समावेश करण्यात आलेला होता. या ५ वाहनतळाकरीता लागणा-या मटेरीअलचा समावेश या ( रु.९,२३,७००/- + रु.९,९६,३५०/-) मिळून रक्कम रुपये १९,२०,५००/- इतक्या रकमेला मा.उच्च न्यायालयाची दि.०६-०५-२०१५ रोजी मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत उभारण्यात येणा-या वाहनतळांवर साईभक्तांना अतिरिक्त सुविधा पुरविणेकामी इलेक्ट्रीकल मटेरीअल आणि

केबल खरेदीसाठी ई-निविदाव्दारे निविदा बोलावून संदर्भ क्र.०२ अन्वये मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक व संदर्भ क्र.०३ अन्वये मे.यशवंत इलेक्ट्रीकल्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, अहमदनगर यांना कार्यादेश देण्यात येऊन खालीलप्रमाणे मटेरीअल खरेदी करण्यात आले होते.

**०१). मे. आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांचेकडून खरेदी करण्यात आलेले मटेरीअल तपशील :-**

| Sr. No | Description | Qty. | Rate Rs. | Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Supplying Pvc Armoured cable Size 4 x16 sq.mm. | 2960 Mtr | 175/- | 5,18,500/- |
| 2 | Supplying 100 Amp TPN Change over Switch | 10 Nos | 9070/- | 0,90,700/- |
| 3 | Supplying 250 Watt Metal Fitting With Lamp | 50 Nos | 5500/- | 2,75,000/- |
| 4 | Supplying water proof door with locking system control box (1.25 mm CRCA Sheet metal) size :- 900 mm x600 mm x300mm | 10 Nos | 4000/- | 0,40,000/- |
| | | | **Tender Cost Rs.:-** | **9,23,700.00** |
| | | | **Percentage Rate on E-Tender Cost : - 21.5 % Below:-** | **1,98,596.00** |
| | | | **Final Cost Rs:-** | **7,25,104.00** |
| **Rupees Seven Lakh Twenty FiveThousand One Hundred Four only** | | | | |

**०२). मे.यशवंत इलेक्ट्रीकल्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर, अहमदनगर यांचेकडून खरेदी करण्यात आलेले मटेरीअल तपशील :-**

| Sr. No | Description | Qty. | Rate Rs. | Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Supplying Pvc Armoured cable Size 4x10 sq.mm. | 500 Mtr | 159/- | 79,500/- |
| 2 | Supplying Flexible cable Size 3x2.5 sq.mm. | 1000 Mtr | 35/- | 35,000/- |
| 3 | Flexible Wire Bundle Size 40/36 | 50 Bundle | 400/- | 20,000/- |
| 4 | Supplying G.I.Wire ,18 Gaje | 100 Kgs | 100/- | 10,000/- |
| 5 | Supplying Pvc Wire Bundle (90 Mtr) Size 1.5 sq.mm. | 25 Bundle | 1100/- | 27,500/- |
| 6 | Supplying Pvc Wire Bundle(90 Mtr ) Size 2.5 sq.mm. | 25 Bundle | 1800/- | 45,000/- |
| 7 | Supplying Pvc Wire Bundle (90 Mtr ) Size 4 sq.mm. | 15 Bundle | 2500/- | 37,500/- |
| 8 | Supplying unbreakable 5 Amp Two pin Top | 100 Nos | 10/- | 0,01,000/- |
| 9 | Supplying unbreakable 5 Amp Three pin Top | 100 Nos | 30/- | 0,03,000/- |
| 10 | Supplying unbreakable 15 Amp Three pin Top | 100 Nos | 60/- | 0,06,000/- |
| 11 | Supplying 5 Amp Bead Switch | 100 Nos | 12/- | 0,01,200/- |
| 12 | Supplying Pvc Tape Bundle (10 Mtr ) | 1000 Nos | 15/- | 0,15,000/- |
| 13 | Supplying Pendant Holder | 500 Nos | 15/- | 0,07,500/- |
| 14 | Supplying CFL Lamp Size :- 35 Watt | 250 Nos | 340/- | 0,85,000/- |
| 15 | Supplying CFL Lamp Size :- 70 Watt | 150 Nos | 750/- | 1,12,500/- |
| 16 | Supplying 500 Watt Halozen Fitting With Lamp | 50 Nos | 1100/- | 0,55,000/- |
| 17 | Supplying 1000 Watt Halozen Fitting With Lamp | 50 Nos | 2200/- | 1,10,000/- |
| 18 | Supplying 250 Watt Metal Fitting With Lamp | 25 Nos | 5500/- | 1,37,500/- |
| 19 | Supplying 400 Watt Metal Fitting With Lamp | 25 Nos | 6500/- | 1,62,500/- |
| 20 | Supplying Switch Socket Box Size ,5/15 Amp. | 100 Nos | 96/- | 0,09,600/- |
| 21 | Supplying DP Main Switch Size ,32 Amp. | 150 Nos | 85/- | 0,12,750/- |
| 22 | Supplying Main 32 Amp Main Switch. | 6 Nos | 1300/- | 0,07,800/- |
| 23 | Supplying Main 63 Amp Main Switch.. | 5 Nos | 3100/- | 0,15,500/- |
| 24 | **Tender Cost Rs.:-** | | | **9,96,350.00** |
| 25 | **Percentage Rate on E-Tender Cost : - 15.1 % Below:-** | | | **1,50,449.00** |
| 26 | **Final Cost Rs:-** | | | **8,45,901.00** |
| **Rupees Eight Lakh Fourty Five Thousand Nine Hundred One only** | | | | |

उपरोक्त मटेरीअल खरेदी करतेवेळी फक्त पाच ठिकाणी पार्कींग करण्याचे गृहीत धरण्यात आले होते. वेळोवेळी पार्कींगमध्ये वाढ होऊन एकुण पार्कींग संख्या १० इतकी झाली आहे. शिवाय नगर-मनमाड महामार्गावर तात्पुरती उभारण्यात येणारी दर्शनरांग याची माहिती विद्युत विभागास नसल्यामुळे त्यावेळेस त्यासाठी लागणा-या मटेरीअलचा समावेश करण्यात आला नव्हता. यामुळे उपरोक्त कार्यादेशा अन्वये खरेदी करण्यात आलेले मटेरीअल ७ वाहनतळावर (५ पेक्षा जास्त) वापरुन संपलेले असल्याने आता राहिलेल्या ३ वाहनतळ व नगर-मनमाड महामार्गाच्या

कडेने उभारण्यात येणारी दर्शनरांग याठिकाणी लागणारे नविन जादा मटेरीअल पुर्वीच्या उपरोक्त पुरवठाधारकांकडून जुन्या दराने खरेदी करुन काम पुर्ण करावे लागणार आहे.

सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ वाहनतळे व वाढीव दर्शनरांग याकरीता खरेदी कराव्या लागणा-या मटेरीअलचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**०१). मे. आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक**

| Sr.No | Description | Qty. | Rate Rs. | Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Supplying Pvc Armoured cable Size 4 x16 sq.mm. | 502 Mtr | 175/- | 0,87,850/- |
| 2 | Supplying 250 Watt Metal Fitting With Lamp | 30 Nos. | 5,500/- | 1,65,000/- |
| | | | Total :- | 2,52,850/- |
| | | | 21.50 % Below :- | 0,54,362.75 |
| | | | Total Amount Rs. :- | 1,98,487.25 |
| | | | **Round up :-** | **Rs. 1,98,487.25** |

**०२). मे. यशवंत इलेक्ट्रीकल्स, अहमदनगर**

| Sr. No | Description | Qty. | Rate Rs. | Amount Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Supplying Flexible cable Size 3x2.5 sq.mm. | 200 Mtr | 35/- | 0,07,000/- |
| 2 | Supplying Pvc Wire Bundle (90 Mtr) Size 1.5 sq.mm. | 10 Bundle | 1100/- | 0,11,000/- |
| 3 | Supplying Pvc Wire Bundle(90 Mtr ) Size 2.5 sq.mm. | 20 Bundle | 1800/- | 0,36,000/- |
| 4 | Supplying Pvc Wire Bundle (90 Mtr ) Size 4 sq.mm. | 04 Bundle | 2500/- | 0,10,000/- |
| 5 | Supplying CFL Lamp Size :- 35 Watt | 100 Nos | 340/- | 0,34,000/- |
| 6 | Supplying CFL Lamp Size :- 70 Watt | 70 Nos | 750/- | 0.52,500/- |
| 7 | Supplying Switch Socket Box Size, 5/15 Amp. | 100 Nos | 96/- | 0,09,600/- |
| 8 | Supplying DP Main Switch Size, 32 Amp. | 48 Nos | 85/- | 0,04,080/- |
| 9 | Supplying Main 32 Amp Main Switch. | 10 Nos | 1300/- | 0,13,000/- |
| | | | Total :- | 1,77,180/- |
| | | | 15.10 % Below :- | 0,26,754.18 |
| | | | Total Amount Rs. :- | 1,50,425.82 |
| | | | **Round up :-** | **1,50,426/-** |

उपरोक्तप्रमाणे मटेरीअल खरेदी करणेकामी रक्कम रुपये १९,२०,०५०/- (रु. ९,२३,७००/- + रु. ९,९६,३५०/- ) इतक्या रकमेस मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ यांचे समोरील रिट पिटीशन नं.१८/२०११ मध्ये सिव्हील अर्ज.नं.३००५/२०१५ अन्वये दि.०६-०५-२०१५ रोजी मान्यता मिळालेली आहे. सदरील रकमेपैकी रु.१५,७१,००५/- (रु. ७,२५,१०४/- +रु. ८,४५,९०१/-) इतक्या रकमेचे इलेक्ट्रीकल मटेरीअल व केबल खरेदी करण्यात आले असून सदरील मंजुर रकमेपैकी रु.३,४९,०४५/- इतकी रक्कम शिल्लक आहे. या शिल्लक रकमेतून राहिलेल्या ५ वाहनतळाकरीता उपरोक्तप्रमाणे मटेरीअल पुर्वीच्या मंजुर दराप्रमाणे ०१). मे.आदिती इलेक्ट्रीकल्स, नाशिक यांचेकडून खरेदी करणेस व रु. १,९८,४८७.०० इतक्या रकमेचा कार्यादेश देण्यास व येणा-या खर्चास मान्यता मिळणेस ०२).मे.यशवंत इलेक्ट्रीकल्स, अहमदनगर यांचेकडून खरेदी करणेस व रु. १,५०,४२६.०० इतक्या रकमेचा कार्यादेश देण्यास व येणा-या एकुण रक्कम रुपये ३,४८,९१३/- इतक्या खर्चास मान्यता मिळणेस मिळणेस विनंती.

निर्णय क्र.२९५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच विहीत पध्दतीने पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

विषय नं.०८ **श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स- २०१५ (८ पेजेस) ची विक्री किंमत कमी करणेबाबत.**

प्रस्ताव- मे.टॅको व्हिजन्स प्रा.लि., मुंबई यांना मा.त्रिसदस्यीय समिती सभा दि. २०.११.२०१५ निर्णय क्र.९९१ अन्वये जा.नं.एसएसएस/ वशी/४८३७ /२०१४ दि.०३.०१.२०१५ कॅलेंडर्स छपाईचा खालीलप्रमाणे दिनदर्शिका २०१५ छपाई कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे.

| अ.नं. | तपशिल | वाढीव छपाई संख्या | विक्री नग | सध्याची शिल्लक | छपाई दर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स २०१५ (८ पेजेस ) आकार २२" x ३५" | ५००० | ४१०० | ९०० | २३४.०० |

वरील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे वाढीव ५००० कॅलेंडर्स पैकी ४१०० कॅलेंडर्सची विक्री झाली असून, ९०० कॅलेंडर्स शिल्लक आहेत, वाढीव कॅलेंडर्सची जशी विक्री होईल. त्यानुसार बिल आदा करणेत येईल. या अटीवर वाढीव छपाईचा आदेश देण्यात आलेला आहे. सदरचे कॅलेंडर्सची विक्री किंमत रु.२५०/- अशी ठेवण्यात आलेली आहे. या किंमतीत सदर कॅलेंडर घेणेस भक्तांचा प्रतिसाद मिळत नसल्याने सदरचे कॅलेंडरची विक्री किंमत कमी करणे आवश्यक आहे.

कॅलेंडरचा छपाई दर रु.२३४ आहे तो रु.१३४ ने कमी करुन रु.१००/- करण्याची तयारी मे.टॅको व्हिजन्स प्रा.लि., मुंबई यांनी दि.३०.०६.२०१५ रोजीचे पत्रान्वये दर्शविली आहे. व विक्री दर रु.२५०/- आहे, तो रु.१४०/- ने कमी करुन रु.११०/- असा ठेवून भक्तांना कॅलेंडर विक्री करता येईल. संस्थानचे कोणत्याही प्रकारचे आर्थिक नुकसान होणार नाही. उलट कॅलेंडरचा छपाई दर कमी झाल्यामुळे विक्री किंमत कमी होईल व भक्तांस कमी दरात कॅलेंडर मिळेल व लवकर विक्री होऊन, संस्थानला कॅलेंडरचे पैसे जमा होणेस मदत होईल.

सबब श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर २०१५ (८ पेजेस) छपाई दर रु.२३४/- ऐवजी रु.१००/- प्रमाणे टॅको व्हिजन्स प्रा.लि., मुंबई यांना शिल्लक नग ९०० कॅलेंडर्सची किंमत रक्कम जसजशी विक्री होईल त्यानुसार बिल आदा करणेस व भक्तांना रु.२५०/- ऐवजी रु.११०/- प्रमाणे कॅलेंडरची विक्री करणेस मान्यतेकामी मा.त्रिसदस्यीय समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.२९६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स- २०१५ (८ पेजेस) ची विक्री किंमत कमी करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

विषय नं.०९ **साईलिला व्दैमासीके छपाईकामी माहे सप्टेंबर २०१५ ते ऑगस्ट २०१६ चे प्राप्त तांत्रिक (Techical Bid) व दरपत्रके (Commercial Bid) उघडणेबाबतचा अहवाल.**

प्रस्ताव- मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२.०६.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५०६ व मा. मुंबई उच्च न्यायलयाचे औरंगाबाद खंडपीठाने पी.आय.एल. नं. १८/२०११ मधील सिव्हील अर्ज क्र.३४९८/२०१५ मध्ये दि.१३.०३.२०१५ नुसार माहे सप्टेंबर २०१५ ते ऑगस्ट २०१६ या कालावधीसाठी साईलीला व्दैमासिके छपाई करुन घेणेकामी येणाऱ्या रक्कम रु. २३,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार साईलीला व्दैमासिक छपाई करुन घेणेकामी दि. ०२.०७.२०१५ ते दि.१४.०७.२०१५ या कालावधीत प्रेसधारकांकडून ई निविदा मागविण्यात आल्या होत्या. खालील प्रमाणे प्रेसधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत. सदरच्या ई निविदेतील तांत्रिक (Technical Bid) निविदा मा. प्रशासकीय अधिकारी यांचे समोर दि. २८.०७.२०१५ रोजी उडण्यात येऊन, तांत्रिक ई- निविदेतील कागदपत्रे मुख्य लेखाधिकारी यांचेकडून तपासून घेण्यात आले आहेत.

| अं.नं. | प्रेसधारक नांव | आवक नंबर/ तारीख |
|---|---|---|
| ०१ | टॅको व्हिजन प्रा.लि. मुंबई | मुंबई कार्यालय २८७/१४.०७.२०१५ |
| ०२ | सॅप प्रिंट सोल्युशन प्रा.लि. मुंबई | मुंबई कार्यालय २८५/१४.०७.२०१५ |
| ०३ | निट प्रिंटर्स, अहमदनगर | शिर्डी कार्यालय ७५८८ /२२.०७.२०१५ |
| ०४ | मनिपाल टेक्नॉलॉजिस लि. मनिपाल | मुंबई कार्यालय २८८/१४.०७.२०१५ |
| ०५ | ओरीयंट प्रेस लि. मुंबई | मुंबई कार्यालय २८४/१४.०७.२०१५ |

वरील प्रमाणे १ ते ५ प्रेसधारक हे तांत्रिक (Technical Bid) निविदेत पात्र असल्याने सदरच्या प्रेसधारकांचे किंमतीचे दरपत्रके (Commercial Bid) दि.१०.०८.२०१५ रोजी सायंकाळी ४ वाजता उघडण्याचे ठरले. त्यानुसार उपरोक्त तक्त्यातील प्रेसधारकांना सदरचे दिवशी ४ वाजता साईनिवास अतिथीगृहात हजर राहणे बाबत दि. ०८.०८.२०१५ रोजी दुरध्वनी व ई मेलव्दारे कळविले होते.

दि. १०.०८.२०१५ रोजी सायंकाळी ४ वाजता उपरोक्त तक्त्यातील अं.नं.१) मे.टॅको व्हिजन्स् प्रा.लि. मुंबई यांचे प्रतिनिधी श्री संतोष कडू व अं.नं.३) मे. निट प्रिंटर्स, अहमदनगर यांचे प्रतिनिधी श्री.गोरे हे साईनिवास अतिथीगृहात उपस्थित होते. त्यांचे समक्ष व मा. प्रशासकीय अधिकारी व मुख्य लेखाधिकारी यांचे समक्ष किंमतीचे दरपत्रके (Commercial Bid) उघडण्यात आले आहेत. प्रेसधाराकांनी देऊ केलेल्या दराचा तपशिल खालील प्रमाणे..

| अं.नं. | तपशिल | सपटेंबर २०१५ ते ऑगस्ट २०१६ छपाई संख्या | निट प्रिंटर्स, अहमदनगर | सॅप प्रिंट सोल्युशन प्रा.लि. मुंबई | ओरीयंट प्रेस लि, मुंबई | टॅको व्हिजन्स् प्रा.लि, मुंबई | मनिपाल टेक्नॉलॉजिस लि, मनिपाल |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईलिला अंक मराठी (५अंक) ३२+४ पाने =३६ पाने ९००० नग x ५ अंक | ४५००० नग | १४.५० | १२.५० | <u>११.००</u> | १२.३४ | १६.४५ |
| ०२ | साईलिला अंक हिंदी-इंग्रजी (५अंक) ३२+४ पाने =३६ पाने १४५०० नग x ५ अंक | ७०,००० नग | १३.०० | ११.७५ | <u>११.००</u> | ११.४२ | १४.५० |
| ०३ | दसरा विशेषांक मराठी (१ अंक) ६४+४=६८ पाने | ९००० नग | २४.५० | २१.३० | <u>१६.००</u> | २०.६३ | २४.४५ |
| ०४ | दसरा विशेषांक हिंदी-इंग्रजी (१ अंक) ६४+४=६८ पाने | १४,००० नग | २३.५० | १९.९० | <u>१६.००</u> | १९.६४ | २४.४५ |

मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाने पी.आय.एल.नं.११/२०११ मधील सिव्हिल अर्ज क्र.३४९८/२०१५ मध्ये दि.१३.०३.२०१५ रोजी केलेल्या आदेशान्वये साईलीला व्दैमासिक छपाईकामीचे रक्कम रु.२३,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त तक्त्यातील कॉलम नं.६ मधील आधोरिखित केलेले ओरियंट प्रेस लि., मुंबई यांचे निम्नतम दर आहेत. त्यांना व्दैमासिक छपाईकामी माहे सप्टेंबर२०१५ ते ऑगस्ट २०१६ चा छपाई कामाची कार्यादेश देणेस व छपाईकामी येणा-या रक्कम रुपये. १६,३३,०००/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.२९७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईलिला व्दैमासीके छपाईकामी आलेले नवीन दर व मागील मंजूर दर यांचा समावेश करणेत येऊन, सुधारीत प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**विषय नं.१०** **साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित पुस्तके पुर्नमुद्रण विहित पध्दतीने ई-निविदा मागवून करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.**

''श्रीसाईबाबांचे जीवन त्यांचे कार्य,त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील''

उपरोक्त तरतुदीनुसार प.पू.श्री साईबाबांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबत प्रचार-प्रसार होणेसाठी श्री साईबाबा सस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत संस्थान प्रकाशित साई सतचरित्र, पुस्तके,फोटो व ऑडीओ/व्हीडीओ सीडीचे पुनरमुद्रणकरुन साईभक्तांना माफक किंमतीने विक्री केली जाते.

२९ पुस्तकांचा प्रस्ताव छपाईकामी मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मंजूर झाला आहे. मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता मिळणे, दरपत्रके मागविणे अशा कामासाठी वेळ जाणार असल्याने, तसेच नाशिक- त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळयात साईभक्तांची गर्दी मोठया प्रमाणात संभव असल्याने सध्या श्रावणमास सुरु असल्याने भक्तांची चांगल्या प्रमाणात गर्दी, विचारात घेता खालील पुस्तकांची तातडीने छपाई करुन घेणे गरजेचे आहे. पुनरमुद्रण करावयाची पुस्तके/फोटो शिल्लक साठा,अंदाजे किती महिने साठा पुरेल व प्रस्तावित छपाई याबाबतचे परिशिष्ट खालील प्रमाणे.

| अ. नं. | छपाई तपशिल | भाषा | वार्षिक विक्री | शिल्लक स्टॉक | दरमहा सरासरी विक्री | किती महिने पुरेल | नवीन छपाई संख्या | मागिल छपाई दर | अंदाजे छपाई दर | अंदाजे छपाई एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | शिलधी आवृत्ती क्र.०५ | मराठी | १५७९ | ८०० | २०० | २ | १००० | ११.०० | १५.०० | १५०००.०० |
| ०२ | मुलांचे साईबाबा आवृत्ती क्र.०५ | इंग्रजी | ४०९५ | ३०० | ३४१ | १ | ५००० | ८.१५ | १०.०० | ५००००.०० |
| ०३ | मुलांचे साईबाबा आवृत्ती क्र.०८ | तामिळ | ५४२४ | ० | ४५२ | ० | ५००० | ६.९० | १०.०० | ५००००.०० |
| ०४ | श्री साईलीलामृत आवृत्ती क्र.०३ | गुजराती | ६९६ | १० | ५८ | ० | १००० | ३२.१७ | ४०.०० | ४००००.०० |
| ०५ | श्री साईबाबा अवतार व कार्य | मराठी | ३७३८ | १००० | ३११ | ३ | ५००० | ९.०० | १५.०० | ७५०००.०० |
| ०६ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती आवृत्ती क्र.१६ | इंग्रजी | ५२३१ | ० | ४३५ | ० | ५००० | १२.९४ | २०.०० | १०००००.०० |
| ०७ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती | गुजराती | ४०२३ | ० | ३३५ | ० | ५००० | ३.६० | १०.०० | ५००००.०० |
| ०८ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती आवृत्ती क्र.०२ | ओडिया | २००० | ० | २०० | ० | १०००० | ८.०० | १०.०० | ५००००.०० |
| ०९ | श्री साईनाथ सगुणोपासना आरती आवृत्ती क्र.८ | तामिळ | ५२४६ | ४० | ४३७ | ० | ५००० | ११.७० | २०.०० | १०००००.०० |
| १० | श्री साईनाथ सगुणोपासना आरती आवृत्ती क्र.४ | बंगाली | २००० | ४० | ८६ | ० | २००० | १०.८० | १५.०० | ३००००.०० |
| ११ | श्री साईनाथ स्ववनमंजीरी आवृत्ती क्र.४ | तेलगू | ३२८३६ | १२०० | २७३६ | ० | ५००० | ३.३० | ५.०० | २५०००..०० |
| १२ | श्री साईलीलामृत आवृत्ती क्र.१२ | हिंदी | ८९९५ | ९५ | ८३३ | ० | २००० | १९.२० | २५.०० | ५००००.०० |
| १३ | खापर्डे डायरी आवृत्ती क्र. ०६ | तामिळ | ५००० | ० | ४१६ | ० | २००० | १७.०० | २५.०० | ५००००.०० |
| १४ | खापर्डे डायरी आवृत्ती क्र.०७ | हिंदी | ३००० | ० | २५० | ० | १००० | १३.८० | २०.०० | २००००.०० |
| १५ | श्री साईबाबा ऑफ शिर्डी प्रधान आवृत्ती क्र.१४ | इंग्रजी | २०१४ | ० | २०० | ० | १०००० | ७.०० | १०.०० | १०००००.०० |
| १६ | श्री साईनाथ स्तवनमंजरी आवृत्ती क्र.१० | हिंदी | ३४९६८ | ० | २९१४ | ० | २८००० | २.९७ | ५.०० | १४००००.०० |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | एकुण रु. | ९,९५,०००.०० |

प्रस्तावित छपाईकामी विहीत पध्दतीनुसार वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागवून, निम्नतम दराने छपाई कार्यादेश देणेत येतील. याकामी अंदाजे रु.९,९५,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. प्रस्तावास मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळालेनंतर, मा.मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल मा. उच्च न्यायालयाचे मान्यतेनंतर विहीत पध्दतीने छपाईची कार्यवाही करण्यात येईल.

सन २०१५-१६ चे अंदाज पत्रकात पुस्तके/फोटो/श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईसाठी केलेल्या रु.७०००००००/- (अक्षरी रुपये सात कोटी) चे अंदाज पत्रकातील तरतूदीमधून उक्त कामासाठीचा छपाई खर्च करता येईल. सदर पुस्तके/ फोटोंची विक्री केली जात असल्याने खर्चाची भरपाई होते.

सबब प्रस्तावित पुस्तके/फोटो छपाईकामी खालील बाबींवर निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेस मान्यतेसाठी सादर.

०१) छपाईकामी येणा-या रु.९,९५,०००/- (अक्षरी रुपये. नऊ लाख पंच्यानव हजार) मात्रचे खर्चास मान्यता असावी.

०२) जनसंपर्क कार्यालयाव्दारा वत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करणेकामी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता असावी.

०३) विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून छपाई कार्यवाही करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.२९८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या संस्थान प्रकाशित पुस्तकांचा साठा संपत आलेला असल्यामुळे सदरहू पुस्तकांचे पुनर्मुद्रण करणेकामी संस्थान वकिलामार्फत पूर्वीच मा.उच्च न्यायालयामध्ये अर्ज दाखल करणेत आलेला असून, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशास अधीन राहून सदरहूकामी ई-निविदांची मागणी करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

विषय नं.११ **दर्शनार्थ साईभक्तांना वाटप करावयाचे मोफत लाडू प्रसाद ऐवजी मोफत सुटी बुंदी प्रसाद हा शब्द बदल करणेस मा.उच्च न्यायालयाचे परवानगीबाबत.**

प्रस्ताव- मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६-०७-२०१३ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.५३७ खालीलप्रमाणे-

''यावर सर्विस्तर चर्चा होऊन श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना रांगेत उभे रहावे लागते व पुन्हा रांग लावूनच लाडू प्रसाद घ्यावा लागतो यामध्ये परत-परत रांगेमध्ये उभे रहाण्याचा साईभक्तांना त्रास होतो. हा साईभक्तांचा त्रास कमी व्हावा व त्यांना विनामुल्य प्रसाद मिळावा तसेच संस्थानला दररोज मिळणा-या उत्पन्नाचा विचार करता लाडूप्रसाद साईभक्तांना मोफत देता येईल व या निर्णयाने भक्तांना समाधान मिळेल असे समितीला वाटते. '' विद्यमान मा.उच्च न्यायालयाची परवानगी मिळाल्यास दि.१५ ऑगस्ट या शुभ दिनापासून या निर्णयाची अंमलबजावणी करणेत येईल याकरीता विधी विभागामार्फत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात परवानगीसाठी अर्ज दाखल करणेत यावा. ''

त्यानुसार दि.१५-०८-२०१३ रोजी पासून साईभक्तांना मंदिर दर्शन लाईनमध्ये १०० ग्रॅम वजनाचे पाकिट (दोन लाडू) मोफत देण्याची कार्यवाही सुरु झाली. त्यास मा.उच्च न्यायालयाने दिनांक १२ ऑगस्ट २०१३ रोजी परवानगी दिलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि. ११/०९/२०१४ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.८०३ खालीलप्रमाणे-

'दर्शन रांगेमध्ये साईभक्तांना १०० ग्रॅम वजनाचे पाकिट (दोन लाडू) ऐवजी त्याच वजनाच्या सुटी बुंदीचे पाकिट प्रसाद रुपाने देण्यास मान्यता देण्यात आली.' मात्र सदरहु निर्णयात लाडू ऐवजी सुटी बुंदी वाटप करणेस मा.उच्च न्यायालयाची परवानगी घेणेत यावी असा उल्लेख नव्हता. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाचे परवानगीसाठी न्यायालयात अर्ज सादर करणेत आलेला नाही.

सदरची बाब मा.उच्च न्यायालयाचे निदर्शनास आणून देणे व त्यांची परवानगी घेणे आवश्यक आहे

सध्या सुटी बुदी निर्मितीचे दरमहा येणारे मजूरी बिल अदाईसाठी अडचणी येत आहेत. तरी लाडू ऐवजी सुटी बुंदी वाटपास मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळणेकामी मा.उच्च न्यायालयात संस्थान विधी विभागामार्फत सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन रितसर मान्यता घेणेस मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर,

निर्णय क्र.२९९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत मा.उच्च न्यायालयामध्ये सिव्हील अर्ज दाखल करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, लाडू व बर्फी निर्मिती विभाग/ विधी अधिकारी)

---

विषय नं.१२ **श्री साईबाबा हॉस्पिटल तसेच श्री साईनाथ हॉस्पिटल येथील संपुर्ण ए.सी. यंत्रणेचे सन २०१५-१६ या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कान्ट्रॅक्ट देणेसाठी मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये सर्व ऑपरेशन थिएटर्स व आय.सी.सी.यु. मध्ये सेंट्रल ए.सी. प्लांटच्या एकूण 13 यंत्रणा तसेच स्प्लिट टाईप ए.सी. एकूण 71 नग, मॉरच्युरी 2 नग, मेडीसीन कोल्ड स्टोअर 1 नग आणि डोमेस्टिक फ्रिज एकूण 26 नग कार्यान्वित आहे. त्याचप्रमाणे श्री साईनाथ हॉस्पीटलमध्ये स्प्लिट टाईप ए.सी. एकूण 38 नग आणि डोमेस्टिक फ्रिज एकूण 24 नग कार्यान्वित आहे. ऑपरेशन शिएटरमध्ये ऑपरेशन करतेवेळी व नंतर आय.सी.यु. वॉर्डमध्ये ठेवण्यात येते. काही वेळा या यंत्रणेमधील काही स्पेअरपार्ट खराब झाल्यास ते तातडीने बदलणे गरजेचे असते. त्याकरीता सदरचे स्पेअरपार्टची खरेदी करावी लागते. प्रत्येक कंपनीचे स्पेअरपार्ट हे दुस-या कंपनीच्या स्पेअरपार्ट पेक्षा वेगळे असल्याने तसेच सदरचे स्पेअरपार्ट हे जवळपास उपलब्ध होत नसल्याने ते थेट मुंबई, पुणे येथून खरेदी करावे लागतात. त्यामुळे हे स्पेअरपार्ट मिळवून फिटींग करुन यंत्रणा कार्यान्वित होईपर्यत पर्यायाने ए.सी. यंत्रणा काही वेळा बंद ठेवावी लागते अथवा कमी क्षमतेवर कार्यान्वित ठेवावी लागते. सदरचा स्पेअरपार्ट उपलब्ध झाल्यानंतर तो बसवून ए.सी. यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यान्वित केली जाते किंवा एखाद्या वेळी संबंधीत कंपनीचे प्रतिनिधी यांना बोलावून दुरुस्ती करुन घ्यावी लागते.

मागील सन 2014-2015 या वर्षाकरीता मा. त्रिसदस्यीय समितीचे दिनांक 12/06/2015 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 460 अन्वये श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकामी मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांना जा.नं. एसएसएसटी/मेकॅनिकल/3236/2014 दिनांक 7 आक्टोबर, 2014 अन्वये अन्वये 10,00,000/- इतक्या रकमेचा दिनांक 01/10/2014 ते 30/09/2015 या कालावधीकरीता कार्यादेश देण्यात आला होता. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट कालावधीमध्ये त्यांनी सर्व्हीस दिली असून, सर्व यंत्रणा सुरळीत कार्यान्वित आहेत. या सर्व्हीस कॉन्ट्रॅक्टचा कालावधी दिनांक 30/09/2015 रोजी संपत आहे.

आता, श्री साईबाबा हॉस्पीटल तसेच श्री साईनाथ हॉस्पीटल येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे सन 2015-2016 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) दिनांक 01/10/2015 ते 30/09/2016 या कालावधीसाठी देणेकामी पुढीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे :

| Sr. No. | Description | Qty | Unit Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 1. | Annual Compressive Maintenance Contract of Central AHU with Condensing Units & Other Air Conditioning Units installed Shri Saibaba Hospital & Sainath Hospital other equipment as per attached list. | 1 Job | 14,00,000/- | 14,00,000/- |

उपरोक्तप्रमाणे श्री साईबाबा हॉस्पीटल तसेच श्री साईनाथ हॉस्पीटल येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे सन 2015-2016 या कालावधीकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) दिनांक 01/10/2015 ते 30/09/2016 या कालावधीसाठी देणेकामी अंदाजे रक्कम रुपये 14,00,000/ (अक्षरी रुपये चौदा लाख) मात्र खर्च येणे अपेक्षित आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 07/08/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 676 नुसार "साईभक्तांना, रुग्णांना सेवा देण्यात येत असलेल्या सोयी-सुविधाकरीता आवश्यक असणा-या सर्व सेवांसाठी लागणारी सर्व मशीनरी / उपकरणे व तत्सम यांत्रिक सर्व बाबी यांची AMC, CAMC, इतर दुरुस्ती यासाठी येणारा खर्च तसेच मालमत्ता कर, रेग्युलर टॅक्सेस, कायदेशीर जबाबदारीने भरावयाच्या रकमा यासारखे रक्कम रुपये 1 कोटी पर्यंतचे खर्च मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचे मान्यतेमधून वगळणेत यावेत" असा निर्णय झालेला आहे.

तरी श्री साईबाबा हॉस्पीटल तसेच श्री साईनाथ हॉस्पीटल येथील संपूर्ण ए.सी. यंत्रणेचे सन 2015-2016 या वर्षाकरीता वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट (CAMC) देणेकरीता येणा-या अपेक्षित रुपये 14,00,000/- खर्चास, कामास व वर्तमानपत्रात जाहीरात देऊन ई-निविदा मागविणेकामी मान्यतेसाठीचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३०० **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल तसेच श्री साईनाथ हॉस्पिटल येथील संपुर्ण ए.सी. यंत्रणेचे सन २०१५-१६ साठी वार्षिक कॉम्प्रेसिव्ह सर्व्हिस कान्ट्रॅक्ट देणेकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी. त्याबरोबरच मा.उच्च न्यायालयाचे आदेशास अधीन राहून ई-निविदा प्रक्रिया सुरु करावी व मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक/ विधी अधिकारी)

---

विषय नं.१३ **संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेबाबत.**

प्रस्ताव- मा.कोर्ट रिसिव्हर यांचे काळापासून दरवर्षी संस्थान कर्मचा-यांना त्यांच्या पाल्याचा शैक्षणिक शुल्काचा परतावा दिला जातो.

मा व्यवस्थापन मंडळाचे दि.२१/०४/१९९६ चे सभेतील निर्णय क्रं. ८९ (१) अन्वये, मार्गदर्शक तत्वे वजा नियमावली ठरविण्यात आलेली आहे. सदरच्या मार्गदर्शक तत्वानुसार सध्या शैक्षणिक शुल्काचा परतावा देण्याची कार्यवाही चालू आहे. निर्णय क्रं ८९ (१) "शासनाने विद्यापिठांनी केवळ गुणवत्तेच्या निकषावर (On Merit Basis) भरण्यात येणा-या (सुमारे ५०% पर्यंतच्या) जागांवर प्रवेश दिल्या जाणा-या विद्यार्थ्यांसाठी (निम्न दराने) निर्धारीत केलेल्या फी दर रकमेपर्यंतच, मर्यादीत असावा", असा आहे. यास अनुसरुन शासकीय/ शासन अनुदानित अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या शुल्काच्या मर्यादेपर्यंत शैक्षणिक शुल्क रकमेचा परतावा दिला जातो. तसेच ज्यु. केजी ते इयत्ता १० वी (इंग्रजी माध्यम) व आयटीआय या अभ्यासक्रमांचा शैक्षणिक शुल्काचा परतावा संस्थानच्या शाळेच्या दराचे मर्यादेपर्यंत अदा केला जातो.

शासन मंजूरी क्रं.सासंवि २००७/२४२/(६०)-का.सोळा, मंत्रालय मुंबई दि.१६ जूलै २००९ अन्वये, विधी व न्याय विभाग मंत्रालय मुंबई यांनी, सदर योजना मा व्यवस्थापन मंडळाचे सन १९९६ चे सभेतील निर्णयाप्रमाणे संस्थान कर्मचा-यांना लागू आहे, त्याच धर्तीवर ती यापुढेही प्रचलीत पध्दतीने चालू राहील, अशी मंजूरी दिलेली आहे.

उपरोक्त शासन मंजूरीस अनुसरुन संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या परताव्याबाबत मा. त्रिसदस्य समितीचे दि.२६/०६/२०१४ चे सभेतील निर्णय क्रं. ५३९ अन्वये सन २०१४-२०१५ चा शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेसाठी रुपये ५०,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास लाख मात्र) खर्चास मान्यता दिलेली होती. त्यास अनूसरुन शैक्षणिक शुल्काच्या परताव्यासाठी एकूण रुपये २७,७९,२११/- (अक्षरी रुपये सत्ताविस लाख एकोणऐंशी हजार दोनशे अकरा मात्र) प्रत्यक्ष खर्च झालेला आहे.

आता सन २०१५-२०१६ या वर्षाचा कर्मचा-यांच्या पाल्याचा शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेकरीता बजेटमध्ये रुपये ३५ लाख रकमेची तरतूद करणेत आलेली आहे.

तरी उपरोक्त शासन मंजूरीस अनुसरुन प्रचलित पध्दतीप्रमाणे कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेस व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता असावी ही विनंती.

निर्णय क्र.३०१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासन मंजूरीस अनुसरुन प्रचलित पध्दतीप्रमाणे कर्मचा-यांच्या पाल्यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा शैक्षणिक शुल्काचा परतावा करणेस व त्यासाठी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या आदेशानंतर पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०३)

---

विषय नं.१४ **सन २०१५-१६ करीता प्रसादालय, कॅन्टीन, लाडू निर्मिती व मंदिर विभागांसाठी आवश्यक किराणा माल खरेदीकामी फेर निविदा प्रकियेबाबत.**

प्रस्ताव- सन २०१५-१६ (एप्रिल-२०१५-१६) करिता वार्षीक खरेदीकामी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. त्यातील उर्वरित एकुण ३३ आयटेमसाठी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आली होती. याकामी दि.२/७/२०१५ रोजी तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या होत्या. यामध्ये काही निविदाधारक अपात्र ठरले आहेत. पात्र निविदाधारकांच्या मूळ ई-निविदा दि.२०/७/२०१५ रोजी उघडण्यात आल्या होत्या. त्याचा ईनिविदेद्वारे प्राप्त झालेला तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे.

(१) सदर ई-निविदा तक्त्यातील अ.नं.२७-चहा पावडर, व अ.नं.३४ ड्रिंकिंग वॉटर १ लिटर व ड्रिंकिंग वॉटर ५०० मिलि. या तीनच आयटेमसाठी तीन किंवा तीनापेक्षा जास्त निविदाधारक आलेले आहेत. तर अ.नं.१८ व अ.नं.२५ वर किराणा मालाचे ग्रुप नमूद आहेत. अ.नं.१४ चे आयटेमसाठी कुणीही निविदा सादर केलेली नाही. उर्वरित ३० आयटेमसाठीचे काही निविदाधारक अपात्र तर काही आयटेमसाठी एक किंवा दोन निविदाधारकांनी दर भरलेले आहेत. त्यामुळे सदर ३० आयटेम्साठी अल्पमुदतीची फेरनिविदा प्रक्रिया तिस-यांदा करण्यात येत आहे.

(२) सदर ई-निविदा तक्त्यातील अ.नं. २७ चहा पावडरसाठी निविदेमध्ये टाटा/ब्रुक बॉण्ड/सोसायटी/लिप्टन या कंपन्यांचे दर मागविले होते. या प्रक्रियेमध्ये एकुण चार निविदाधारकांनी भाग घेतला होता. त्यामध्ये मे.इंडिया सेल्स कॉर्पोरेशन, पुणे यांचे चहा पावडर साठी न्युनतम दर रु.१६,४००/- प्रती क्विंटल आलेले आहेत. त्यांनी संस्थानचे निविदा फॉर्ममध्ये मालाचे नमुने प्लॅस्टिक बरणीमध्ये स्वाक्षरीसह सिलबंद करुन, बरणीवर त्यातील मालाचे नांव/प्रकार तसेच आपले फर्मचे नांव लिहिलेले असावे, अशी अट असल्यामुळे चहा पावडरचे पाकिट फ्रोडून चहाचा नमुना लुंज करुन प्लॅस्टिक बरणीमध्ये चहा पावडरचा नमुना दिलेला असून बरणीवर त्यांचे फर्मचे नांव व त्यावर SOCIETY TEA POWDER (DUST) असे स्टिकरवर नमुद केले आहे. यावर चर्चा होऊन त्यांचेकडून कंपनी पॅकिंग त्वरीत घेण्यात यावे व सदर पॅकिंगमधील चहा पावडर व नमुना सारखाच आहे किंवा नाही, याची खात्री करावी, असे ठरले. त्यानुसार त्यांनी अमर डस्ट चहा पावडरचे २५० ग्रॅम पॅकिंगचे दोन पॅकेट नमुन्यादाखल सादर केलेले आहेत. सदर नमूने सोसायटी कंपनीचेच आहेत असे त्यांनी सांगितले.

या चहा पावडरचे पॅकिंगवर सोसायटी ब्रॅण्डचा कुठेही उल्लेख नाही. फक्त वेबसाईट www.societytea.com असे नमुद आहे. त्यांनी दि.२१.०७.२०१५ चे ई-मेलव्दारे पत्र सादर केले असून त्यात त्यांनी अमर ब्रॅण्ड व सोसायटी ब्रॅण्ड हे अमर टी प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई या कंपनीचेच दोन ब्रॅण्ड असलेबाबत कळविले आहे. मे. इंडिया सेल्स कॉर्पोरेशन, पुणे यांनी सदरचा चहा पावडरचा पुरवठा पाच किलोचे पॅकिंगमध्ये करणार असलेबाबत समक्ष सांगितले आहे. मात्र सदर चहा पावडरचा ब्रॅन्ड संस्थानच्या ई-निविदेमध्ये नमूद केलेला नाही.

सदर कंपनीची वेबसाईट बघीतली असता यामध्ये अमर डस्ट व सोसायटी टी डस्ट असे दोन ब्रॅण्ड दिसत आहेत. सोबत प्रत अवलोकनार्थ सादर केली आहे. याबाबत संबंधीत निविदाधारक यांना विचारले असता ते अमर डस्ट टी पुरविणेस तयार आहेत. सोसायटी टी पावडर डस्टचा दरही जास्त असल्याचे व या दरात पुरवू शकत नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. मात्र त्यांनी चहाचा जो नमुना संस्थानकडे सादर केला आहे त्यावर सोसायटी टी पावडर डस्ट असे लिहिले असून सदर चहा लूज करुन बरणीत भरलेला आहे. त्यामुळे याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

सदर निविदेमध्ये चहा पावडरसाठी L2 मे.श्री स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगांव यांचा टाटा-अग्नी या ब्रॅण्डसाठी दर रु.१७,२००/- प्रती क्विंटल, L3 मे.श्री शिवसाई केटरर्स अ‍ॅण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर्स, शिर्डी यांचा टाटा-अग्नी या ब्रॅण्डसाठी दर रु.१७,५००/- प्रती क्विंटल, L4 मे.रामनाथ जगन्नाथ अ‍ॅण्ड कंपनी, नाशिक यांचा ब्रुक बॉन्ड-ताजा या ब्रॅण्डसाठी रु.१७,९५०/- प्रती क्विंटल असे दर आलेले आहेत.

सध्या संस्थान टाटा कंपनीच्या अग्नी ब्रॅण्डची चहा पावडर प्रती क्विंटल रु.१७,२००/- दराने ऑक्टोबर-२०१४ पासून खरेदी करीत आहे.

(३) अ.नं. ३४ पॅकेज्ड ड्रिकींग वॉटर १ लिटरसाठी न्युनतम दर रु.६.२० पैसे व ५०० मिली साठी न्युनतम दर रु.४.७० पैसे असा असून, मे.पुष्कर ट्रेडर्स, शिर्डी, मे.साई अ‍ॅग्रो इंडस्ट्रि, टाकळी व मे.श्री स्वामी समर्थ डिस्ट्रिब्युटर्स, तिसगांव या तीन निविदाधारकांचे समान दर आल्याने त्यांना समप्रमाणात विभागून पुरवठा आदेश देता येतील.

(अ) वरील अ.नं.१ ची नोंद घेण्यात यावी. ही विनंती.

(ब) वरील अ.नं.२ मध्ये सविस्तर नमुद केल्या प्रमाणे ई-निविदा तक्त्यातील अ.नं.२७ चहापावडर सोसायटी ब्रॅन्ड ऐवजी अमर डस्ट चहा पावडर रु.१६,४००/- प्रती क्विंटल दराने मे.इंडिया सेल्स कॉर्पोरेशन, पुणे

यांचेकडून खरेदी करावा अगर L2 निविदाधारक मे.श्री स्वामी समर्थ एजन्सीज,कोपरगांव यांच्याकडून रक्कम रु.१७,२००/- प्रती क्विंटल दराने चहा पावडर खरेदी करावी अगर फेर निविदा प्रक्रिया करावी अगर कसे?

(क) वरील अ.नं.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे ई-निविदा तुलनात्मक तक्त्यातील अ.नं. ३४ व ३५ पॅकेज्ड ड्रिंकींग वॉटर १ लिटर व ५०० मिलीसाठी तीन निविदाधारकांचे समान दर आल्याने त्यांना समप्रमाणात विभागून पुरवठा आदेश देण्यास मान्यता मिळावी ही विनंती.

तरी उपरोक्त "ब" व "क" बाबत योग्य तो निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३०२ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, कॅन्टीन विभागासाठी आवश्यक असलेली चहा पावडर खरेदीकामी विहीत पध्दतीने फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी. तसेच ०१ लिटर व ५०० मिली पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरसाठी तीन निविदाधारकांचे समान निम्नतम दर आलेले असल्या कारणाने त्यांना समप्रमाणात विभागून पुरवठा आदेश देण्यात यावा.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

विषय नं.१५ **गाईचे गावरान तुप खरेदीबाबत.**

प्रस्ताव- माहे एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ अखेर ७५०० क्विंटल गावरान तुप खरेदीकामी मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ०७.०५.२०१५ चे निर्णयानुसार मान्यता मिळालेली आहे. सदर निर्देशास अनुसरुन मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १९.०६.२०१५ चे सभेत ठरल्याप्रमाणे सध्याची तातडीची तुपाची गरज लक्षात घेऊन फक्त तीन महिन्यांपुरते २५०० क्विंटल गावरान तूप खरेदी करावे, त्यानंतर सदर कंपनीला मुदतवाढ देणे अथवा अन्य पर्यायाबाबत नंतर निर्णय घेता येईल". असे ठरले होते.

सदर निर्णयानुसार इकडील जा.नं.एसएसएसटी/वशी-खरेदी/१६९०/२०१५ दिनांक २५.०६.२०१५ अन्वये मे.कोल्हापुर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, गोकुळ शिरगाव, कोल्हापूर यांना रु.३१,९००/- प्रती क्विंटल दराने ३ महिन्यांसाठी २५०० क्विंटल गावराण तूप पुरविणेबाबत पुरवठा आदेश देण्यात आला होता.

तथापि माहे जुलै महिन्यासाठी लाडू विभागाचे मागणीनुसार १२०० क्विंटल तूपाचे खरेदी चलन देण्यात आलेले होते व त्याप्रमाने आवश्यकतेनुसार टप्याटप्याने तूप खरेदी करण्यात येत आहे. आज दि.३१.०७.२०१५ अखेर पर्यंत वरील खरेदी चलनापैकी ८४० क्विंटल तूप मे.कोल्हापुर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, गोकुळ शिरगाव, कोल्हापूर यांचेकडून घेण्यात आलेले आहे.

लाडू निर्मिती विभागाने सिंहस्थ कुंभमेळा गर्दी विचारात घेऊन माहे ऑगष्ट महिण्यासाठी १५०० क्विंटलची मागणी केलेली आहे. माहे जुलै-२०१५ ते मार्च-२०१६ या ९ महिण्यांसाठी ७५०० क्विंटलची मागणी होती म्हणून ३ महिन्यांसाठी २५०० क्विंटल पूरवठा आदेश देण्यात आला होता. परंतु सिंहस्थ कुंभमेळयामुळे जादा आवश्यकता पडेल या हिशोबाने वरील २५०० क्विंटलची मागणी २ महिन्यात पुर्ण होईल. त्यामुळे पुढील कालावधी सप्टेंबर-२०१५ ते मार्च-२०१६ या कालावधीसाठी गाईचे गावरान तूप खरेदीबाबत तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे.

प्र.अधिक्षक, लाडू निर्मिती विभाग व प्रत्यक्ष गाईचे गावरान तूप वापरणारे कंत्राटदार मे. साई सिध्दी महिला बचत गट, शिर्डी व मे. श्री साई केटरर्स, श्रीरामपूर यांनी "गोकुळ" तूप वापराबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत. व पुढील ७ महिन्यांचे कालावधीसाठी ६००० क्विंटल गावरान तुपाची मागणी नोंदविलेली आहे.

- गावरान तूपाचा सुगंध येतो.
- बुंदी तळत असतांना तूप फेसळत नाही.
- बुंदीला कडवटपणा जाणवत नाही.
- बुंदी तळतांना तूपाचा धूर होत नाही.
- तळलेली बुंदी खाण्यास चवदार लागते.

सदरील गावरान तूपाची गुणवत्ता योग्य दिसून येते. सबब सदर गावरान तूप बुंदीप्रसाद/ मोतीचूर लाडू करीता वापरणे योग्य आहे असे आम्हांस वाटते.

तरी वरील अभिप्राय व मागणीस अनुसरून या पुढील कालावधीकरीता (ऑक्टोबर २०१५ ते मार्च २०१६) मे.कोल्हापूर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापूर यांचेकडून ५००० क्विंटल सध्याचे मंजूर दराने (रू.३१,९००/- प्रति क्विंटल) गावरान तूप खरेदी करावे अगर कसे? याबाबत योग्य तो निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३०३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित अभिप्राय व मागणीस अनुसरून ऑक्टोबर २०१५ ते डिसेंबर २०१५ या कालावधीकरीता आवश्यक असलेले गावरान तुप मे.कोल्हापूर जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापूर यांचेकडून मागील मंजुर दराने खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

विषय नं.१६ **मे.सुरभी डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद यांच्या पेपरकप पुरवठा.. सुरक्षा अनामत रकमेबाबत.**

प्रस्ताव- माहे ऑक्टोबर-२०१४ ते मार्च-२०१५ या कालावधीकरीता कॅन्टीन विभागासाठी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०९.१०.२०१४ रोजीचे सभेतील निर्णयाप्रमाणे मे.सुरभी डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद यांना पेपरकप (१०० मी.ली., २००

जी.एस.एम.) न्युनतम दराने २,००,००,००० (दोन कोटी) नग पुरविणेकामी इकडील जा.नं.३७९९/२०१४ दिनांक १२.११.२०१४ अन्वये पुरवठा आदेश देणेत आलेला होता.

मे.सुरभी डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद यांनी ३०/१२/२०१४ रोजी संस्थानला पुरविलेले पेपरकप हे संस्थानच्या पुरवठा आदेशाप्रमाणे पेपरकपचा पुरवठा न केल्याने, निविदा अटी व शर्ती नुसार त्यांची सुरक्षा अनामत रक्कम रु.३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख मात्र) दि.३/६/२०१५ रोजीचे सविस्तर टिपणीवरील आदेशाप्रमाणे जप्त करण्यात आली असून तसे त्यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/खरेदी/२०१९/२०१५ दि.११/७/२०१५ चे पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

सदरची सुरक्षा अनामत रक्कम परत मिळावी म्हणुन मे.सुरभी डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद यांनी मा.अध्यक्ष महोदय यांना दि.१४/७/२०१५ पूर्वनिश्चित डिपॉझिट मागणी पत्राद्वारे कळविले आहे व त्याची प्रत मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांना पाठविली आहे.

मा.अध्यक्ष महोदय यांनी दि.१६/७/२०१५ रोजीचे पत्रान्वये वरील पत्राबाबत योग्य कार्यवाही करणेबाबत मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांना कळविले आहे. सदर पत्रावर मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांनी कृपया त्वरित सादर करणे असे निर्देश दिलेले आहेत.

त्यास अनुसरुन मे.सुरभी डिसट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांनी वरील पत्रामध्ये उपस्थित केलेले मुद्दे व त्यासमोर वस्तुस्थिती नमुद केलेली आहे.

| मुद्दा क्र. | उपस्थित केलेले मुद्दे | खुलासा |
|---|---|---|
| ०१. | आपले ऑक्टोबर-२०१४ ते मार्च-२०१५ Various grocery Items चे टेंडर होते. त्यामध्ये पेपरकपचाही समावेश होता. | सन २०१४-१५ (ऑक्टो-१४ ते मार्च-१५) करिता प्रसादालय,लाडू निर्मिती, कॅन्टीन व मंदिर विभागाकरिता किराणामाल पुरविणेबाबतची ई-निविदा प्रसिध्द केलेली होती. त्यामध्ये पेपर कपचीही निविदा मागविलेली होती. |
| ०२. | मे.सुरभी डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद ही फर्म house wife चालवत असून आपल्या ई- Tender form मध्ये पान नं.६ व अ.नं.३२ वर (Paper cup with Poly Ethinil Coated, 180 gsm., (+-5) १०० मिली. असे नमुद केलेले होते. | सदर निविदेमध्ये अटी व शर्ती क्रं.३२ मध्ये पेपर कप पॉली इथीलीन कोटेड, १८० gsm., (+-5), १०० मिली क्षमता असे नमुद असुन BOQ मध्ये २०० gsm., (+-5) असे नमुद होते. ही वस्तु स्थिती आहे. |
| ०३. | माझे प्रतिनिधीने रु.३,००,०००/- मात्रचा डी.डी. व संबंधित कागदपत्रे आपल्या कार्यालयाकडे सादर केले. | सदर निविदेचा ऑनलाईन दर भरणेचा कालावधी दि.०६.०९.२०१४ ते २०.०९.२०१४ असा होता. निविदेसोबत दिलेल्या मालाचे नमुने व स्कॅन करुन जोडलेल्या तांत्रीक कागदपत्रांच्या प्रती सादर करण्याची मुदत दि.२०.०९.२०१४ रोजी सायं ०५.०० पर्यंत होती. त्यांनी दि.१९.०९.२०१४ रोजी पेपर कप नमुना व कागदपत्रे संस्थानकडे सादर केलेली आहेत. |
| ०४. | दिनांक २२.०९.२०१४ रोजी खरेदी विभाग कार्यालयात पेपरकपचे नमुने देण्यात आले. त्यावेळी टेंडर फॉर्ममध्ये पेपरकप १८० gsm व financial bid चार्टमध्ये २०० gsm नमूद असून दोन्हीमध्ये फरक असल्याचे श्री.बाबुराव कोते यांच्या लक्षात आणून दिले होते. मात्र त्यावेळी खरेदी विभागाकडून मला Sample Verification केल्यानंतर हा विषय finalize होईल, असे सांगण्यात आले होते. | सदरची निविदा दि.०६.०९.२०१४ ते २०.०९.२०१४ पर्यंत महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online दर भरण्यासाठी उपलब्ध होती. मे.सुरभी डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद यांनी २०.०९.२०१४ पुर्वीच Online २०० जी.एस.एम.साठी दर भरलेले असल्याने त्यांनी त्यापुर्वीच याबाबत खात्री करुन घेणे गरजेचे होते. कारण मे.सुरभी डिस्टीब्युटर्स औरंगाबाद यांनी प्रत्यक्षात दि. १९/९/२०१४ रोजी पेपर कप नमुना व तांत्रिक निविदेसोबतचे कागदपत्र शिर्डी येथे संस्थानकडे जमा केलेली आहेत. नमुने जमा केलेची नोंद, नमुने नोंद रजिस्टरला दि.१९/९/२०१४ रोजी नोंद आढळून येते. |
| ०५. | मला याचे निखालस आश्चर्य वाटते की, मी पेपरकपचे १८० gsm चे sample दिलेले असूनसुध्दा संस्थानने माझे टेंडर मान्य करुन मला पेपरकप पुरविणेकामी दिनांक ३०.१२.२०१४ रोजी पुरवठा आदेश दिलेला आहे व दिनांक २९.१२.२०१४ रोजी पेपरकप पुरविण्याची दुरध्वनीवरुन विनंती केली आहे. त्यास अनुसरुन मी दिनांक ३०.१२.२०१४ रोजी माल पुरविला होता. | सदर निविदा प्रक्रियेमध्ये मे.सुरभी डिसट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांचे दर इतर निविदाधारकांपेक्षा तुलनात्मकदृष्टया कमी असल्यामुळे, संस्थानने मे.सुरभी डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद यांना जा.नं.३७९९/ २०१४ दि.१२/११/२०१४ अन्वये पेपरकप, पॉली इथिलीन कोटेड, १०० मी.ली.क्षमता, २०० जी.एस.एम. असा पुरवठा आदेश दिलेला होता. सदरचे पुरवठा आदेशास अधिन राहुन त्यांनी संस्थानला पेपरकपचा पुरवठा केला होता. |
| ०६. | आपल्या कार्यालयाकडून मला दिनांक ०५.०१.२०१५ रोजी पेपरकप specifications जुळत नसल्याचे व पुरवठा केलेले पेपर कप reject केल्याचे कळविले | मे.सुरभि डिसट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांचेकडून प्राप्त झालेले पेपरकप हे संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार खरेदी, भांडार व कॅन्टीन विभाग अधिक्षक यांचेमार्फत तपासून ते सकृतदर्शनी |

| | | |
|---|---|---|
| | आहे. त्यावेळी सुध्दा मी E-Tender चे वेळेस जे sample दिले होते, त्याच्या अनुरुपतेप्रमाणेच पेपर कप पुरविलेले असल्याचे सांगितले होते. | योग्य असल्यामुळे स्विकारण्यात आलेले होते. सदर प्राप्त पेपरकपांमधून १२,००० नग पेपरकप कॅन्टीन विभागास वापरावयास दिले असता, त्यांनी ते पेपरकप वापरुन योग्य असलेबाबत दुरध्वनीव्दारे अभिप्राय दिला. तसेच त्याबाबत माल तपासणी रजिस्टरला स्वाक्षरी केलेली होती. त्यानंतर दक्षता पथकातील सदस्य श्री.झिरपे साहेब यांनी प्राप्त पेपरकपांमधून काही पेपरकप दि.३०.१२.२०१४ रोजी तपासणीसाठी नेले होते. त्यानुसार त्यांनी दि.०१.०१.२०१५ रोजी दुपारी ०४.०० वा. दुरध्वनीव्दारे पेपरकप हे पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणे नसल्याचे सांगितले होते. त्यामुळे लगेचच ईमेलद्वारे पेपर कप नाकारल्याचे व पुरवठा आदेशामध्ये दिलेल्या स्पेशिफिकेशन प्रमाणे पेपर कपचा पुरवठा करण्याचे कळविण्यात आले होते. |
| ०७. | लोकल मार्केटमध्ये १०० मी.ली. पेपरकपासाठी २०० gsm paper उपलब्ध नसल्याचे दिनांक ०६.०१.२०१५ चे पत्राने लेखी कळविले होते. यावर दिनांक ०७.०१.२०१५ रोजी आपल्या कार्यालयाकडून आमचे पेपरकप Reject केल्याचे कळविले, मात्र Reject केलेला माल मला परत केला नाही. | संस्थानकडून पेपर कप रिजेक्ट करणेबाबत दि.१/१/२०१५ रोजीच ई-मेलद्वारे कळविण्यात आलेले होते, तसेच संस्थानला पूर्वीचे पेपर कप पुरवठा करणारे पुरवठाधारक मे.सिध्दार्थ कंटेनर्स, श्रीरामपूर, मे.सुयोग नेचर केअर, जयपूर यांना व आणखी काही पुरवठाधारकांना २०० जीएसएमचे कपचे मार्केटमधील उपलब्धतेबाबत विचारणा केली होती, त्यांनी १०० मिलिचे पेपर कपामध्ये २०५ जीएसएम पर्यंत पेपर येतो असे सांगितले होते. त्यामुळे सदर माल पुरवठा आदेशाप्रमाणे नसल्याने रिजेक्ट केलेला होता. तसेच रिजेक्ट केलेला माल निविदा अटी-शर्तीतील अ.क्रं.१३ नुसार स्वखर्चाने घेऊन जाण्याची जबाबदारी पुरवठाधारकाची आहे. त्यामुळे संस्थानला माल परत करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. |
| ०८. | त्यावेळी व त्यानंतर मी नियमितपणे आपल्या कार्यालयाकडे पाठपुरावा करुन, ही संस्थानकडून झालेली एकमेव चूक असल्याचे कळविले आहे. सध्या संस्थानने जे टेंडर काढले आहे, त्यामध्ये १८० gsm चे पेपरकप खरेदी करण्यात येतात, मी तर मात्र सध्याच्या पेपरकपापेक्षा चांगल्या प्रतीचे १८६ gsm चे पेपरकप पुरवित होतो. | सदरची चूक ही दोन्ही बाजूने झालेली असल्यामुळे मे.सुरभी डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांना दिलेला पुरवठा आदेश रद्द करता येईल व पेपरकपपैकी उर्वरित पेपरकप त्यांना परत करता येतील व मे.सुयोग नेचर केअर, जयपूर यांचेकडून मंजूर दरात ०.३६८ प्रतीनगाप्रमाणे १८० जीएसएमचे पेपर कप खरेदी करणेबाबत दि. १२/३/२०१५ चे सभेत प्रस्ताव सादर करण्यांत आला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन, पेपरकप खरेदीसाठी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यांत आली. असा निर्णय झाला आहे. त्यास अनुसरुन १८० जीएसएम पेपर कप खरेदीबाबतची कार्यवाही करण्यात आलेली आहे. |
| ०९. | मला २०० gsm पेपरकप जो कुणी पुरवित असेल त्याचे नांव मिळावे, संस्थानच्या खरेदी विभागाला सुध्दा २०० gsm पेपरकप इतरत्र मिळू शकले नाहीत व १८० gsm चेच पेपरकप घ्यावे लागले, जे मी सुध्दा पुरविले होते. परिणामत: मी Sample देण्यात व पुर्वीही माल पुरविणेत कोणतीही चुक केलेली नाही. | संस्थानकडून माहे एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ या कालावधीत कॅन्टीन विभागाचे मागणीनुसार निविदेमध्ये १८० जीएसएमचेच पेपर कप खरेदी करण्यात येत आहेत. |
| १०. | याव्यतिरीक्त संस्थानने सध्याचे टेंडरमध्ये १८० gsm पेपरकपचीच मागणी नोंदविली आहे. मग मला तुम्ही १८० gsm ऐवजी २०० gsm चे Specifications का दिले? मी तांत्रिक अगर कायदेशीर वाद टाळण्यासाठी मैत्रीपूर्ण तडजोड व्हावी म्हणून अजुनही दर कमी करणेबाबत कळविले होते. तसेच काही वसुली असली तर माझ्या रु.३,००,०००/- चे डिपॉझिट मधून करुन घेणेबाबतही कळविले होते. कृपया आपण २०० gsm चे Specification बदलून १८० gsm चे पेपरकप घेण्याबाबतचे कारण मला कळविण्यात यावे. | सदर निविदेमध्ये अटी व शर्ती क्र.३२ मध्ये पेपर कप पॉली इथीलीन कोटेड, १८० gsm., (+-5), १०० मिली क्षमता असे नमुद असुन BOQ मध्ये २०० gsm., (+-5) असे नमुद होते. सदरचा विषय दि. १२.०३.२०१५ चे मा.व्य. समितीचे सभेसमोर सादर करण्यात आला होता त्यामध्ये सदरची बाब ही अनवधानाने टायपींगमधील चुकीमुळे झालेली आहे. असेही नमूद केले होते. |
| ११. | मी पाठविलेले दि.२/२/२०१५, २/३/२०१५, १८/३/२०१५, ८/४/२०१५, २३/५/२०१५ व २४/६/२०१५ च्या मेलद्वारे पाठविलेल्या पत्रांना उत्तर | मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२/३/२०१५ चे सभेपुढे याबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. यामध्ये फक्त पेपरकप खरेदीसाठी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस |

| | | |
|---|---|---|
| | देण्यात आलेले नाही. तसेच मी संस्थानच्या कार्यकारी अधिकारी व खरेदी विभाग येथे दि. ०६/१/२०१५, १७/१/२०१५, ९/३/२०१५ व दि.८/४/२०१५ रोजी समक्ष यासंदर्भात समक्ष भेटलो होतो. मा.कार्यकारी अधिकारी यांना दि.२१/३/२०१५, ८/४/२०१५ व १५/४/२०१५ रोजी SMS सुध्दा केलेले आहेत, त्यांनीही याची दखल घेतली नाही. | मान्यता देण्यात आली. असा निर्णय झालेला होता. त्याप्रमाणे पेपर कप खरेदीची कार्यवाही पूर्ण झालेली आहे.<br>पेपर कप परत देणेबाबत व अनामत रकमेबाबत खरेदी विभागाकडील दि.३/६/२०१५ रोजीचे टिपणीद्वारे मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यावर "पुरवठादाराने पुरवठा केलेले पेपर कप आदेशाप्रमाणे नव्हते हे लॅब रिपोर्टवरुन सिध्द झाले आहे. साहजिकच रिजेक्टेड माल परत करणेत यावा असे चर्चेच्यावेळी ठरले. संस्थानची निविदा प्रक्रिया व्यर्थ जाणे अथवा ऐनवेळी योग्य माल उपलब्ध नसणे या कारणाने संस्थानची झालेली अडचण ध्यानात घेऊन नियमानुसार अनुज्ञेय असल्यास EMD रक्कम जमा करावी लागेल" असे दि.२६/६/२०१५ रोजीचे निर्देश आहेत. त्यास अनुसरुन दि.२९/६/२०१५ रोजी मे.सुरभी डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांना पेपर कप परत करण्यात आले आहेत व सुरक्षा अनामतीबाबत दि.२/७/२०१५ रोजी लेखाशाखेकडे प्रस्ताव सादर केला, त्यावर दि.१०/७/२०१५ रोजी अनामत रक्कम जप्त करण्याची कारवाई पूर्ण झाली व त्यानुसार मे.सुरभी डिस्टीब्युटर्स, औरंगाबाद यांना इकडील जा.नं.२०१९ दि.११/७/२०१५ चे रजिस्टर्ड पत्राने कळविण्यात आले. दरम्यानचे ११ मे ते ११ जुलै या कालावधीत मे.सुरभी डिस्ट्रीब्युटर्स यांचे प्रतिनिधी यांनी ज्या ज्या वेळी खरेदी विभागाचे कार्यालयात अगर दूरध्वनीवर संपर्क साधला त्या-त्या वेळी त्यांना योग्य माहिती देण्यात आलेली आहे. तसेच संस्थानच्या कामकाजाचा व्याप विचारात घेता थेट मा.कार्यकारी अधिकारी महोदयांचे स्तरावर या बाबींची माहिती/उत्तर देणे अपेक्षित नाही. त्यांनी प्रशासकीय अधिकारी स्तरावर याबाबत संपर्क साधणे उचित झाले असते. |
| १२. | वरील सर्व वस्तुस्थिती सांगितल्याप्रमाणे व स्मरणपत्र देऊनसुध्दा याबाबत पुर्वी कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही. सातत्याने पाठपुरावा केल्यानंतर दिनांक २९.०६.२०१५ रोजी माझे Rejected पेपरकप माझे प्रतिनिधीकडे परत देण्यात आले. यामध्ये १२ कार्टून दुस-या Supplier चे आलेले आहेत. याबाबत दिनांक ३०.०६.२०१५ रोजी खरेदी विभागाकडे सुचना/तक्रार दिली आहे. | वर नमूद अ.नं.११ मध्ये नमूद कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर लगेचच दि.२९/६/२०१५ रोजी पेपर कप सुरभी डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांचे प्रतिनिधीना परत देण्यात आले. यामध्ये १२ कार्टून दुस-या सप्लायरचे असल्याचे त्यांनी दि.३०/६/२०१५ रोजी दूरध्वनीद्वारे प्र.अधीक्षक, खरेदी यांचेशी संपर्क साधला असता, अधीक्षक- भांडार यांचेशी त्यांचे बोलणे करुन देण्यात आले होते. कारण पुरविलेला माल हा ६ महिन्यांपूर्वीचा होता व तो भांडार विभागाचे ताब्यात होता. अधीक्षक- भांडार यांनी सदर पेपरकप हे भांडारमध्ये वेगळे ठेवण्यात आलेचे व त्यामुळे त्यामध्ये दुस-या सप्लायरचा माल एकत्र होण्याचा प्रश्न उद्भवत नाही हे समक्ष दूरध्वनीवरुन त्यांना कळविले आहे. तसेच पेपर कप शिर्डी येथून परत नेत असतांना मे.सुरभी डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी श्री.खटोड यांना दि.२९/६/२०१५ रोजी दुस-या सप्लायरचा माल पॅकिंगसह समक्ष अधीक्षक, भांडार यांनी स्वत: दाखविलेला आहे व त्यांनी स्वत: संस्थानचे भांडार विभागात समक्ष पेपर कपची पाहणी करुनच त्यांचा माल ताब्यात घेतलेला आहे. त्यामुळे दुस-या सप्लायरचा माल त्यांना दिला आहे हे त्यांचे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही. |
| १३. | असेही निदर्शनास येते की, संस्थानने मार्च-२०१५ पुर्वी १८० gsm (+-5) चे पेपरकप दुस-या Supplier कडून टेंडर न मागविता खरेदी केले होते. माझे पेपरकप याच Specifications व दर्जाचे असूनसुध्दा मी पुरवठा केलेले पेपरकप स्विकारले नाही. याचे काय कारण आहे? मी पेपरकपसाठी कमी दराबाबतचे पत्र दिलेले होते त्या पत्रासंदर्भात संस्थानने मला चर्चा/ | संस्थानने मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२/३/२०१५ चे सभेत, माहे एप्रिल२०१५ ते मार्च २०१६ या कालावधीसाठीची पेपर कप खरेदीची निविदा प्रक्रिया पूर्ण होईपावेतो माहे एप्रिल व मे २०१५ या दोन महिन्यांसाठी संस्थानचे एप्रिल २०१४ ते ऑक्टोबर २०१४ या कालावधीत संस्थानला पेपर कप पुरवठा करणारे पुरवठाधारक यांचे मागील मंजूर दराने म्हणजेच ०.३६८ प्रती नग दराने ३५,००,००० पेपर कप खरेदी केलेले आहेत. |

| | | |
|---|---|---|
| | वाटाघाटीसाठी बोलावले नाही. | त्यामुळे मे.सुरभी डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांना दराबाबत चर्चेसाठी बोलविण्याचा प्रश्नच उद्भवला नाही. सदर वस्तुस्थिती विचारात घेता दुस-या पुरवठाधारकाकडून टेंडर न मागविता पेपर कप खरेदी केले हे त्यांचे म्हणणे चुकीचे आहे. |
| १४. | संस्थानने एप्रिल-२०१५ ते मार्च-२०१६ या कालावधीसाठी पेपरकप खरेदीसाठी १८० gsm चे Specifications पान नं.६ Item No.२८ वर दिलेले आहेत. तसेच संस्थानने पुर्वी सुध्दा १८० gsm चे पेपरकप खरेदी केले. मग मी पुरवठा केलेला माल Reject करुन मला का परत केला. | दरम्यानचे कालावधीत एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ या कालावधीत आवश्यक असणा-या पेपर कपसाठी कॅन्टीन विभागाने १८० जीएसएमचेच पेपर कप खरेदी करण्याची मागणी केली होती. त्यामुळे सध्या एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ या कालावधीत १८० जीएसएमचेच पेपर खरेदी करण्यात येत आहेत. |
| १५. | वरील सर्व बाबींवरुन असे निदर्शनास येते की, संस्थानला १८० gsm चे पेपरकपची गरज होती. परंतु २०० gsm specifications Financial bid मध्ये टाकलेमुळे झालेली clerical mistake लपविण्यासाठी संस्थानच्या कार्यालयाने जाणीवपुर्वक मी पुरवठा केलेला माल दिनांक ३०.१२.२०१४ रोजी नाकारला/स्विकारणेस नकार दिलेला आहे. | सदर निविदेमध्ये अटी व शर्ती क्रं.३२ मध्ये पेपर कप पॉली इथीलीन कोटेड, १८० gsm., (+-5), १०० मिली क्षमता असे नमुद असुन BOQ मध्ये २०० gsm., (+-5) असे नमुद होते. सदरचा विषय दि. १२.०३.२०१५ चे मा.व्य. समितीचे सभेसमोर सादर करण्यात आला होता त्यामध्ये सदरची बाब ही अनवधानाने टायपींगमधील चुकीमुळे झालेली आहे. असे नमूद केले होते. तसेच याबाबत खरेदी विभागामार्फत प्रशासनाची व व्यवस्थापनाची माफीही मागण्यात आलेली होती. संस्थानचे प्रचलित पध्दतीनुसार पुरवठाधारकांकडून प्राप्त होणारा किराणा व त्याअनुषंगिक माल हा खरेदी, भांडार व सबंधीत विभागप्रमुख (प्रसादालय, कॅन्टीन, लाडू निर्मिती) हे तीघेही तपासतात व सर्वांचे एक मतानुसार सदरचा माल स्विकारणे अथवा नाकारणे याबाबत निर्णय घेतला जातो.<br>सदर पध्दतीप्रमाणेच दि.३०.१२.२०१४ रोजी मे.सुरभि डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांचेकडून प्राप्त पेपरकपामधून काही चार ते पाच बॉक्समधील काही पेपरकप काढून ते खरेदी व भांडार अधिक्षक यांनी पाहून योग्य असल्याची खात्री केली तसेच त्यानंतर सदरचे पेपरकप कॅन्टीन विभाग अधिक्षक यांचेकडे तपासणीसाठी पाठविले असता, त्यांनी सदरचे नमुन्यांमधून १०० नग पेपरकप प्रत्यक्ष वापरुन, ते योग्य असलेबाबत अभिप्राय दिल्यानंतरच सदरचे पेपरकप स्विकारण्यात आलेले होते. तसेच सदरवेळी दक्षता पथकातील सदस्य श्री.झिरपे साहेब यांना दुरध्वनीव्दारे पेपरकप आलेबाबत व ते तपासून घेणेबाबत कळविले असता, त्यांनी तुमचे स्तरावर पेपरकप तपासून, योग्य वाटल्यास उतरवून घ्या मी नंतर पाहीन असे कळविले होते. त्यानुसारच कार्यवाही करण्यात आलेली होती.<br>दि.३०/१२/२०१४ रोजी पुरविलेले पेपर कपचा नमुना संस्थानचा आलेला माल तपासणीसाठी नेमलेल्या दक्षता पथकातील सदस्य तथा मा.मुख्य लेखा अधिकारी यांनी दि.३०/१२/२०१४ रोजी नेला होता व त्यांनी दि.१/१/२०१५ रोजी पेपरकप हे पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणे नसल्याचे सांगितले होते व त्यामुळे लगेचच त्याचदिवशी खरेदी विभागामार्फत मे.सुरभी डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांना सदरचे पेपर कप घेऊन जाणेबाबत व पुरवठा आदेशाप्रमाणे माल पुरविणेबाबत मेलद्वारे व पत्राद्वारे कळविण्यात आलेले होते. |
| १६. | आजही संस्थान १८० gsm specifications चे पेपरकप खरेदी करीत आहे. पुरवठाधारकांस पेमेंट करीत आहे. मला दिलेल्या पेपरकपच्या ऑक्टोबर-२०१४ ते मार्च-२०१५ या कालावधीत सुध्दा आपण १८० gsm चे पेपरकप वापरले आहेत, तसेच या कालावधीत ज्या पुरवठादाराने संस्थानला पेपरकपचा पुरवठा केलेला आहे, त्याची संख्या व दर या सर्व बाबी मला कळवाव्यात. आपण माझेबाबतीत २०० gsm पेपरकप | संस्थानकडून १८० जीएसएमचेच पेपरकप पूर्वीही व आताही वापरात आहेत. एप्रिल २०१५ ते मार्च २०१६ या कालावधीत संस्थानने मे.सुयोग नेचर केअर, जयपूर यांचेकडून २,५१,००,००० नग १८० जीएसएमचे पेपर कप ०.३७९९ प्रतीनग दराने पुरवठा करणेकामी पुरवठा आदेश दिलेला आहे. मान्यता असल्यास ही माहिती संबंधितास कळविता येईल. तसेच याबाबत संस्थान पॅनेलवरील वकीलांकडून कायदेशीर सल्लासुध्दा घेता येईल. |

| | | |
|---|---|---|
| | पुरविण्याचा आग्रह हा कायदेशीरदृष्ट्या टिकू शकणार नाही. | |
| १७. | ही सर्व परिस्थिती लक्षात घेता, संस्थानला माझी डिपॉझिट रक्कम रु.३,००,०००/- डिपॉझिट रक्कम स्विकारलेपासून ते Deposit Refund करेपर्यंत १८% दराने व्याज देणे बंधनकारक राहिल. | पेपर कप परत देणेबाबत व अनामत रकमेबाबत खरेदी विभागाकडील दि.०३/०६/२०१५ रोजीचे टिपणीद्वारे मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता. त्यावर "पुरवठादाराने पुरवठा केलेले पेपर कप आदेशाप्रमाणे नव्हते हे लॅब रिपोर्टवरुन सिध्द झाले आहे. साहजिकच रिजेक्टेड माल परत करणेत यावा असे चर्चेच्यावेळी ठरले. संस्थानची निविदा प्रक्रिया व्यर्थ जाणे अथवा ऐनवेळी योग्य माल उपलब्ध नसणे या कारणाने संस्थानची झालेली अडचण ध्यानात घेऊन नियमानुसार अनुज्ञेय असल्यास EMD रक्कम जमा करावी लागेल" असे दि.२६/६/२०१५ रोजीचे निर्देश आहेत. त्यास अनुसरुन दि.२९/६/२०१५ रोजी मे.सुरभी डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांना पेपर कप परत करण्यात आले आहेत व सुरक्षा अनामतीबाबत दि.२/७/२०१५ रोजी लेखाशाखेकडे प्रस्ताव सादर केला, त्यावर दि.१०/७/२०१५ रोजी अनामत रक्कम जप्त करण्याची कार्यवाही पूर्ण झाली व त्यानुसार मे.सुरभी डिस्टीब्युटर्स, औरंगाबाद यांना इकडील जा.नं.२०१९ दि.११/७/२०१५ चे रजिस्टर्ड पत्राने कळविण्यात आले होते. तथापि Legal complications टाळण्यासाठी याकामी अगोदरच कायदेशीर सल्ला घेणे उचित होईल, असे नम्र मत आहे. |
| १८. | अशी आशा व्यक्त करतो की, आपण जातीने या प्रकरणात लक्ष घालून १५ दिवसांच्या आत माझे मागणीप्रमाणे माझो डिपॉझिट परत कराल आणि मला कोर्टाची दारे ठोठवावयास भाग पाडणार नाही. आपल्या कार्यालयातील कर्मचा-यांनी तांत्रिक निविदेमध्ये केलेला निष्काळजीपणा माझे डिपॉझिट जप्त करण्यास साहा य्यकारी ठरला आहे, हे आपण बारकाईने या प्रकरणाची छाननी केल्यास आपल्या लक्षात येईल व आपल्याला माझे डिपॉझिटची मागणी स्वीकारण्यास व परत करण्यास कुठलीही काचकूच वाटणार नाही, असे मला वाटते. | सदरची चूक ही कर्मचा-यांकडून अनवधानाने झालेली असून त्याबद्दल माफीही मागितली आहे व भविष्यात अशा चुका होणार नाहीत याची काळजी घेण्याची हमी दिली आहे. त्यामुळे संस्थानच्या संबंधित कर्मचा-यांनी तांत्रिक निविदेमध्ये जाणीवपूर्वक ही चूक केलेली नाही, तसेच निविदाधारकानेही याबाबत वेळीच लेखी पत्र वगैरे देणे गरजेचे होते.<br>याबाबत सविस्तर माहितीसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१२/३/२०१५ चे सभेत सादर केलेला प्रस्ताव, खरेदी विभागाकडील दि.३/६/२०१५ रोजीची टिपणी व वरील प्रत्येक मुद्यांसमोर विषद केलेली वस्तुस्थिती या सर्व बाबींचा विचार व्हावा ही नम्र विनंती. |

मे.सुरभी डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांनी संस्थानने जप्त केलेले डिपॉझिट परत मिळणेकामी वरीलप्रमाणे पत्र दिले होते. त्यांचे पत्रातील प्रत्येक मुद्याचा वस्तुस्थितीदर्शक खुलासा सादर केला आहे.

तरी

(अ) मे. सुरभी डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांना त्यांचे जप्त केलेली सुरक्षा अनामत डिपॉझिट रक्कम परत करावी अगर कसे?

**किंवा**

(ब) पुढील कायदेशीर बाबी टाळण्यासाठी संस्थान पॅनेलवरील ॲडव्होकेट यांचेमार्फत सदर पत्राला समर्पक उत्तर दयावे अगर कसे?

पुढील "अ" किंवा "ब" बाबत उचित आदेशासाठी योग्य तो निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३०४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.सुरभी डिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद यांची सुरक्षा अनामत रक्कम परत करणेबाबत संस्थान पॅनेलवरील वकिलाचा अभिप्राय घेण्यात यावा व त्यांचे अभिप्रायासह सदरहू प्रस्ताव समितीसमोर सादर करणेत यावा.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग/ विधी अधिकारी)

---

विषय नं.१७ **पोलीस स्टेशनचे रेकॉर्ड ठेवणेकामी ०२ नग कपाट व ०४ नग रॅक ची मागणी केले बाबत.**

निर्णय क्र.३०५ **सदरहू विषय मागे घेण्यात आला.**

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

विषय नं.१८ **श्री साईबाबा हॉस्पिटलचे आकृतीबंधामध्ये परफ्युजनिस्टचे आणखी एका पदाचा समावेश करणेकामी मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेबाबत.**

प्रस्ताव- दि. १५/०९/२०१२ रोजीचे मा व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र ७५० अन्वये श्री साईबाबा रुग्णालयाचे आकृतीबंधामध्ये परफ्युजनिस्ट या पदाचा समावेश करणेकामी शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावा असा निर्णय झालेला आहे. सदर निर्णयास अनुसरुन जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/२५१/२०१३ दि १६/०४/२०१३ अन्वये इकडून शासनास प्रस्ताव सादर करणेत आला. त्यानुसार सासंवि/२०१४/८०/प्रक्र/का१६ विधी व न्याय विभाग दि ०४/०८/२०१४ अन्वये सदर पदाचा किती भार पडेल व मा न्यायालयाचे दि १६/१०/२०१२ चे आदेशानुसार मान्यता देणे योग्य होईल किंवा कसे? याबाबत शासनाने स्पष्टीकरण मागितलेहोते. सदर स्पष्टीकरण इकडील जा.नं.एसएसएस/ एसएसबीएच/ एचआर/ १८३०/२०१४ दि ०५/०८/२०१४ अन्वये सादर करणेत आले होते. तदनंतर सासंवि-२०१४/८०/ प्रक्र२५/ का१६ विधी व न्याय विभाग दि २५/०९/२०१४ अन्वये शासनाकडून खालीलप्रमाणे कळविण्यात आले आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटलच्या आस्थापनेवरील आकृतीबंधात परफ्युजनिस्टचे एक पद नव्याने समाविष्ट करण्यास मा उच्च न्यायालयाने सिव्हील ॲप्लीकेशन क्र १२०५६/२०१२ मध्ये दि १६/१०/२०१२ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने मा उच्च न्यायालयाची रितसर पूर्वमान्यता घेण्याच्या अटीवर शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

रुग्णालयाचे मंजुर आकृतीबंधामध्ये ३ परफ्युजनिस्ट पदांचा समावेश असुन सध्या स्थायी स्वरुपात १ पद भरलेले आहे. कार्डीयाक विभागप्रमुख यांचे मागणीनुसार तसेच रुग्णांच्या वाढत्या संख्येचा विचार करता आकृतीबंधातील परफ्युजनिस्ट पदाची मंजुर पदसंख्येत वाढ करणे गरजेचे असल्याने सासंवि-२०१४/८०/प्रक्र२५/का१६ विधी व न्याय विभाग दि २५/०९/२०१४ चे शासन निर्णयानुसार मा उच्च न्यायालयाची रितसर पूर्वमान्यता घेण्याच्या अटीवर दिलेल्या मंजूरीनुसार नव्याने वाढीव एक परफ्युजनिस्ट पद आकृतीबंधात समाविष्ट करणेसाठी मा उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करणेबाबतची कार्यवाही करावी लागेल त्यास मान्यता असावी.

मान्यतेस्तव सादर

निर्णय क्र.३०६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलचे आकृतीबंधामध्ये परफ्युजनिस्टचे आणखी एका पदाचा समावेश करणेकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक /विधी अधिकारी)

---

विषय नं.१९ **श्री साईनाथ रुग्णालयातील एक्स-रे विभागाकरीता ३ KVA यु.पी.एस.आणि ३ KVA स्टॅबीलायझर खरेदी बाबत.**

प्रस्ताव- श्री साईनाथ रुग्णालयातील एक्स-रे विभागाने दि. ०१/०४/२०१५ रोजीचे मागणीपत्रान्वये एक नग ३ KVA यु.पी.एस आणि एक नग ३ KVA स्टॅबीलायझर ची मागणी केलेली आहे. कारण त्यांचेकडे सध्या वापरत असलेला यु.पी.एस आणि स्टॅबीलायझर हा वापरुन खराब झालेला आहे त्यामुळे तो व्यवस्थित काम देत नाही.

याकामी M/s. Microtronics, Aurangabad यांचेकडून दुरध्वनीवरुन दरपत्रक मागविण्यात आले होते त्यानुसार M/s. Microtronics, Aurangabad यांनी दि.२४/०४/२०१५ चे ई मेल पत्रान्वये ३ KVA यु.पी.एस आणि ३ KVA स्टॅबीलायझर चे दर कळविलेले आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे–

| Sr. No. | Description | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs |
|---|---|---|---|---|
| 01. | Emerson Liebert Online UPS<br>Model: GXT MT + CX LB<br>Input: 1Phase<br>Output :1 Phase | 01 | 35662.50 | 35662.50 |
| | Amaron Quanta SMF batteries -6 Nos.<br>12V 26AH<br>To Support 30-40 Minutes Backup. | | | |
| | Battery Rack with Interlinks for 26AH – 01 Set | | | |
| 02. | Sentri Make servo stabilizer<br>Cap: 3 kva<br>Input range: 170-270 VAC<br>Output: 220/230 VAC | 1 | 10687.50 | 10687.50 |
| | | | Total Amt. in Rs. | 46350.00 |

वरीलप्रमाणे एक नग ३ KVA यु.पी.एस आणि एक नग ३ KVA स्टॅबीलायझर खरेदीकामी अंदाजे रु.46350/- इतका खर्च अपेक्षित आहे.

<u>मागणी</u> – श्री साईनाथ रुग्णालयातील एक्स-रे विभाग यांचे दिनांक ०१/०४/२०१५ रोजीचे मागणीपत्रान्वये (औषध भांडार विभाग प्राप्त दि. १६/०४/२०१५) चे मागणी पत्रक.

<u>संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –</u> अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. 17-2 (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

<u>विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत –</u> श्री साईनाथ रुग्णालयातील एक्स-रे विभागाकरिता एक नग ३ KVA यु.पी.एस आणि एक नग ३ KVA स्टॅबीलायझर विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करता येईल.

तरी उपरोक्त एक नग ३ KVA यु.पी.एस आणि एक नग ३ KVA स्टॅबीलायझर विहीत पद्धतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणा-या रु. 46350/- चे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.३०७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील एक्स-रे विभागाकरीता ३ KVA यु.पी.एस.आणि ३ KVA स्टॅबीलायझर विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.४६,३५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.२० **श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डीयाक विभागाकरीता पोर्टेबल 2D Echo Machine with pediatric & adult 2 Probes खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा रुग्णालयात अत्यवस्थ रुग्णांचे पोर्टेबल 2D Echo Machine with Pediatric & adult 2 Probes मशिनवर विविध वार्डमध्ये व Cathlab मध्ये नेऊन तेथे हदयाची सोनोग्राफीची तपासणी करण्यात येते. सदर रुग्णाचा 2D Echo केल्यास रुग्णाच्या हृदयाच्या मध्ये काही Block असल्यास सदर तपासणीमध्ये कळून येते व त्यानंतर सदर डॉक्टर रुग्णाला पुढची तपासणी करणेसाठी निर्णय देऊ शकतात. पूर्वीचे 2D Echo Machine हे Philips कंपनीचे असून सध्या सदर मशिन व्यवस्थितकाम करत नाही. त्यांचेकडे असलेले मशिन Micromax SonoSite चे असून त्याची Image Quality खराब झालेली आहे. त्यामुळे वाढत्या रुग्णांच्या संख्येमुळे नविन 2D Echo Machine खरेदी करणे गरजेचे आहे.

सदर 2D Echo Machine with Pediatric & adult 2 Probes सह खरेदीकामी अंदाजे रु. ९,९०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

<u>मागणी–</u> कार्डीयाक विभागाने पोर्टेबल 2D Echo Machine with Pediatric & adult 2 Probes दि.०७/०१/२०१५ (औषध भांडार विभाग प्राप्त दि. ०९/०१/२०१५) अन्वये मागणी केलेली आहे.

<u>संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–</u> अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–</u> श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डियाक व कार्डियोलॉजी विभागात राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत जास्तीत जास्त रुग्णांच्या शस्त्रक्रिया होतात. रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच आधुनिक तंत्रज्ञान वापरुन तयार केलेले नवीन मशिन हे रुग्णांच्या अचुक निदानासाठी फायदेशीर होण्यास मदत होईल. त्यामुळे सदर एक पोर्टेबल 2D Echo Machine with Pediatric & adult 2 Probes सह खरेदी करण्यास हरकत नाही.

सदर 2D Echo Machine with Pediatric & adult 2 Probes सह खरेदीकामी अंदाजे रु. ९,९०,०००/- इतक्या खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.३०८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डीयाक विभागाकरीता पोर्टेबल 2D Echo Machine with pediatric & adult 2 Probes खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निवीदांची मागणी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.२१ **सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्त शिर्डीत श्रींच्या दर्शनासाठी होणा-या संभाव्य गर्दीचे अनुषंगाने साईभक्तांकरीता औषधे खरेदीस व खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- सिंहस्थ कुंभमेळा सन -२०१५ निमित्त शिर्डी श्रींच्या दर्शनासाठी होणा-या संभव्य गर्दीचे अनुषंगाने साईभक्तांकरीता प्रथमोपचार केंद्र सुरु करावे लागणार आहे. सदर कुंभमेळ्याच्या काळात श्रींच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दीचा विचार करता दर्शन रांग, साईबाबा भक्तनिवासस्थान, साईआश्रम भक्तनिवास व मंदिर परिसरात प्रथमोपचार केंद्र सुरु करणेत येणार आहे. प्रथमोपचार केंद्रासाठी आवश्यक औषधे / सर्जिकल साहित्य खरेदी करावे लागणार आहे. त्याकरीता औषध भांडारात उपलब्ध औषधे / सर्जिकल साहित्या व्यतिरिक्त् मटेरियलसाठी ई-मेलव्दारे कोटेशन मागविण्यात आले होते. परंतू ई-मेलव्दारे कोटेशन प्राप्त न झाल्याने पुन्हा ई-मेलव्दारे अथवा दुरध्वनीव्दारे तगादा करणेत येऊन कोटेशन मागविणेत आले.

<u>मागणी–</u> प्रथमोपचार केंद्रासाठी आवश्यक असणारे औषधे/ सर्जिकल साहित्याची सहाय्यक अधिसेविका यांनी मागणी पत्रकाव्दारे मागणी केलेली आहे.

<u>संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–</u> अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या

कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत – कुंभमेळा-२०१५ करीता मागविणेत आलेल्या ई-मेल कोटेशनन्सचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन त्यामध्ये निम्नतम दरानुसार रु.२,७८,१०१/- इतका खर्च येणार आहे. त्यानुसार प्राप्त कोटेशनधारकांचा तुलनात्मक तक्ता सोबत सादर केला आहे.

तरी कुंभमेळा-२०१५ करीता तातडीची आवश्यकता पाहता सदरचे खरेदी करणेस व याकामी एकुण रक्कम रु.२,७८,१०१/- मात्रचे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.३०९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्त शिर्डीत श्रींच्या दर्शनासाठी होणा-या संभाव्य गर्दीचे अनुषंगाने साईभक्तांचे सोयीसाठी तातडीची आवश्यकता असलेली औषधे शासनाकडील दर करारानुसार उपलब्ध असतील ती घेण्यात यावी. तसेच दर करारावर उपलब्ध नसल्यास ती खरेदीकामी स्वतंत्र प्रस्ताव तयार करणेत येऊन त्यास चक्रीय पध्दतीने मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.२२ **स्वाईन फ्ल्यु लस खरेदीकामी प्राप्त कोटेशनबाबत.**

प्रस्ताव- सध्याच्या वातावरणामुळे पुणे, नाशिक, मुंबई येथे स्वाईन फलयुचे रुग्ण आढळून येत आहेत. शिर्डी येथे भक्तंची संख्या देखील वाढत आहे. तसेच नाशिक येथे होणारा सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत शिर्डीमध्ये मोठयाप्रमाणावर भाविक येण्याची शक्यता असून स्वाईन फलयुचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संस्थानमधील कर्मचारी व हॉस्पिटलमधील कर्मचारी यांना लसीकरण करणे आवश्यक आहे. व अॅडमीट पेशंटसाठी सुध्दा लसीकरण करावे लागेल स्वाईन फलयुची लस ही सध्या बाजारात फारच कमी प्रमाणात मिळते. आपण वारंवार कोटेशनधारकांना तगादा करुन खालील प्रमाणे कोटेशन प्राप्त झालेले आहे.

परंतु सध्या आपणाकडे ०५ कोटेशन प्राप्त झालेले असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे –

१. M/s. Deva Distributors, Shrirampur (ईमेल कोटेशन प्राप्त दि.१२/०८/२०१५)
२. M/s. Keshrinandan Medical, Shrirampur (बंद कोटेशन प्राप्त दि.१५/०८/२०१५
३. M/s. Krishan Enterprises, Shrirampur (बंद कोटेशन प्राप्त दि.१५/०८/२०१५)
४. M/s. Cipla Nurture, Ahmednagar (ईमेल कोटेशन प्राप्त दि.१५/०८/२०१५)
५. M/s. Shivansh Pharma, Nashik (ईमेल कोटेशन प्राप्त दि.२५/०७/२०१५)

उपरोक्त कोटेशन हे दि.१७/०८/२०१५ रोजी वैद्यकीय संचालक यांचे समक्ष उघडण्यात आले असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे –

| S. N. | Description | Qty. | M/s. Keshrinandan Medical, Shrirampur | | M/s. Krishan Enterprises, Shrirampur | | M/s. Deva Distributors, Shrirampur | | M/s. Cipla Nurture, Ahmednagar | | M/s. Shivansh Pharma, Nashik | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Rate per in Rs. | Total Amt. In Rs. | Rate per in Rs. | Total Amt. In Rs. | Rate per in Rs. | Total Amt. In Rs. | Rate per in Rs. | Total Amt. In Rs. | Rate per in Rs. | Total Amt. In Rs. |
| 1 | Inj.Swine Flue | 500 | | | 603.75 | 301875 | 472.50 | 236250 | | | 440 | 220000 |
| Total Amt in Rs. | | | | | | | | | | | | |
| 2 | Swine Flue Nassal Vaccine Nasovac | 500 | 598.50 | 299250 | | | | | 415 | 207500 | | |

वरील तुलनात्मक दरांचा विचार करता Swine Flue Nassal Vaccine Nasovac करिता M/s. Cipla Nuture, Ahmednagar यांचे निम्नतम दर प्रती नग रु.४१५/- इतके देऊ केलेले आहे. सदर दरांनुसार ५०० नग Swine Flue Nassal Vaccine Nasovac खरेदीकामी एकुण रक्कम रु.२०७५००/- इतका खर्च येणार आहे. आणि Inj. Swine Flue साठी M/s. Deva Distributors, Shrirampur व M/s. Shivansh Pharma, Nashik यांचेशी दुरध्वनीद्वारे विचारणा केली असता सदर Inj. Swine Flue चा पुरवठा आदेश दिल्यानंतर पुरवठा करणेस १० ते १५ दिवस लागतील असे त्यांनी कळविलेले आहे.

तरी श्री साईबाबा रुग्णालयाकरिता लागणारे Swine Flue Nassal Vaccine Nasovac खरेदीबाबत खालील प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

M/s.Cipla Nurture, Ahmednagar यांचेकडून तातडीने खरेदी करण्यास व याकामी येणा-या रक्कम रु.२०७५००/- चे खर्चास मान्यता असावी.

निर्णय क्र.३१० **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा रुग्णालयाकरिता आवश्यक असलेले Swine Flue Nassal Vaccine Nasovac दानशुर साईभक्त देणगी स्वरुपात देणेबाबत इच्छा व्यक्त करत आहेत. सबब सदरहू Swine Flue Nassal Vaccine Nasovac देणगी स्वरुपात स्विकारणेत यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.२३ **आर.जी.एन.एम. (स्टॉफ नर्स) चे प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना संस्थान रुग्णालयात प्रॅक्टीस करणेस परवानगी देणेबाबत.**

प्रस्ताव- श्री. ज्ञानदेव आहेर, मॅनेजींग ट्रस्टी साखार कामगार हॉस्पिटल ट्रस्ट ता. श्रीरामपुर यांनी अनुक्रमे दि. २३.०७.२०१५ व दि. २७.०७.२०१५ रोजीचे पत्रान्वये त्यांचेकडे आरजीएनएम कोर्स सुरु करण्यात आरलेला असुन बीएस्सी नर्सिंग कोर्स सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. परंतु इंडीयन नर्सिंग कौन्सिलच्या नियमानुसार विद्यार्थ्यांना अनुभवासाठी त्यांचेकडील हॉस्पिटल मधील रुग्णांची संख्या कमी असल्याने संस्थानचे रुग्णालयमध्ये विद्यार्थ्यांना अनुभवासाठी परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

यापुर्वी मा. व्यवस्थापन समितीचे दि. २६.०३.२०११ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २५६ नुसार शिवा ट्रस्ट औरंगाबाद येथील आरजीएनएम चे प्रशिक्षणार्थ्यांना संस्थानच्या रुग्णालयात प्रॅक्टीस करणेस परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार त्यांचेकडील २० आरजीएनएमचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी सन २०१५ मध्ये प्रशिक्षण घेतलेले आहे. त्याचप्रमाणे मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०८.१०.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८१९ नुसार सेंट लुक हॉस्पिटल, श्रीरामपुर यांचेकडील पीसीबीएस्सी चे प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना प्रशिक्षिणास परवानगी देण्यात आलेली आहे. त्यानुसार पीसीबीएस्सीचे प्रशिक्षण घेत असलेल्या असलेल्या १० विद्यार्थ्यांनी सन २०१५ मध्ये अनुभवासाठी प्रशिक्षण घेतलेलेआहे.

तसेच मा.त्रिसदस्त्रीय समिती सभेतील निर्णय क्र. ७१ नुसार साई इंन्स्टीटयुट ऑफ बाभळेश्वर ता. राहाता येथील आरजीएनएम विद्यार्थ्यांना प्रशिक्षणास परवानगी दिलेली असुन सध्या २० आरजीएनएमचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी अनुभवासाठी प्रशिक्षण घेतलेले आहे.

तथापि सध्या संस्थान रुग्णालयामध्ये प्रशिक्षणसाठी येत असलेल्या विद्यार्थ्यांची संस्थान रुग्णसेवेत मदत होत असुन रुग्णांना चांगल्या प्रकारची रुग्ण सेवा पुरविता येत आहे. साखार कामगार ट्रस्ट हॉस्पिटल ता. श्रीरामपुर जि अ. नगर येथे आरजीएनएम चे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना संस्थान रुग्णालयात प्रशिक्षण घेणेस परवानगी दिल्यास संस्थान रुग्णालयात प्रशिक्षण घेणेस परवानगी दिल्यास संस्थान रुग्णालयामधील रुग्ण सेवेचा दर्जा उंचवण्यास मदत होईल, अशी प्र. वैद्यकीय संचालक यांनी मागणी केलेली आहे.

तरी साखार कामगार हॉस्पिटल ट्रस्ट ता. श्रीरामपुर येथे आरजीएनएम चे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना संस्थान रुग्णालयात अनुभवासाठी प्रशिक्षण घेणेस परवानगी देण्याबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.३११ **यावर सविस्तर चर्चा होऊ, साखार कामगार हॉस्पिटल ट्रस्ट ता. श्रीरामपुर येथे आरजीएनएम चे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना संस्थान रुग्णालयात अनुभवासाठी प्रशिक्षण घेणेस परवानगी देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.२४ **श्री साईबाबा रुग्णालयातील नवीन सर्जिकल आय.सी.सी.यु. विभागाकरीता ICU Bed Head Panal for Medical Gases & Electrical outlet खरेदी करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा रुग्णालयातील सर्जिकल आय.सी.सी.यु विभाग यांचे दि.०४/०५/२०१५ (औषध भांडार प्राप्त दि.०७/०५/२०१५) रोजीचे मागणी पत्रान्वये ICU Bed Head Panal for Medical Gases & Electrical outlet 08 नगाची मागणी केली आहे. सदर ICU Bed Head Panal for Medical Gases & Electrical outlet हे पेशंटला विविध मशिनरी जोडणेकामी आवश्यक असते उदा. Ventilater, Medical Gas, Air, Oxygen इत्यादी तसेच इलेक्ट्रॉनिक पॉवर जोडणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे पेशंटचे रक्त व द्रव पदार्थ स्वच्छ करण्यासाठी सदर Vaccum वापरले जाते. या सर्वाकरिता पुर्वीप्रमाणे विविध मेडीकल गॅसचे पाईपलाईन Outlet सह व इलेक्ट्रॉनिकल पॉवरकरिता विविध इलेक्ट्रीकल सॉकेट स्वतंत्रपणे भिंतीवर पेशंट पलंगाच्या डोक्याकडील भागाकडे बसविले जातात. परंतु सध्या नवीन तंत्रानुसार सर्व गॅस व इलेक्ट्रीकल पॉवर आऊटलेट हे एकाच पॅनलमध्ये बसवुन मिळतात त्यामुळे कमीत कमी जागा व अदयावत पध्दतीने बसविले जाते हे सर्व ICCU Bed Head Panel मध्ये एकाच बॅक्पमध्ये बसवुन मिळतात. त्यामुळे सदर ICU Panel Vertical खरेदी करणे आवश्यक आहे. सदर खरेदीकामी M/s. United Surgical, Thane (W) यांचेकडून दर पत्रक मागविण्यात आलेले आहे.

दि.०१/०५/२०१५ रोजी M/s. United Surgical, Thane (W) यांनी दर पत्रक दिलेले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे –

| Sr. No. | Description | Qty | Basic Price | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | 15 mm copper pipe (AIR) | 39 MTR | 450 /MTR | 19743.75 |
| | 15 mm copper pipe (O2 & VAC) | 46 MTR | 450 /MTR | 23287.50 |
| 2 | Drop (10mm) | 24 MTR | 300 /Each | 8100.00 |
| 3 | Isolation valve (15mm) | 06 Nos. | 950 /Each | 6412.50 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | Bed Head panel (Vertical with monitor tray 1no. outlet point 3nos., electrical switch & socket 15 amp 4-nos. | 08 (3FT) | 20000 /Each | 180000.00 |
| | | | Total Amt in Rs. | 237543.75 |

सदर ICU Bed Head Panal for Medical Gases & Electrical outlet खरेदीकामी अंदाजे रु.२३७५४३.७५ इतका खर्च अपेक्षित आहे.

**मागणी–** सर्जिकल आय.सी.सी.यु विभाग यांचे दि०४/०५/२०१५ (औषध भांडार विभाग प्राप्त दि. ०७/०५/२०१५) रोजीचे मागणी पत्र.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** १) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** सदर ICU Bed Head Panal for Medical Gases & Electrical outlet खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.२३७५४३.७५ इतका खर्च अपेक्षित असल्यामुळे सदरकामी निविदा मागवुन खरेदीस मान्यता असावी.

निर्णय क्र.३१२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील नवीन सर्जिकल आय.सी.सी.यु. विभागाकरीता ICU Bed Head Panal for Medical Gases & Electrical outlet खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,३७,५४४- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

विषय नं.२५ **व्हिजीटींग पध्दतीने फिजीशियनची नेमणूक करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम २००४ मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम १३ (4) मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची(कार्यकारी अधिका-यांव्यतिरीक्त)व कर्मचा'यांची नेमणूक करता येईल.

शासन निर्णय क्रसासवि-2009/433/(37/09) का सोळा मंत्रालय मुंबई दि. 07/08/2009 नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिरडीच्या आस्थापनेवरील रुग्णालयातील पदांचा आकृतीबंध मंजूर आहे.

शासनमान्य आकृतीबंधातील अटी शर्ती क्र 3 सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी असे नमूद केले आहे.

तसेच मा मुंबई उच्च न्यायालयाचे दि. 16/10/2012 रोजीचे आदेशातील अ.नं.6 मधील D मध्ये असे नमुद केले आहे की, मा मुंबई उच्च न्यायालयाचे पूर्व परवानगी शिवाय संस्थानमध्ये स्थायी पदावर कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करू नयेत.

श्री साईबाबा रुग्णालयाचे आकृतीबंधात फिजिशियनची ४ पदे मंजूर असुन सध्या चारही पदे रिक्त आहेत. संस्थानचे दोन्ही रुग्णालयाचे रिक्त पदे भरणेकामी मा न्यायालयाचे आदेशानुसार जाहिरातीमार्फत अर्ज मागणवित येऊन मुलाखी घेणेत आलेल्या आहेत. फिजिशियन पदासाठी मुलाखतीस एकही उमेदवारउपलब्ध नसल्याने फिजिशियनची सर्व पदे रिक्त राहणार आहेत.

डॉ रश्मी तुपे यांनी श्री साईबाबा रुग्णालयात फिजिशियन पदावर ५ते ६वर्ष सेवा दिलेली आहे. त्यांचा दि. २७/०५/२०१५ अखेर पासून राजीनामा मंजूर झालेला आहे. आता त्यांनी व्हिजीटींग पध्दतीने श्री साईबाबा रुग्णालयामध्ये सेवा देणेकामी अर्ज केलेलाआहे.

सध्या श्री साईबाबा रुग्णालयात एकही फिजिशियन कार्यरत नसल्याने रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून याकामी डॉ रश्मी पराग तुपे यांना फिजिशियन या पदावर व्हिजीटींग पध्दतीने दि. ०६/०८/२०१५ पासून कामावर हजर करुन घेतले आहे.

तरी डॉ रश्मी तुपे यांना फिजिशियन या पदावर एक वर्ष किंवा स्थायी कर्मचा-यांची नेमणूक यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत व्हिजीटींग पध्दतीने प्रति व्हिजीट रु ४०००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देणेस कार्योत्तर मान्यता असावी.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.३१३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्लास्टीक वेस्टेज डिस्पोजल समस्या दुर करणेकामी प्लास्टीक पुनःप्रक्रिया प्लांटची उभारणी करणेकामी शिर्डी नगरपंचायतीस मशिनरी खरेदी करुन अथवा देणगी स्विकारुन उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम मधील तरतूद 2004:** अधिनियम (2)14 तरतूद 2004(घ(, 17(4), 21(2)

**मा .पन समितीची ठराव क्रवस्थाव्य .:** दिनांक पन समितीचे सभेतील निर्णयवस्थाव्य .रोजीचे मा 2015/08/20

**प्रस्ताविक:** नगराध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील जा 2015/234/8.क्र.टे/पं.न .क्र .दिनांक पन करणेकामी नगरपंचायतमार्फत ओला व सुका वस्थाये शिर्डी शहरातील घनकचरा व्यरोजीचे पत्रान्व 2015/08/20 तसेच श्री साईबाबा संस्थ .त येत आहेयाचे वर्गीकरण करुन संकलीत करण्या-कचान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत सुक्या कच यासाठी .त आले आहेवित करण्याचे प्रस्ताअलस तयार करण्याक पासून ग्रॅन्युस्टीयातील प्ला-9 अलस मशीनसाठी शेड उभारणी करणेकरीता रुपयेक ग्रॅन्युस्टीप्ला (1),96, -/641तसेच अलस क ग्रॅन्युस्टीप्ला (2) मशीनसाठी चैनलिंक कंपाऊंड तयार करणेकरीता रुपये 4,20, -/404असे एकूण 14,17, -/045निधी उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती केली आहे.

सदरचे पत्रावर दिनांक पन समितीचे सभेत चर्चा होऊनवस्थाव्य .रोजीचे मा 2015/08/20, नगरपंचायत शिर्डी शेडची उभारणी व ग्रॅन्युअल मशीन ऐवजी प्लास्टीक कचक पिशवी स्टीकडे करणेकरीता ग्राईडर मशीन व प्लायाचे तु-त ता देण्याया खर्चास मान्य-साठी येणामेरेटर मशीन खरेदी करुन देणेस व त्या लगदा तयार करणेसाठी ॲग्लोफिल्म नेसदरची मशीनरी खरेदी करणे तातडीची बाब असल्या .आली, सदरचे मशीन देणगी स्वरुपात मिळाल्यास स्विकारणेत यावेत तसेच कुंभमेळ्याचे कालावधीत सार्वजनीक आरोग्याचा प्रश्न उदभवू नये यासाठी सदरची बाब प्राधान्यक्रमाने करणे गरजेचे असल्याने यावर तातडीने कार्यवाही करावी व शासनास तसे कळविण्यात यावेक कचरा गोळा स्टीप्ला . करणे व मशीनरी दुरुस्तीदेखभाल या गोष्टी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी कराव्यात असे ठरले आहे .तसेच मा . धिकारीजिल्हा, अहमदनगर यांचे टंचाई 2015/665/19/पनवस्था व्यआपत्ती/कार्या/दिनांक ये चे पत्रान्व 2015/08/23 नचे विविध ठिकाणी वचे कालावधीत संस्था 2015 कुंभमेळानशिक सिंहस्थ नगरपंचायत हद्दीत प्लास्टीक घन कचरा विल्हेवाट लावण्याची नगरपंचायत शिर्डी यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावावर तात्काळ कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे.

**मागणी:** उपरोक्त मान्यतेनुसार तसेच सूचनेनुसार शिर्डी नगरपंचायत परिसरात दैनंदिन जमा होणाया -प्लास्टीक कचक ग्रायंडर मशीन तसेच शिर्डी नगरपंचायतीस या करणेसाठी शिर्डी नगरपंचायतीस आवश्ययावर प्रक्रि-सीफिकेशन पुढीलप्रमाणेया खर्चाचा तपशील व मशीनचे स्पे-मेरेटर मशीन खरेदी करणेकामी अंदाजे येणाॲग्लो:

(क तुकडे करणेसाठीस्टीहार्ड प्ला) ग्राईडर मशीन (अ) : रुपये3,50,000/- + इतर चार्जेस

**Scrap Grinder Machine (Granulator) – Specifications**

i) Electric Motor – 25 H.P. A.C.
ii) Blades Size–20 Inch (Three blades fixed with rotor & two fitted with the body)
iii) Grinding Capacity – 200 to 300 kegs / hrs.
iv) Rotor Dia – 14 Inch
v) Suitable Material – All types of molding material

(ब) ॲग्लोमेरेटर क पिशव्यास्टीप्ला), फिल्म लगदा तयार करणेसाठी ( : रुपये 3,00,000/- + इतर चार्जेस

**Agglomerator Machine – Specifications**

i) Electric Motor – 30 H.P. A.C.
ii) Tank Size – 26" x 30" height,
iii) Tank Thickness – 8 mm, 2mm SS Cladding
iv) Blades – Four blades fixed with rotor and six fitted with the tank
v) Production – 80 to 100 kgs./hrs.
vi) Suitable Material – HM / LLD / HDPE Film & Punch Waste

**एकूण रुपये (ब+अ) : रुपये 6,50,000/- + इतर चार्जेस**

उपरोक्तप्रमाणे मशीनरी खरेदी करणेकामी अंदाजे रुपये 6,50,000अक्षरी रुपये सहा लाख) इतर चार्जेस + -/, पन्नास हजार.मात्र आहे (

**संस्थान अधिनियमठराव यानुसार छाननी/, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इछाननी करुन अनुमान .:** तांत्रिक व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:** संस्थान अधिनियम 2014 मधील कलम 17 (4) नुसार "विश्वस्तव्यवस्थेचे निहित केलेले, पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जडजवाहिर, दागिने व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता, राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज, समितीकडून विकण्यात येणार नाही, तारण म्हणून ठेवण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही" अशी तरतूद आहे. त्यामुळे संस्थान नावे मशीनरी देणगी घेऊन नगरपंचायतीकडे वर्ग करणेस अडचण येईल. संस्थान अधिनियम 2004 मधील कलम 21(2) नुसार "स्थानिक

नागरी सेवा व सुविधा यांचेमध्ये सुधारणा व वाढ होणेसाठी व परिणामी संस्थानचे सोयीमध्ये वाढ होणेसाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करणेसाठी विश्वस्त व्यवस्थेचा विनियोग करता येईल" अशी तरतूद आहे. सदर तरतुदीनुसार मशीनरी संस्थानमार्फत खरेदी करुन देण्याऐवजी शिर्डी नगरपंचायतीस मशीनरी खरेदीसाठी निधी उपलब्ध दिल्यास सोयीचे होईल, असे मत आहे.

तरी शिर्डी नगरपंचायत हद्दीत वेस्टेज डिस्पोजल समस्या दुर करणेकामी प्लास्टीक पुर्न-प्रक्रिया प्लांटकरीता (अ) शिर्डी नगरपंचायतीस मशीनरी खरेदी करुन द्यावे किंवा (ब) देणगी स्विकारुन उपलब्ध करुन द्यावेत किंवा (क) शिर्डी नगरपंचायतीस मशीनरी खरेदीकामी निधी उपलब्ध करुन द्यावा याबाबत निर्णयास्तव प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.३१४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान परिसरातील व शिर्डी नगरपंचायत हद्दीतील प्लास्टीक वेस्टेज डिस्पोजल समस्या दुर करणेसाठी प्लास्टीक पुन:प्रक्रिया प्लांटची उभारणी करणेकामी आवश्यक असणा-या मशिनरी देणगी स्वरुपात मिळाल्यास त्या स्विकारुन शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना देण्यात याव्यात, असे ठरले.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०२ **सिंहस्थ कुंभमेळा २०१५ चे अनुषंगाने श्रीसाईभक्तांचे सुलभ दर्शन व्यवस्थेकामी एल.ई.डी. स्क्रीन बसविणेकामी न्युनतम दर धारकास कार्यादेश देणेबाबत.**

प्रस्ताव- **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

**प्रस्ताविक:-** सिंहस्थ कुंभमेळा– २०१५ याकरीता दि.०१/०८/२०१५ ते दि.३०/०९/२०१५ या कालावधीत होणार असल्याने श्रींचे मंदिरात दर्शनासाठी लाखोंच्या संख्येने भावीक दर्शनासाठी येतील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यास अनुसरुन मंदिर व परीसरात येणा-या सर्वभावीकांना गर्दीचे काळात श्रींचे दर्शन सुलभ होणेसाठी मंदिर व परीसरात भाडेतत्वावर/लीज पध्दतीने एकुण- १३ ठिकाणी डीजीटल एलईडी स्क्रीन बसविणे प्रस्तावीत होते. सदर एलईडी स्क्रीन बसविणेकामी खंडपीठ, औरंगाबाद यांनी दि.११/०५/२०१५ रोजीचे प्रस्तावा अन्वये सिव्हील ॲप्लीकेशन नं.-३५००/२०१५ नुसार रुपये- २४,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता दिलेली आहे.

त्यास अनुसरुन सदर एलईडी स्क्रीन बसविणेसाठी ई-निविदा मागविणेकामी प्रथम दि.१०/०७/२०१५ ते दि. २५/०७/२०१५ कालावधीत वर्तमान पत्रांमध्ये जाहीराती प्रसिध्द करण्यात आल्या होत्या , तसेच दि.२५/०७/२०१५ रोजी टेक्नीकल बीड ओपनिंग सभा देखिल आयोजित केली होती. परंतु सदर कामासाठी फक्त मे.पुष्कांतर मुव्हीज या एकच कंपनीची निविदा प्राप्त झालेली असल्यामुळे, पुन्हा री-टेंडर करावे लागल्याने, व्दीतीस वेळेस दि.२०/०८/२०१५ ते दि.२७/०८/२०१५या कालावधीत वर्तमान पत्रांमध्ये जाहीराती प्रसिध्द करण्यात आल्या व त्याही वेळेस दि.२७/०८/२०१५ रोजी ऑनलाईन टेक्नीकल बीड ओपन करण्यात आल्या आहेत. तथापी, सदरवेळीही फक्त दोनच निविदाधारक यांच्या दोन ई-निविदा प्राप्त झाल्यामुळे, दि.३१/०८/२०१५ दि.०५/०९/२०१५ या कालावधीत तृतीय वेळेस शॉर्ट टर्म टेंडर करणेकामी वर्तमान पत्रांमध्ये जाहीराती प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

त्यानुसार सदरकामी ०५ निविदाधारकांच्या ऑनलाईन निविदा प्राप्त झाल्यामुळे, सदर दिवशी दुपारी ३.०० वाजता दि.२७/०८/२०१५ रोजीचे परीपत्रकान्वये टेक्नीकल बीड ओपनिंग करण्यात आल्या आहेत. सदर टेक्नीकल बीडमध्ये पाचही निविदाधारक पात्र असल्यामुळे, सायंकाळी ५.०० वाजता कमर्शियल बीड ओपनिंग करण्यात आलेल्या आहेत. परंतु मा.मुख्यलेखाधिकारी सो.यांचेशी झालेल्या चर्चेनुसार- निविदा प्रकाशित करतांनी प्रतीदिन/माह/वर्ष असे किती दिवसाचे दर मागविले याचा उल्लेख कमर्शियल बीडमध्ये दिसुन येत नाही. सदरहुकामी तत्कालीन प्र.विभाग प्रमुख यांचेशी चर्चा केली असता, सदरहु दर हे प्रतीदिन असल्याचे त्यांनी चर्चेअंती सांगीतलेले आहे. तसेच मा.मुख्यलेखाधिकारी सो. यांनी सदरील न्युनतम दराने एका एलईडी स्क्रीनचे ९ ते १० हजार रुपये भाडेएका दिवसाचे याप्रमाणे १३ एलईडी स्क्रीनचे १,३०,०००/- इतके भाडे होते. महिन्याचे अंदाजे एकुण-४० लाख इतके भाडे होते. सदरील प्रस्ताव /काम संस्थानला परवडणारा नाही,असे स्पष्ट मत आहे. याउलट संस्थानला ठराविक रक्कम देऊन, (जाहीरातीसाठी) एलईडी स्क्रीन लावण्याचा प्रस्ताव आला होता. त्याबाबत काय कार्यवाही केली हे विभागाने स्पष्ट करावे, असे आदेशार्थ अभिप्राय नोंदविण्यात आले आहे. सदर प्रस्तावाबाबत तत्कालीन प्र.विभाग प्रमुख यांचेशी चर्चा केली असता, मा.व्यवस्थापन समितीने दिलेल्या सुचनेनुसार याकामी ई-निविदा करणेबाबत निर्देश देण्यात आलेले होते. त्यानुसार दि.०५/०९/२०१५रोजी उघडण्यात आलेल्या टेक्नीकल व कमर्शियल ई-निविदेनुसार कार्यवाही करण्यात आलेली असल्याचे त्यांनी चर्चे अंती सुचविलेले आहे.

त्यानुसार प्राप्त निविदांपैकी सोबत जोडलेल्या तुलनात्मक तक्त्याप्रमाणे मे.अमित फोटो स्टुडीओ, संगमनेर या निविदाधारकाचे न्युनतम दर (एल-१) आलेले असल्यामुळे, त्यांना निविदेतील नमुद सर्व अटी व शर्ती मान्य असुन,त्यांनी दि.०५/०९/२०१५ रोजीचे कमर्शियल बीड सभेतील चर्चेनुसार मे.अमित फोटो स्टुडीओ, संगमनेर यांनी दि.०७/०९/२०१५ रोजी स्वत: शिर्डी येथे हजर राहुन, लोकेशन्सची समक्ष पाहणी करुन, संस्थानचे सर्व अटी व शर्ती मान्य करुन, सदर काम करणार असल्याचे चर्चे अंती सांगीतलेले आहे.

सदर एलईडी स्क्रीन बसविणेकामी मे.अमित फोटो स्टुडीओ, संगमनेर यांना संस्थानचे वतीने एलईडी स्क्रीन करीता लागणारा विद्युत विभागामार्फत पुरवठा तसेच सदर एलईडी स्क्रीन ठेवणेकरीता बांधकाम विभागामार्फत बॅक्रेट

उपलब्ध करुन द्यावे लागणार आहे. त्याचप्रमाणे सदर एलईडी स्क्रीन १५ दिवसांकरीता बसविणेत येणार असल्याने, सोबतच्या दरानुसार व साईजनुसार १३ एलईडी स्क्रीन पुर्वी नमुद केलेल्या ठिकाणी १५ दिवसांकरीता (दि.१३/०९/२०१५ ते दि.२७/०९/२०१५ अखेर ) बसविणेकामी, एकुण रक्कम रुपये- १६,४१,६००/- (अक्षरी- सोळा लाख एक्केचाळीस हजार सहाशे रुपये ) मात्र सर्व करांसहीत खर्च येणार असल्याने , सदरकामी येणा-या खर्चास व न्युनतम दरधारक मे.अमित फोटो स्टुडीओ, संगमनेर यांना सोबतच्या पत्रान्वये कार्यादेश देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ तथा आदेशास्तव सविनय सादर.

निर्णय क्र.३१५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळा २०१५ चे कालावधीमध्ये श्रीसाईभक्तांचे सुलभ दर्शन होणेकरीता एल.ई.डी. स्क्रीन बसविणेसाठी पहिल्या शाहीस्नानाचे वेळेच्या गर्दीचा अनुभव व प्रत्यक्ष गरज लक्षात घेऊन, कार्यकारी अधिकारी यांनी आवश्यकतेनुसार, महत्वाच्या ठिकाणी जागा निश्चित करुन एल.ई.डी. स्क्रीन बसविणेचा निर्णय घ्यावा व या एल.ई.डी. स्क्रीनची संख्या ०८ नगापेक्षा जास्त नसावी, असे ठरले. तसेच याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०३ **सुरक्षा साहित्य खरेदी व रेट कॉन्ट्रॅक्टवरील साहित्यांचे सद्यस्थिती, पाठपुरावा व केलेल्या कार्यवाहीबाबतचा सविस्तर अहवाल.**

प्रस्ताव- सिंहस्थ कुंभमेळा-2015, शताब्दी महोत्सव-2018 चे अनुषंगाने संदर्भ क्र.3 नुसार पोलीस विभागाचे मागणीप्रमाणे तसेच दि.12/05/2015 रोजीचे संरक्षण विभागाचे पत्रानुसार श्री साईभक्तांचे सुरक्षिततेच्या दृष्टिने मंदिर व परीसरात सुरक्षा यंत्रणा विकसीत करणेकामी सुरक्षा साहीत्य खरेदी करणेकामी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचे समोर सदर विषय मंजुरीसाठी सिव्हील अॅप्लीकेशन नं.- 3500/2015 दाखल करण्यात आले होते. सदर कामी सिव्हील अॅप्लीकेशनला मा.उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद यांनी दि.06/05/2015 रोजी याकामी येणा-या खर्चास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार-

**<u>(अ) रेट कॉन्ट्रक्ट कार्यवाहीबाबत-</u>**

मा.पोलीस अधिक्षक सो.अ.नगर यांचे पत्रानुसार पोलीस विभागाने केलेल्या मागणी साहीत्यांपैकी शासनाचे रेट कॉन्ट्रॅक्टवर असलेल्या साहीत्यांसाठी दि.13/08/2015, दि.27/07/2015 व दि.27/07/2015 नुसार खालील पुरवठाधारकांना कार्यादेश देणेत आलेले आहेत.

1) मे.स्टार एंटरप्राईजेस, औरंगाबाद (डेस्कटॉप पी.सी व प्रिंन्टर्स, रेसोग्राफर, झेरॉक्स मशिन्स)
2) मे.शंकर मेटल वर्क्स, कानपुर, उत्तरप्रदेश (लार्ज साईज बॅरीगेटस)
3) मे. गोदरेज अॅन्ड बायस कंपनी, मुंबई (2 टनाचे एअर कंडीशनर)

तसेच सदर पुरवठादारांना दि.27/07/2015 रोजी ई-मेलव्दारे तसेच जावक विभागामार्फत कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर कार्यादेशाप्रमाणे पुरवठादार यांना वेळोवेळी दि.14/08/2015, दि.16/08/2015, दि.19/08/2015 व दि.02/09/2015 रोजी दुरध्वनीव्दारे संपर्क करुन, साहीत्य पुरविणेबाबत वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे. तथापी, त्यापैकी फक्त मे.स्टार एंटरप्राईजेस, औरंगाबाद व मे. गोदरेज अॅन्ड बायस कंपनी, मुंबई यांनी अनुक्रमे दि.26/08/2015 व दि.03/09/2015 रोजी सीसीटीव्ही कंट्रोल सेलकडे कार्यादेशाप्रमाणे साहीत्यांचा पुरवठा केलेला असुन, सदरचे साहीत्य संस्थानचे संरक्षण विभागामार्फत शिर्डी पोलीस स्टेशनला हस्तांतरीत करणेबाबत दि.28/08/2015 रोजीचे मंजुर टिपणी अन्वये कळविण्यात आले आहे.

परंतु मे.शंकर मेटल वर्क्स, कानपुर, उत्तरप्रदेश या पुरवठाधारकास वेळोवेळी पाठपुरावा केलेला असतांनाही अद्यापपर्यंत त्यांनी साहीत्यांचा पुरवठा केलेला नसल्याने, तसेच वेळोवेळी त्यांनी दुरध्वनीव्दारे चुकीची माहीती दिल्याने, त्यांचे नांव संस्थानचे ब्लॉक लिस्टमध्ये समाविष्ठ करावे ,असे नम्र मत आहे.

**<u>(ब) सुरक्षा साहीत्य ओपन टेंडर कार्यवाहीबाबत-</u>**

1) ओपन टेंडरव्दारे सदर सुरक्षा साहीत्य खरेदी व रेंटल बेसीसवर घेणेकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रीयेव्दारे टेंडर मागविणेत येऊन,याकामी अनुक्रमे दि.10/07/2015 ते दि.05/08/2015 या कालावधीत वर्तमानपत्रांत जाहीराती प्रसिध्द करण्यात येऊन,त्यांचे टेक्नीकल बीडस ओपनिंग करण्यात आलेले आहेत. परंतु, सदरकामीफक्त 02 निविदाधारक यांच्या ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या असल्यामुळे, शॉर्ट टर्म पध्दतीने पुन्हा ई-टेंडर प्रसिध्द करण्यात यावे, असे निर्देश देण्यात आलेले होते.

2) तदनंतर व्दितीय वेळेस दि.10/08/2015 ते दि. 18/08/2015 या कालावधीत वर्तमानपत्रांत जाहीराती प्रसिध्द करण्यात येऊन, पुन्हा ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. परंतु, यावेळीही फक्त 02 निविदाधारक यांच्या ऑनलाईन निविदा प्राप्त झालेल्या असल्यामुळे, शॉर्ट टर्म पध्दतीने पुन्हा ई-टेंडर प्रसिध्द करण्यात यावे, असे निर्देश तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी सो., यांनी दिले होते.

3) त्यानुसार दि.20/08/2015 ते दि.27/08/2015 या कालावधीत तृतीय वेळेस वर्तमानपत्रांत जाहीराती प्रसिध्द करण्यात येऊन, ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहे. सदरकामी 03 निविदाधारक यांच्या 03 ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या असल्यामुळे, दि.28/08/2015 रोजी टेक्नीकल बीड मा.प्रशासकीय अधिकारी सो., तसेच मा.मुख्यलेखाधिकारी सो., यांचे समक्ष उघडण्यात येऊन, सदरच्या निविदा मा.मुख्यलेखाधिकारी सो.,यांनी तपासल्या असुन, सदर निविदांचे कमर्शियल बीड मा.उपकार्यकारी अधिकारी सो., मा.प्रशासकीय अधिकारी सा., व मा. मुख्यलेखाधिकारी सो., यांचे समक्ष दि.29/08/2015 रोजी उघडण्यात आलेल्या आहेत.

4) सदरकामी कमर्शियल बीड उघडल्यानंतर न्युनतम दर असलेल्या 1) मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन्स प्रा.लि.,नॉईडा, 2) मे.युनिक डेल्टा फोर्स सिक्युरीटी प्रा.लि.पुणे व 3) मे.एस.एस.एंटरप्राईजेस,नाशिक या 03 पुरवठाधारकांना विषयांकीत सुरक्षा साहीत्य खरेदीकामी कार्यदेश देण्यात आलेले आहेत.

5) सदर सुरक्षा साहीत्य खरेदी करणेकामी संदर्भ क्र. 7, 8 व 9 नुसार 1) मे.एस.एस.एंटरप्राईजेस,नाशिक 2) मे.युनिक डेल्टा फोर्स सिक्युरीटी प्रा.लि. पुणे व 3) मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन्स, नाईडा, या 03 पुरवठादारांना दि.29/08/2015 रोजी ई-मेलव्दारे तसेच जावक विभागामार्फत कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर कार्यदेशाप्रमाणे पुरवठादार यांना संदर्भ क्र. 10 नुसार ई-मेलव्दारे तसेच दि.02/09/2015 व दि.04/09/2015 रोजी दुरध्वनीव्दारे संपर्क करुन, साहीत्य पुरविणेबाबत वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे.

त्यानुसार 1) मे.युनिक डेल्टा फोर्स सिक्युरीटी प्रा.लि. पुणे यांनी खालीलप्रमाणे साहीत्य पुरविणेबाबतच्या तारखा त्यांनी ई-मेलव्दारे नमुद केलेल्या आहेत.

The Equipments under the Scope of Unique Delta Force Security Pvt. Ltd. will be delivered as per be below schedule,

1) Sign Boards ञ् Please provide the Content to be printed, once the content is given, it will be delivered by 6 Days.

(सदर मुद्यावर संरक्षण विभागाशी वेळोवेळी समक्ष चर्चा केली असता, Sign Boards बनविणेकामी चा मान्यता प्राप्त मसुदा देणेत यावा. परंतु सदर मसुदा आज अखेर प्राप्त झालेला नाही. तसेच सदरचा मान्यता प्राप्त मसुदा प्राप्त झालेनंतर पुरवठाधारकाने सदर साईन बोर्ड बनविणेकामी 1 आठवडा कालावधी लागणार असल्याचे नमुद केले आहे. तसेच सदर साईन बोर्ड बसविणेकामी शिर्डी नगर पंचायतीचे ना हरकत दाखला व इतर संबंधित विभागांचे परवानगी आवश्यक असल्याचे चर्चेअंती सुचविलेले आहे.

2) Angular Wireless Tower ञ् Please specify the location of Erection of Tower, once the location is fixed, it will be delivered by 20 to 30 Days.

(सदर मुद्यावर संरक्षण विभागाशी वेळोवेळी समक्ष चर्चा केली असता, वायरलेस टॉवरची उभारणीची जागा अद्याप शिर्डी पोलीस स्टेशनकडुन निश्चित न झाल्याने, सदर टॉवर सिंहस्थ कुंभमेळा पर्वात तयार होणे शक्य नाही. तसेच सदरहु जागा निश्चित झालेनंतर पुरवठाधारकाने सदरकामासाठी कमीत कमी 20 ते 30 दिवस इतका कालावधी लागणार असल्याचे नमुद केले आहे.

3) Bullet Poof Picket- within 10 to 12 Days.

As the manufacturing process is started, it required permissions from several authorities for purchase. It will be delivered at SSST in maximum 10-12 Working days.

4) Non-Linear Junction Detector ञ् within 8 to 10 Days.

5) Night Vision Binoculars ञ् within 2 to 3 Days.

6) Traffic Police Signal Sticks ञ् within 5 Days

7) Office Tents / Rahuti ञ् Within 20 Days.

8) Photo Camera - within 3 to 4 Days

9) Trolley Mount Mirror with torch -Within 7 Days.

The above mentioneddeliveryperiod is maximum working days. We will try our best to deliver the Equipments before the given time.

2) मे.व्हेंन्टेज इंटिग्रेटेड सिक्युरीटी सोल्युशन्स, नाईडा, यांनी खालीलप्रमाणे साहीत्य पुरविणेबाबतच्या कालावधी त्यांनी ई-मेलव्दारे नमुद केलेला आहे.

We have received the scanned copy of the purchase order at end of day 6:32 pm on Friday 28th August by email. So office hours had already ended.

29th August was a holiday for Rakshabandhan and 30th Being a Sunday was also a holiday. The official work at our end on the Purchase order which involves.

1. Finalizing vendor for the various items
2. Negotiation of prices
3. Placing Purchase orders
4. Give advance payments

Is already under way since Aug 31 2015 which as per working days treated as the first day of the receipt of Purchase order.

We have paid advances and placed order to all sub vendors for purchasing the items, however some items are to be manufactured as per specification of tender and require a product lead time of 10 to 15 days.

The items which are readily available also have require 4 to 5 days in arranging stocks from warehouse of distributor to Retailer to our office.

Please note we are able to deliver following equipments next week which will be dispatched via truck from Noida 9th August.

1. Fiber chairs
2. Rechargeable torch
3. Traffic Jacket
4. Megaphone
5. AC 2 TON
6. LED TV
7. Video Camera
8. Yellow Police Tape
9. Breath Analyzer
10. HHMD

Regarding other items we request a week more as they are customized manufactured items

1. Steel cupboard
2. Manila Rope
3. Tadpatri
4. Dragon light
5. Raincoat

1) मे.एस.एस.एंटरप्राईजेस,नाशिक यांनी दि.04/09/2015 रोजीचे ई-मेलव्दारे पाठविलेल्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

उपरोक्त पुरवठाधारकांना कार्यादेश हा दि.28/08/2015 रोजी देण्यात आला असुन, आजअखेर एकाही पुरवठाधारकांनी कार्यादेशाप्रमाणे साहीत्य पुरविलेले नसुन, त्यांनी निविदेमध्ये नमुद केलेप्रमाणे 15 दिवसांचे आत पुरविणे आवश्यक आहे. परंतु सदर साहीत्य सिंहस्थ कुंभमेळा कालावधीत प्राप्त न झाल्यास सदर साहीत्य विनाकारण/ विनावापर पडुन राहील. तसेच सदर साहीत्यांचा वापर न झाल्यास त्यात संस्थानचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदरहु विषयावर यथोचित निर्णय तथा आदेश व्हावा, ही विनंती.

तसेच मा.व्यवस्थापन समितीने दि.28/08/2015 रोजी दिलेल्या सुचनेनुसार विषयांकीत निविदेतील अ.नं. 3 व 18 बाबत मे.युनिक डेल्टा फोर्स सिक्युरीटी प्रा. लि. पुणे यांना ई-मेल व दुरध्वनी केला असता, त्यांनी दि.08/09/2015 रोजी शिर्डी येथे सँपल घेऊन येणार असल्याचे कळविलेले आहे. त्यानुसार मा.व्यवस्थापन समितीचे सुचनेनुसार अ.नं. 3 बाबत बांधकाम विभाग व 18 बाबत शिर्डी पोलीस स्टेशनचा अभिप्राय घेऊन, प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेपुढे निर्णयार्थ तथा आदेशास्तव सादर करता येईल,असे नम्र मत आहे.

**<u>(क) सुरक्षा साहीत्य लिमिटेड टेंडर कार्यवाहीबाबत-</u>**

6) पोलीस विभागाचे बॉम्ब शोधक व नाशक पथक (बीडीडीएस) यांचे मागणीप्रमाणे स्पेशलाईज इक्युपमेंन्टस खरेदी करणेकामी लिमिटेड टेंडर (PSU) प्रक्रीयेव्दारे 100% शासकीय असलेल्या कंपन्यांमार्फत सदर सुरक्षा साहीत्य खरेदी करणे व रेंटल बेसीसवर घेणेकामी दोन वेळा निविदा मागविणेत आलेल्या होत्या. तथापी, दोनही वेळेस एकच निविदाधारक यांनी निविदा भरलेली असल्यामुळे, याबाबतची पुढील कार्यवाही मा.कार्यकारी अधिकारी यांचे सुचनेनुसार करता येईल, असे नम्र मत आहे.

सबब, वरील प्राप्त पुरवठाधारकांचे ई-मेलचे व वेळोवेळी त्यांचेशी केलेला पाठपुरावा याचे एकत्रित अध्ययन करता, इकडील विभागाचे मत खालीलप्रमाणे आहे.

उपरोक्त प्रस्तावातील (अ) बाबत- मे.शंकर मेटल वर्क्स, कानपुर, उत्तरप्रदेश या पुरवठादाराशी वेळोवेळी पाठपुरावा केलेला असतांनाही त्यांनी अद्यापपर्यंत साहीत्यांचा पुरवठा केलेला नसल्याने, तसेच वेळोवेळी त्यांनी दुरध्वनीव्दारे चुकीची माहीती दिल्याने, त्यांचे नांव संस्थानचे ब्लॉक लिस्टमध्ये समाविष्ठ करणेस मान्यता असावी, असे नम्र मत आहे.

प्रस्तावातील (ब) बाबत- आजअखेर एकाही पुरवठाधारकांनी कार्यादेशाप्रमाणे साहीत्य पुरविलेले नसुन, त्यांनी निविदेमध्ये नमुद केलेप्रमाणे 15 दिवसांचे आंत साहीत्य पुरविणे आवश्यक आहे. परंतु, सदर साहीत्य सिंहस्थ कुंभमेळा कालावधीत प्राप्त न झाल्यास, सदर साहीत्यांचा वापर न झाल्यास सदर साहीत्य विनाकारण/विनावापर पडुन राहील. तसेच सदरहु साहीत्य सिंहस्थ कालावधीत उपलब्ध होण्याची शक्यता कमी असल्यामुळे यात संस्थानचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होण्याची दाट शक्यता आहे. तसेच, वायरलेस टॉवरची उभारणीची जागा अद्याप शिर्डी पोलीस स्टेशनकडुन निश्चित झालेली नसल्यामुळे, सदर टॉवर सिंहस्थ कुंभमेळा पर्वात तयार होणे शक्य नाही.

त्यामुळे उपरोक्त **(अ) व (ब)** बाबत तसेच विषयांकीत प्रस्तावावर यथोचित निर्णय होणकामी प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ तथा आदेशास्तव सविनय सादर.

निर्णय क्र.३१६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शासनाकडील दर करारानुसार व ई-निविदा पध्दतीने केलेल्या सुरक्षा साहित्य खरेदी कार्यवाहीची व सद्यस्थितीच्या अहवालाची नोंद घेण्यात आली व मागणीप्रमाणे सुरक्षा साहित्य वेळेत मिळावे, यासाठी पुरवठाधारकांकडे पाठपुरावा करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- सीसीटीव्ही कंट्रोल सेलप्रमुख)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०४ **श्री साई प्रसादालयाकरीता गहु आटा खरेदीबाबत.**

प्रस्ताव- वार्षिक किराणामाल खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.७७,५०,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार संदर्भ क्रमांक ३ अन्वये मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २८.०५.२०१५ रोजीचे सभेत, प्रसादालयाकरीता प्रायोगिक तत्वावर एक महिन्यासाठी गहु आटा (सम्राट ब्रॅण्ड) खरेदी करुन वापरणेबाबत सन २०१५-१६ चे किराणामालाचे निविदा प्रक्रियेचे अंतिम निर्णयाचे वेळी ठरले होते.

वरील निर्णयानुसार प्रसादालयाकरीता एक महिन्यासाठी सम्राट ब्रॅण्डचा गहु आटा १,००० क्विंटल खरेदी करण्यात आला आहे.

सदर गहु आटा प्रसादालयाकडे वापरात असून प्रसादालयाकडून याबाबतचा खालीलप्रमाणे अहवाल प्राप्त झाला आहे.

**अ.** सदरहु सम्राट कंपनीचा गहु आटा श्री साई प्रसादालयातील संस्थानचे प्रयोगशाळेत अन्न सुरक्षा कायदा-२००६ नियम-२०११, भारत सरकार यांनी ठरवून दिलेल्या मानकाप्रमाणे वापरायोग्य आहेत किंवा कसे? याबाबत त्याची तपासणी करण्यात आलेली आहे. तपासणीमध्ये प्रयोगशाळेचा अहवाल मानके कायदा-२००६ व नियम-२०११ चे २.४.१(१) चे नियमात वापरासाठी योग्य दिसून आलेला आहे."

**ब.** प्रसादालयात चपाती व पुरी तयार करणेकामी असलेले श्री शिवसाई केटरर्स अॅण्ड लेबर कॉन्ट्रॅक्टर, निमगांव-शिर्डी यांनीही प्रसादालयात जेवणातील तयार केलेली चपाती व पुरी खाण्यास खुप स्वादिष्ट व चवदार होती. चपाती व पुरीसाठी वापरणेत येणारा सम्राट आटा चांगल्या प्रतीचा आहे, असा अभिप्राय दिलेला आहे.

**क.** अहमदनगर येथे सदर आट्याची अन्न औषध प्रयोगशाळा (अहमदनगर) येथे तपासणी केली असता, तो अन्न प्रशासनाचे नियमाप्रमाणे योग्य असल्याचा अहवाल प्राप्त आहे.

श्री साई केटरर्स, श्रीरामपुर यांनी मशिन चपाती व पुरीसाठी वापरणेत येणारा सम्राट आटा चांगल्या दर्जाचा आहे, असा अभिप्राय दिलेला आहे.

त्याचप्रमाणे संस्थानचे कायम आचारी सर्वश्री पुरोहीत, कर्डीले, दाभाडे यांनीही सदरहु आट्याबाबत सकारात्मक अभिप्राय दिलेले आहेत."

गहू खरेदी केल्यास त्यापासून आटा तयार करावा लागतो, यासाठी गिरणी, मनुष्यबळ, विज इत्यादीचा मोठया प्रमाणात वापर करावा लागतो. गहु आट्यासाठी रु.२,०५१/- प्रति क्विंटल असा दर आहे, तर गहू दळून पीठ करणेस सरासरी रु.२,४११.८२ प्रति क्विंटल इतका खर्च लागतो. याचाच अर्थ आटा वापरल्यास थोडी आर्थिक बचत होते.

उपरोक्त प्रमाणे पुढील कालावधीसाठी गहु आटा खरेदीबाबत योग्य तो निर्णय होणेकामी सदरचा विषय संदर्भ क्रमांक ४ अन्वये मा.व्यवस्थापन समितीचे सभेत circulatery अजेंडा तयार करुन निर्णयार्थ सादर केला असता "तीन महिने कालावधीसाठी गहु आटा खरेदी करावा," असा निर्णय झालेला आहे. त्याप्रमाणे मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगाव यांना जूलै-१५ ते सप्टेंबर-१५ या तीन महिन्यांसाठी ४,१०० क्विंटल गहू आटा खरेदीचा पुरवठा आदेश देणेत आलेला होता. याकामी रु.८४,०९,१००/- इतका खर्च (रु.२०५१/- प्रति क्विंटल दराने) झाला आहे.

सदर गहुआटयाची मागणी पुर्ण झालेली असून तो १० सप्टेंबर पर्यंत साधारणपणे पुरेल असा अंदाज आहे.

करिता दिनांक ०५.०९.२०१५ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात झालेल्या चर्चेनुसार मा.महोदय यांनी "मा.व्यवस्थापन समितीचा अंतिम निर्णय होईपावेतो साईभक्तांना प्रसाद भोजन देणेकामी अडचण निर्माण होऊ नये म्हणून तातडीची गरज लक्षात घेता, पुढील दोन महिन्यांकरीता (ऑक्टोबर-२०१५ ते नोव्हेंबर-२०१५) आवश्यक गहु आटा खरेदी करावा," असे निर्देश दिलेले आहेत.

त्यानुसार संदर्भ क्रमांक ५ अन्वये दि.०४.०७.२०१५ राजीचे मा.व्य.समितीचे निर्णय क्र.१९७ नुसार माहे ऑक्टोबर-२०१५ ते नोव्हेंबर-२०१५ या दोन महिन्यांच्या कालावधीकरीता २,२०० क्विंटल गहु आटा मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव यांचेकडून रु.२,०५१ मात्र प्रति क्विंटल या दराने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु.४५,१२,२००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. त्रिसदस्यीय समिती चे सभेत निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.३१७ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईप्रसादालयामध्ये साईभक्तांना प्रसाद भोजन पुरविणेकरीता मे.संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव यांचेकडून रु.२,०५१/- मात्र प्रति क्विंटल या मंजूर दराने एक महिना कालावधीसाठी आवश्यक असलेला गहू आटा खरेदी करणेत यावा.**

**तसेच प्रसाद भोजन पुरविणेकामी गव्हाचा वापर करण्याची शक्यता पडताळून पाहण्यासाठी वार्षिक किराणा खरेदीमधील गहू पुरवठयाचा दर व आजचे बाजारभावातील गव्हाचा दर याचा तौलानिक अभ्यास करुन गहू खरेदी करावा किंवा कसे, याबाबतचा सविस्तर प्रस्ताव समितीसमोर निर्णयार्थ सादर करणेत यावा.**

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा
विषय नं.०५ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०१५-१६ या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य (Part-A) व On Consignment basis वरील Item खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे दैनंदिन वापरासाठी लागणारे सन २०१५-१६ या वर्षाकरिता लागणा-या औषधे, सर्जिकल साहित्य, लॅब व ब्लड बँक केमीकल्स, क्ष किरण फिल्मस्, डेंटल मटेरीयल, मलम, आयुर्वेदीक

औषधे, कॅथलॅब व कार्डीयाक ओटी मटेरीयल न्युरो मटेरीयल, सिटीस्कॅन व एमआरआय फिल्मस्, आय लेन्सेस इत्यादी खरेदीकामी दि.१९/०४/२०१४ चे परिपत्रकान्वये वॉर्ड/ विभाग प्रमुख यांना गतवर्षाची मागणी केलेल्या औषधांची यादी देण्यात आली होती. त्यामध्ये त्या औषधांची आवश्यकता आहे त्यांची मागणी केलेली आहे. तसेच काही औषधांची मागणी गतवर्षातील खपाचा अनुभव/ शिल्लक असलेला औषध साठा यांचा विचार करता मागणी केलेली नाही. तर काही डॉक्टरांनी सुचविल्याप्रमाणे नवीन औषधे, साहित्य इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे अशा प्रकारे सर्व औषधांची मागणी कमी करुन व नवीन औषधांचा यादीत समावेश करुन अंतिम तक्ता तयार करण्यातआला आहे.

या औषधे खरेदीकामी येणा-या अंदाजे रु.५५७३३६३९१.६६ चे खर्चास व औषधे खरेदीची कार्यपध्दत अ.नं. १ ते १० चे प्रस्तावास मान्यता घेण्याचा प्रस्ताव दि.३०/०१/२०१५ चे मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे ठेवण्यात आला होता यावर चर्चा होऊन निर्णय क्र.२६ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरिता वार्षीक सन (२०१५-१६) या वर्षाकरिता लागणारे औषधे सर्जिकल साहित्य प्रस्तावात नमुद केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.५५,७३,३६,३९२/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची परवानगी घेण्यात यावी असे ठरले.

त्यानुसार सदरचे खरेदीस सिव्हील ॲप्लीकेशन नंबर. ३४९५ दि.१३/०३/२०१५ अन्वये ई-निविदा मागवून खरेदी करण्यास मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता मिळालेली आहे.
त्यानुसार सदर खरेदीकामी ई-निविदेची जाहिरात संस्थानचे संकेत स्थळावर तसेच दैनीक सकाळ – पुणे, टाईम्स ऑफ इंडिया – मुंबई, दिल्ली, अहमदाबाद, चंदीगढ या वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्यातआली . याशिवाय संस्थानला नियमित पुरवठा करणारे कंपनी / अधिकृत विक्रेते यांना देखील ई-मेल दुरध्वनीद्वारे जाहिरातीबाबत अवगत करण्यात आले होते. सदर खरेदीकामी जाहिरात देऊन निविदा मागविण्यात येत असतांनी दि.१८/०४/२०१५ रोजी प्री-बीड मिटींगमध्ये पुरवठाधारक उपस्थित होते सदर मिटींगमध्ये शंकांना देखील उत्तरे देण्यात आली होती.

तद्नंतर जाहिरातीस अनुसरुन PART – A करिता ८१ तर PART – B करिता ३४ तांत्रिक निविदा प्राप्त झाल्या होत्या.

सदर ऑनलाईन तांत्रिक निविदा दि.११/०५/२०१५ रोजी मा. वैद्यकीय संचालक यांचे समक्ष उघडण्यात आल्या होत्या तद्नंतर सदर तांत्रीक निविदाधारकांनी निविदेसोबत मागणी केलेल्या कागदपत्रांचे लेखा विभागामार्फत तपासणी करण्यात येऊन तांत्रीक निविदा पात्र ठरविण्यात आलेल्या आहे. तसेच मा. कार्यकारी अधिकारी सो यांचे दि.१५/०५/२०१५ रोजीचे मंजुर टिपणीन्वये सदर खरेदीकामी संस्थान मार्फत खालील सदस्यांची समिती गठीत करण्यात आली ज्यामुळे संपुर्ण निविदा प्रक्रियेत पारदर्शीपणा राहण्यास मदत होऊ शकते.-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. आर.व्ही.प्रभाकरराव | - | वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा संस्थान रुग्णालये , शिर्डी |
| २. | डॉ. विजय पाटील | - | उप वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी. |
| ३. | श्री अशोक औटी | - | फायनान्स मॅनेजर |
| ४. | श्री कुणाल आभाळे | - | मटेरीयल मॅनेजर |

याशिवाय ज्या विभागाच्या औषधांच्या खरेदीचा विषय असेल त्यावेळी त्या त्या विभागाच्या वैद्यकीय प्रतिनिधिला आमंत्रित करण्यात येईल.

उपरोक्त समितीचे कामकाज मा. कार्यकारी अधिकारी सो यांच्या मार्गदर्शनाखाली चालेल त्यामुळे खरेदी प्रक्रिया अधिकाधिक पारदर्शक होऊन संस्थानचे हीत आबादीत राहील.
त्यानुसार दि.२१/०५/२०१५ रोजी संस्थानचे मुख्यलेखाधिकारी श्री झिरपे सो व संस्थान तथा रुग्णालयाचे अधिकारी उपस्थीत होते. त्याचे समक्ष कर्मशियल निविदा ऑनलाईन उघडण्यात आल्या होत्या प्राप्त ऑनलाईन कर्मशियल निविदा उघडल्यानंतर त्याचा तुलनात्मक दरांचा तक्ता बनविण्यात आला होता. सदर प्राप्त तुलनात्मक दरांसाठी प्राप्त BOQ नुसार निविदाधारकांशी त्यांचे भरलेल्या औषधे / सर्जिकल साहित्याची माहिती घेऊन वापरणारे डॉक्टर / सिस्टर अथवा तंत्रज्ञ यांचे समोर चर्चा करण्यात आलेली आहे.

सदर चर्चा करतेवेळी बरेच निविदाधारकांनी संस्थानचे धर्मादाय रुग्णालय असल्यामुळे स्वतः हून दर कमी करुन दिलेले आहेत,या सर्व चर्चेचे व्हीडीओ रेकॉर्डडींग करण्यात आले आहे.

सदर खरेदीमध्ये सर्व संमतीने खालील मुद्दयाचा विचार करण्यात आलेला आहे.

१. ज्या औषधांकरिता कोणत्याही निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झालेली नाही त्यासाठी फेर निविदा मागविण्यात यावी.

२. जर क्र.१(L1) साठी नामांकित कंपन्याचे Branded किंवा Generic औषधांसाठी दर प्राप्त झालेले असतील तर तेथे त्यांची शिफारस करण्यात आलेली आहे.

३. तसेच ब-या ठिकाणी L1 साठी नवीन कंपन्यांचे (म्हणजेच आपणास सदर कंपनीचा अनुभव नसेल अशा) दर प्राप्त झालेले आहे तेथे सदर कामी त्याचा नमुना घेऊन त्याचा संबंधीत विभागाने प्रात्याक्षिक केल्यानंतर त्या कंपनीच्या इतर ठिकाणी पुरवठा करणेबाबत त्याचे Manufactering Licence त्याचा मागील तीन वर्षाचा टर्न – ओव्हर, त्या कंपनीला शासनाने दिलेल्या मान्यतेचे सर्टिफिकेट त्यांची तपासणी करुन घेण्यात येऊन त्या औषधे / सर्जिकल साहित्य तथा Lab Material या बाबी संबंधीत वैद्यकीय अधिका-याने प्रमाणित केल्यानंतर खरेदी करण्याचे ठरले.

४. काही ठिकाणी फक्त एक अथवा दोन पुरवठाधारकांचेच दर प्राप्त झालेले असल्याने सदरकामी कमीत कमी तीन पुरवठाधारकांचेदर आवश्यक असल्यामुळे पुन्हा फेर– ईनिविदा मागविण्यात येत आहेत.

५. दोन्ही रुग्णालयात वापरणारे लॅब केमीकल्स, साहित्य तसेच ऑपरेशन थिएटरमध्ये वापरणारे सुचर्ससाठी प्राप्त निविदाधारकांनी मटेरियल सुचर्सचा नमुने यांचे प्रात्याक्षिक घेऊन ते निकषावर उतरल्यास सदर मटेरियल खरेदी करण्याचे ठरले होते. त्यापैकी ज्या वस्तुचे प्रात्याक्षिक संबंधीत वैद्यकीय अधिका-याने घेतल्यानंतरते योग्यअसल्याचे प्रमाणित केले. ते सध्या खरेदीसाठी प्रस्तावित करणेत आले असून, उर्वरित औषधांची प्रात्यक्षिकांची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर वैद्यकीय अधिका-यांच्या सल्ल्यानुसार स्वतंत्रपणे फेर सादर करण्याचे प्रस्तावीत आहे.

६. काही ठिकाणी फक्त एकाच निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले असून ते औषधे / सर्जिकल साहित्य फक्त तीच कंपनी बनवित असल्याने Monopoly Item म्हणून त्याची निवड करण्यात आली आहे.

७. कार्डीयाक ओ.टीसाठी लागणारे Valve / Ring व इतर सर्जिकल मटेरियलसाठी कार्डीयाक सर्जन यांचे शिफारशीनुसार निवड करण्यात आलेली आहे. बरेच औषधे व सर्जिकल साहित्यांसाठी वापरणारे डॉक्टर यांचे शिफारशीन्वये L1प्राप्त दराचा विचार न करता उत्तम दर्जा पाहून L2 अथवा L3 घेण्याची शिफारस करण्यात आलेली आहे.

८. सर्पदंशासाठी लागणारे इंजेक्शन ASV हे व्हक्सीन Life saving औषध असून त्यासाठी मागील वर्षाप्रमाणे या वर्षी देखील कोणाचेही दर प्राप्त झालेले नाहीत. सदरचे इंजेक्शन हे दोन्ही रुग्णालयात उपचार घेणा-या रुग्णांना मोफत वापरण्यात येतात. सदर इंजेक्शनची मुदतबाह्यता फार कमी असल्यामुळे हे इंजेक्शन रुग्णालयाच्या गरजेनुसार व मार्केटमधील त्यावेळी ज्या विक्रेत्याकडे उपलब्ध असेल त्यांच्याकडून घेण्यास मान्यता असावी.

९. हिमोफिलीया रुग्णांसाठी लागणारे इंजेक्शन (Factor VIII) हे पुर्वी फक्त अहमदनगर जिल्हयातील रुग्णांना मोफत देण्यात येत होते. परंतु आता सदरचे इंजेक्शन जिल्हया बाहेरील रुग्णांना देखील मोफत देण्याचे ठरलेले आहे त्यामुळे सदर इंजेक्शनचाखप वाढलेला आहे. सदरचे इंजेक्शन हे जितके लागेल तितक्या प्रमाणात (On Consignment Basis ) वर हिमोफिलीया सोसायटी, नाशिक यांचेकडून त्यांचे सध्याचेदर प्रति युनिट रु.१०/- याप्रमाणे त्यांना वेळोवेळी आगाऊ रक्कम देऊन खरेदी करण्यास मान्यता असावी. कारण निविदामध्ये सदर इंजेक्शनसाठी M/s. Keps Pharma यांचे एकमेव दर प्राप्त झालेले असून ते प्रति युनिट रु.१४.४९/- (Reliance Company) असे आहे. तसेच सदरचे इंजेक्शन नाशिक येथे उपलब्ध न झाल्यास ते तातडीने M/s. Keps Pharma, Mumbai यांचेकडून घेता येईल.

१०. काही ठिकाणी दर प्राप्त झाले असून त्याचा दर्जा चांगला नसल्याने फेर निविदा मागविण्याचे प्रस्तवित आहे रुग्णालयातील दैनंदिन रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून सदरची औषधे गरजेनुसार मागील वर्षाच्या दराने खरेदी करणेस मान्यता असावी.

११. बरेच ठिकाणी मागील वर्षाप्रमाणे या वर्षी देखील दर प्राप्त न झाल्याने दैनंदिन औषधे / सर्जिकल साहित्याचा तुटवडा पाहता तसेच स्थानिक पुरवठाधारकाकडे सदर मटेरियल उपलब्ध नसल्याने सदर लाईफ सेव्हिंग तसेच ओ.टीसाठी लागणा-या औषधे / सर्जिकल साहित्य खरेदीकामी तात्पुरत्या स्वरुपात तातडीची गरज पाहता तातडीने खरेदी करण्यास मान्यता असावी. तसेच सदरकामी काही वेळेस ईमेलद्वारे कोटेशन्स मागवून मा. वैद्यकीय संचालक यांचे मान्यतेने सदर खरेदी करता यावी.

१२. एम.आर.आय,सीटी स्कॅन व एक्स-रे साठी लागणारे फिल्मस् खरेदीकामी Fujifilmes कंपनीच्या Film साठी त्यांनी आपणास 5% दरात सवलत देऊन अतिरिक्त प्रिंटर तसेच पुढील ५ वर्षासाठी CR System ची मोफत CMC करणार आहे. त्यामुळे M/s. Fujifilmes यांना त्यांचा संस्थानशी झालेल्या करारानुसार दि.३०/११/२०१५ रोजी पर्यंत पुरवठा आदेश देता येईल. तद् नंतर सदर खरेदीकामी प्राप्त निविदाधारकांच्या दरांचा व स्किमचा विचार करुन तज्ञ समितीच्या सल्ल्याने पुढील आदेश घेता येईल.

१३. Demo च्या शिफारशीअन्वये घेण्यात येणा-या औषधे / सर्जिकल साहित्यांचा पुरवठा आदेश दिल्यानंतर प्राप्त मटेरियलमध्ये काही त्रुटी व वापर करणा-या डॉक्टरांना काही अडचणी आल्यास सदर पुरवठाधारकास समक्ष बोलवून शंका निरसन करण्यास सांगण्यात येईल तद् नंतर ही सदर मटेरियलबाबत शंका निरसन न झाल्यास त्याचा पुरवठा आदेश रद्द करण्यात येऊन पुढील प्राप्त निम्नतम दराने पुरवठा आदेश देण्यात येईल.

१४. सदर पुरवठाधारकांना पुरवठा आदेश दिलेल्या मटेरियलचा दर हा त्यांनी दिलेल्या दरापेक्षा बाजारात इतरत्र कुठेही कमी आढळल्यास सदर पुरवठाधारकास बील हे बाजारभावाप्रमाणे अदा करण्यात येईल, अशी तरतुद निविदा अटीमध्ये करण्यात आली आहे. त्यामुळे यानंतरही काही औषधाच्या बाबतीत अशी बाब समोर आल्यास या अटीची अंमलबजावणी करता येईल.

१५. श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीयाक सर्जन यांनी M/s. Jhonson and Jhonson, Ethicon Division, Mumbai यांचे Suture घेणेबाबत कळविले आहे. M/s. Jhonson and Jhonson, Ethicon Division, Mumbai यांनी Government हॉस्पिटलबरोबर केलेल्या Rate Contract चे दर हे आपले निविदेमध्ये भरलेल्या दरापेक्षा 30% दराने हे कमी असून सदर Rate Contract चे दराने एकुण १७ प्रकारचे सुचर्स खरेदी केल्यास रु.२४२४६३०/- इतक्या रक्कमेचा फायदा होऊ शकतो. त्यामुळेसदर सुचर्स हे Rate Contract चे दराने खरेदी करता येईल.

१६. करोनरी वायरसाठी पुरशा निविदा प्राप्त न झाल्याने सदर कामी फेर निविदा प्रक्रिया राबविणेत येऊन पुढील तीन महिन्यासाठी करोनरी वायर प्राप्त निविदेतील Terumo Co. च्या तीन प्रकारच्या वायर प्रत्येकी ५० नग याप्रमाणे १५० नग वायर खरेदीचा प्रस्ताव आहे.

१७. Denatured Spirit खरेदीकामी प्राप्त निविदाधारकांमध्ये मागील वर्षाचे मे.त्रिलोक एंटरप्रायजेस, श्रीरामपुर यांचे निम्नतम असून सदर पुरवठाधारकांचे मागील दराबाबत / पॅकींगबाबत तसेच शिर्डी पोहच करणेबाबत झालेल्या चुकीमुळे संस्थानला तोटा सहन करावा लागलेला आहे.त्यामुळे त्यांना संस्थानचे पुरवठाधारकांच्या काळी यादीत टाकणे येऊन स्पिरीटकामी दुस-या क्रमांकाचे प्राप्त निम्नतम दरांने पुरवठा आदेश देण्याचे ठरले आहे.

तेव्हा वरीलप्रमाणे निवडण्यात आलेल्या PART A करीता एकुण पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देण्याचे प्रस्तवित असून त्याची एकुण रु.१६,७५,७२,९४७,४४४ इतकी होत आहे. तसेच PART B करीता मागील वर्षाचा वापर पाहाता व सध्या प्राप्त झालेल्या दरानुसार अंदाजे रक्कम रु.४,०५,१४,२८७.०० इतका खर्च अपेक्षित आहे. दोन्ही मिळून अंदाजे रक्कम रु.२०,८०,८७,२३४,४४४ इतका पुरवठा आदेश देणेत येत आहे.

या औषधांचे मागील वर्षीचे प्राप्त दरावर आधारित औषधांची एकुण किंमत तसेच निविदेद्वारे प्राप्त प्रस्तवित दरानुसार होणारी एकुण किंमत याची माहिती देणारे विभागनिहाय विवरणपत्र सोबत अवलोकनार्थ जोडले आहे.औषधे खरेदी विभागातील नवीन कर्मचारी व प्रत्येक विभागाचे डॉक्टर तसेच अन्य सर्वसंबंधीतांच्या सहकार्यामुळे या रक्कमेमध्ये ब-याच मोठया प्रमाणात बचत झाली असल्याचे स्पष्ट दिसते. सदरची बचत प्राप्त करतांना रुग्णालयाच्या प्रशासनाने कोणत्याही प्रकारे औषधांच्या गुणवत्तेशी तडजोड केलेली नाही. संबंधीत वैद्यकीय अधिका-यांनी प्रमाणित केल्या नंतरच ही औषधे खरेदीसाठी प्रस्तवित करण्यात आली आहेत.मागील वर्षाच्या तुलनेत या वर्षीच्या खरेदीवरील बचतीची रक्कम प्राथमिक दृष्टया रु.७,६५,४१,६३६.६४८ इतकी आहे.

(प्रस्तावित वैद्यकीय साहित्याचे निविदेद्वारे प्राप्त दर व त्यापैकी निवडलेले दर कारणमीमांसे सह दर्शविणारे विभाग निहाय तक्ते सोबत ठेवण्यात आले आहेत.)

तरी उपरोक्तप्रमाणे पुरवठाधारकांना वार्षीक पुरवठा आदेश देण्याचा प्रस्ताव मान्यता असावी.

**निर्णय क्र.३१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०१५-१६ या वर्षाकरीता लागणारे औषधे व सर्जिकल साहित्य (Part-A) व On Consignment basis वरील Item खरेदी करणेकामी येणा-या खर्चास मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामधील सिव्हील अॅप्लीकेशन नंबर ३४९५ वरील दि.१३/०३/२०१५ रोजीचे आदेशान्वये मान्यता मिळालेली आहे. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे प्रस्तावित औषधे खरेदीकामी केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन होऊन, संबंधीत पुरवठाधारकास पुरवठा आदेश देणेकामी मा.अध्यक्ष महोदय व समिती सदस्य यांची चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली आहे, त्याची नोंद घेण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **मा.विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.३१९** **मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करणेत आल्या.**

(१) आजचे सभेत श्री साईबाबा हॉस्पिटल मधील डॉक्टरांना इन्सेटीव्ह देण्याबाबत पुढील धोरण निश्चीत करणेबाबत चर्चा झाली. यापुर्वी त्रिसदस्य समितीने चर्चा करुन डॉक्टरांना इन्सेटीव्ह वाढवून देण्यास तत्वत: मान्यता दिलेली आहे. त्या निर्णयान्वये काही डॉक्टरांना प्रायोगिक तत्वावर इन्सेटीव्ह देणे मान्य केले होते. त्यानंतर समितीचे असे निदर्शनास आले की, इन्सेंटीव्ह दराच्या वाढीबाबतची इतरही डॉक्टरांची मागणी एकत्रीतपणे विचारात घेणे गरजेचे आहे. त्यामुळे नविन इन्सेटीव्हचे दर लागू करण्यापुर्वी सदर गोष्टीचा व्यापक अभ्यास करण्याची गरज भासली. केवळ रुग्णालय बंद पडू नये व रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून डॉक्टर सोडून जाऊ नयेत यासाठी प्रायोगिक तत्वावर एक महिन्यासाठी वाढ देण्यात आली होती. आता प्रस्तावित वाढीचा किती आर्थिक बोजा संस्थानवर पडतो याचा तौलानिक अभ्यास समितीसमोर येणे गरजेचे वाटले. तसेच सुरुवातीपासून इन्सेटीव्ह संदर्भातील सर्व मागण्या व ठराव एकत्रित समोर येणे गरजेचे वाटते. इन्सेटीव्हच्या ठरावाच्या अंमलबजावणीबाबत लेखा विभागाने काही तांत्रिक मुद्दे उपस्थित केले होते, त्याचाही अभ्यास करणे गरजेचे आहे. नविन इन्सेटीव्हबाबत धोरण निश्चीत होईपर्यत प्रायोगिक वाढीचा अंमल न करता सर्व डॉक्टरांना जुन्याच प्रचलित दराने इन्सेटीव्ह चालू ठेवावा, असेही समितीने ठरवले व लवकरच नवीन सर्वसमावेषक प्रस्ताव ठेवावा अशा सुचना केल्या.

डॉ.मनोहर शिंदे यांना मासिक ३ लाख रुपयांचे मानधनावर नेमलेले आहे. डॉ.मनोहर शिंदे यांनी वेळोवेळी त्यांचे मानधनात वाढ करावी, अशी विनंती केलेली आहे. तसेच डॉ.शिंदे यांची मुख्य मागणी अशी आहे की, त्यांना मासिक ३ लाख रुपये मानधनावर न ठेवता त्यांना इतर डॉक्टरांप्रमाणे रु.६१,०००/- रु. मासिक मानधन व नियमाप्रमाणे इतर डॉक्टरांना दिल्या जात असलेल्या इन्सेटीव्हचे दराने इन्सेटीव्ह देण्यात यावा व त्यांनी वाढीसाठी ०४/०२/२०१५ रोजी राजीनामाही दिला होता. डॉ.शिंदे वैद्यकीय क्षेत्रात तज्ञ असून त्यांनी हॉस्पिटल चालविण्यास बरीच मदत केली आहे. डॉ.शिंदे यांचे कार्य लक्षात घेऊन समितीने यापुर्वी ठराव क्र.२११ ने त्यांना १ ऑगस्ट २०१५ पासून ६१,०००/- रुपये मासिक मानधन व इन्सेटीव्ह देण्याचा निर्णय घेतलेला आहे. परंतु समितीचे असे मत पडले की, डॉ.शिंदे यांची नेमणूक उच्च न्यायालयाचे आदेशाने झालेली आहे. तसेच त्यांचे मानधन कोणत्या आदेशाने ठरले व त्यांच्या वेतन रचनेमध्ये बदल करण्यास काही तांत्रिक अडचण आहे का, याचा अभ्यास करणे गरजेचे वाटते. डॉ.शिंदे यांचे मानधन वाढवणे अथवा त्यांची वेतन रचना बदलून त्यांनाही इन्सेटीव्ह सुरु करणे समितीला योग्य वाटते. परंतु त्यामध्ये कोणती तांत्रिक अडचण येऊ नये म्हणून त्यांची नेमणुक, नेमणुकीच्या वेळी ठरलेले मानधन व मा.उच्च न्यायालयाचे वेळोवेळी झालेले आदेश याचा एकत्रित अभ्यास करुन लवकरात लवकर सविस्तर प्रस्ताव समिती समोर ठेवावा व त्यांनतरच

डॉ.मनोहर शिंदे यांचे इन्सेटीव्ह देणेबाबत ठराव क्र.२११ ची पुढील कार्यवाही करावी, असे ठरले. तसेच संपुर्ण इन्सेटीव्हच्या विषयाबद्दल काही तांत्रिक अडचण येते का हे तपासून त्या निर्णयास मा.उच्च न्यायालयाची परवानगी घेणे गरजेचे आहे किंवा कसे याचाही अभ्यास करावा व समितीच्या पुढील सभेमध्ये लवकरात लवकर सविस्तर असा सर्वसमावेषक अभ्यासपूर्ण प्रस्ताव मांडण्यात यावा, असे समितीने ठरवले. (कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

---

(२) सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ मध्ये होणा-या गर्दीचे नियोजन करणेसाठी पोलिस विभागाने ५०० नग लोखंडी बॅरीकेडस् ची मागणी केलेली होती. त्यानुसार विहीत पध्दतीने कार्यवाही करणेत येऊन, तातडीची गरज म्हणून पोलिस विभागास ३०० नग बॅरीकेडस् देण्यात आलेले आहेत. आजचे सभेत डॉ.सौरव त्रिपाठी, पोलिस अधिक्षक, अहमदनगर हे उपस्थित होते व सुरक्षीततेबाबत चर्चा करत असताना त्यांनी भाविकांचे सोयीसाठी व गर्दीचे नियोजन करणेकरीता उर्वरीत २०० नग लोखंडी बॅरीकेडस् मिळावेत, अशी विनंती सभेस केली.

यावर चर्चा होऊन असे ठरले की, दि.२४.०६.२०१५ रोजीचे त्रीसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.१६४ अन्वये मे.प्रेस-व्हॅक स्टील इंडस्ट्रीज, सिन्नर यांचे ३०० नग लोखंडी बॅरीकेडस् पुरविणेकामी एकत्रित रु.५,५८,१८५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत आले होते. याच मंजूर दरामध्ये त्यांचेकडून आणखी २०० नग लोखंडी बॅरीकेडस् बनवून घेण्यात यावेत. जर निम्नतम दरधारकाने याकामी असमर्थता दर्शविली तर द्वितीय निम्नतम दरधारकाकडून हे काम करुन घेण्यात यावे. तसेच याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र.२८९ ते ३१९ सर्वानुमते घेण्यात आला.
यानंतर रात्रौ ०९.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/-**xxx** | स्वाक्षरित/- **xxx** | स्वाक्षरित/- **xxx** |
| (बाजीराव शिंदे) | (अनिल कवडे) | (विनय जोशी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी